थोर पुरुषांचे आणि स्त्रियांचे

# पोंवाडे.

पूर्वार्ध

हें पुस्तक

इतिहासप्रिय देशबंधूंच्या रंजनासाठीं

शंकर तुकाराम शालिग्राम

यांनीं तयार करून

पुणें येथें

'ज्ञानप्रकाश' छापखान्यांत छापिलें.

सन १८७१.

किंमत दीड रुपया.

# थोर पुरुषांचे आणि स्त्रियांचे पोवाडे

पूर्वार्ध

हें पुस्तक

इतिहासप्रिय देशबंधूंच्या रंजनासाठीं

शंकर तुकाराम शालिग्राम

यांनीं तयार करून

पुणें येथें

'ज्ञानप्रकाश' छापखान्यांत छापविलें.

सन १८७९.

किंमत दीड रुपया.

म. ग. ह

# प्रस्तावना.

वृद्ध लोकांची जशी पोंवाड्यावर भक्ति दिसते तशी आलीकडील तरुण लोकांची पोंवाड्यावरभक्ति विशेष दृष्टीस पडत नाहीं. पोंवाड्यांचा संग्रह पाहिला तरी जुन्या लोकांतच काय तो आढळून येईल. म्हातारे गोंधळी बहुतेक करून अथवा म्हातारे भराडी वगैरे यांजपाशीं मात्र आज कांहीं कांहीं पोंवाडे उरले आहेत असें आढळतें.

कांहीं महिन्यांपूर्वी एक '**पाटसकर सावजी मलापा यांची ललीत-वाली मंडळी**' म्हणून येथें आली होती, तिचा **रामा गोंधळी** यांचे उत्कृष्ट चालीवर लावण्या म्हणण्याविषयीं भारी लौकिक असे, आणि त्या मंडळीस वरील अजब गुणावरून पुण्यांतील बहुतेक रसिक मंडळींकडून पुष्कळ आश्रय मिळून त्या "पाटसकरां" ची चहा पण विशेष झाली. त्याच 'पाटसकर' मंडळींतून वृद्ध पुरुषांचे रंजनार्थ कांहीं कांहीं पोंवाडे म्हटलेले ऐकण्यांत आले त्यांचा अभिनय आणि सूर असा ऐटदार पाहिला कीं, अंतःकरण त्या श्रवणांत वीररसानें स्फुरण पावत असे. त्यापूर्वी 'विविधज्ञानविस्तार' मा० पुस्तकांतून व वरकडही आम्हीं पोंवाडे वाचले होते, परंतु त्याचा तसा परिणाम मनावर कांहींच झाला नाहीं! वाचण्यांत व ऐकण्यांत तफावत किती आहे याचा सुमारही आम्हास तेव्हांच कळून चुकला. 'पाटसकरां' ची म्हणणी फारच बहारदार यांत संशय नाहीं. ती ऐकल्यावांचून पोंवाड्यांची खरी योग्यता कळणें दुरापास्त आहे असें आम्हास वाटतें.

या पुस्तकांतील कांहीं पोंवाडे 'पाटसकर' मंडळीकडील असून कांहीं 'विविधज्ञानविस्तार' मा० पुस्तकांतूनही घेतले आहेत. पोंवाड्यांचा संग्रह करण्याविषयीं या पुस्तकाचा फार दिवसांचा विशेष लौकिक आहे, आणि या आस्थेपासून तसा संग्रह बुडून जाण्याची फारशी भीति नाहीं. आमच्या तरी या पुस्तकाचा हेतु तोच हें वाचकांस तेव्हांच कळून येईल.

इतिहासाची मागील माहिती समजून घेण्यास हल्लीं जसें साधन

आहे तसें या पूर्वी कांहींच नसून फक्त जुन्या माणसांच्या तोंडून मात्र गोष्टीच्या रूपानें किंवा या पोवाड्याच्या रूपानें ऐकून घेण्यास जागा होती. त्या वेळीं समजुतदार व माहितगार अशा उदार मनाच्या पुरुषांनीं या पोवाड्यांच्या रूपानें मागील सर्व इतिहास कालरूप सागरांतून तारला! दुसरें असें कीं, आलीकडील इतिहासापेक्षां पोवाड्यांतील माहितीवर अधिक भरंवसा ठेवण्यास जागा आहे. याचें कारण असें कीं, पोवाड्यांतील वर्णन बहुतेक कवींनीं आपल्या माहितीनें मिळविलेलें असून त्यांत असत्याचा समावेश मुळींच नसतो; कारण आलीकडील इतिहास पाहिले तर बहुतेक परदेशस्थ लोकांनीं लिहिलेले असून ह्या लिहिणारांची माहिती ' उंटावरून शेळ्या राखण्या ' सारखीच आहे.

पोवाड्यांपासून ऐतिहासिक ज्ञान जसें होण्याचा सुमार आहे त्याचप्रमाणें प्राचीन काळचे रीतिरिवाज, लोकांची अभिरुचि, रागद्वेष इत्यादि समजून येण्यासही पुष्कळ जागा आहे. याखेरीज भाषेचे संबंधानें तर अपूर्व माहिती कळून शब्दवैचित्र्यही अद्भुत दृष्टिगोचर होतें. त्या काळचा इतिहास लिहूं जाणें असल्यास तर हें वाचन किंवा पठण अत्यंत श्रेयस्कर आहे यांत संशय नाहीं.

पोवाड्यांत जशी इतिहासाची माहिती आढळते तद्वतच मुशाफर म्हणून लावणी छंदावर कविता केलेली पुष्कळ आहे; त्यांतही माहिती इतिहासासारखी भरपूर दिलेली असते, परंतु त्यांत दुसरी एक चमत्कारिक मिसळ केलेली आढळल्यावरून मुशाफरांचा संग्रह या पुस्तकांत मुळींच केला नाहीं. एक चौक इतिहासप्रिय जनासाठीं व एक चौक रसिक तरूण विषयी जनासाठीं केलेला! अशी मुशाफराची रचना असते. त्या शृंगार चेष्टेची या पुस्तकांत मिसळ केली नसल्यामुळें ती इतिहासाची माहिती सोडावी लागली! एक चौक घेऊन एक चौक सोडावा तर त्यांतही रसहानि होते, यासाठीं त्यांस तूर्त स्थळ देणें इष्ट वाटलें नाहीं.

या पुस्तकांत पोवाड्यांचा कांहीं संग्रह केला आहे तरी सर्वच तो होणें ही गोष्ट शक्य नाहीं हें उघड आहे. जागजागीं यांचा विशेष संग्रह केलेला आढळतो. वरील ' पाटसकर ' मंडळीहून विशेष **बापू भगाडे** श्रीगोंदेकर यांजपाशीं विलक्षण भरणा आहे म्हणून ऐकतों.

नमुना वगैरे आम्हीं पाहिला आहे, परंतु त्याच्या त्याचा म्हणण्याचा ठाव अद्याप आम्हास लागला नाहीं तर यावरून संग्रहरूप समुद्राचा असेल आणि कोठें काय नाहीं याचा सुमार लागत कोठें काय संचय नाहीं.

पोंवाडे ही उत्तान अर्थाची कविता असून खड्या सुरांत असते; त्यामुळें म्हणण्यास विशेष कठीण नसते. यांतील पोंवाडे बहुतेक राजकारणी स्त्रीपुरुषांचे आहेत. **उमाजी नायकाचा** पोंवाडा जसा यांत दाखल केला तसाच **भागूजी नायकाचा** दाखल करण्याचा मनोदय होता, परंतु आयते वेळीं त्याची सबंध प्रत म्हणजे एकंदर आठरा चौक आले नसल्यामुळें तो घालणें रहित करणें भाग पडलें.

या पुस्तकासंबंधें आम्हांस आमच्या मुंबईकर एका व पुणेकर एका अशा दोघा मित्रांकडून कांहीं कांहीं सूचना झाल्या त्याबद्दल त्या दोघामित्रांचे आभार मानून त्याप्रमाणें यांत सुधारणाही केल्या आहेत. मुंबईकर मित्र रा० का० पां० प० यांनीं सूचना अशी केली कीं, पंढरपूर, तुळजापूर इत्यादि क्षेत्रांचीं वर्णनें या पुस्तकांत सादर करावीं, म्हणजे ज्याप्रमाणें थोर पुरुषांची व स्त्रियांची माहिती कळण्यास हें पुस्तक एक मार्ग होईल त्याचप्रमाणें स्थलांचें वर्णन ज्यांत आहे अशी कविताही सामील केल्यानें तेथील महिमा कळण्यास त्यापासून वाचकांस साधन होईल. यांच सूचनेवरून तुळशीबाग, बेलबाग, पर्वती इत्यादि स्थलांचीं वर्णनें आम्हीं यांत मनोहर कविकृत शेवटीं सादर केलीं आहेत. दुसरी सूचना अशी केली कीं, मुंबईहून एक जुनाट लावण्यांचे पुस्तक आमचेकडे देऊन त्यांतील पोंवाड्यांशीं आमचे मुळचे पोंवाडे ताडून पाहण्याविषयीं सांगितलें. त्याचप्रमाणें आमचे पुणेकर मित्र रा० का० ना० सा० यांनीं ही वरील प्रमाणेंच दोन सूचना केल्या; पहिली सूचना अशी कीं, प्रत्येक पोंवाड्याचे आरंभीं त्या पुरुषाविषयीं किंवा स्त्रियांविषयीं कांहीं माहिती देण्यासाठीं अवतरण घालून कवीचें नांवही सादर करावें. म्हणजे वाचकांस साग्र माहिती कळण्यास कांहीं साधन करून दिल्यासारखें होईल. दुसरी सूचना अशी कीं, पोंवाडे छापून काढण्यांत काळाचा क्रम लक्षांत ठेवून त्याप्रमाणें क्रमानें छापावे. परंतु तो नियम आम्हास पुढें पुढें मोडावा लागला; कारण ग्रंथ अर्धा अधिक छापून

तयार झाल्यावर कांहीं कांहीं पोंवाडे नवीन मिळालेले यांत सामील करणें जरूर पडले. त्यामुळें तो नियम अर्थात सुटला; तरी साधवेल तितकी पद्धत यांत साधली आहे. म्हणजे प्रथम **शिवाजी महाराज** यांचा पोंवाडा नंतर **पेशव्यांचे** पोंवाडे नंतर साध्वी स्त्रियांचे पोंवाडे. पुढें सरदार मुत्सद्दी यांचे पोंवाडे; असा क्रम साधला आहे. पुढील आवृत्तींत काळाचा नियम ठेवण्याकडे लक्ष देऊं हें उघड आहे. असो; वरील दोघा मित्रांचे ज्याप्रमाणें आभार मानले त्याचप्रमाणें 'वि० ज्ञा० वि०' मा० पुस्तकांतून पोंवाडें यांत घेतले आहेत म्हणून त्या पुस्तककर्त्यांचेही आभार मानणें वाजवी आहे. असो तर आतां त्या ग्रंथवर्गाचे आणि मालाकार यांचे आभार मानून ही प्रस्तावना आटपतों.
पुणें ता० २१ मार्च सन १८७९ इसवी.

# अनुक्रमणिका.


| अनुक्रम. | विषय. | पान. |
|---|---|---|
| १ | शिवाजी महाराजांचा पोंवाडा .. .. .. .. | १ |
| २ | सोनपतपानपतचा पोंवाडा .. .. .. .. | ८ |
| ३ | नारायणराव पेशव्यांचा पोंवाडा .. .. .. .. | १४ |
| ४ | सवाई माधवरावाचा पोंवाडा .. .. .. .. | १८ |
| ५ | ,, ,, दुसरा पोंवाडा .. .. .. | २५ |
| ६ | खर्ड्याचे लढाईवरचा पोंवाडा .. .. .. | २८ |
| ७ | ,, ,, दुसरा पोंवाडा .. .. | ३५ |
| ८ | ,, ,, तिसरा पोंवाडा .. .. .. | ४० |
| ९ | ,, ,, चवथा पोंवाडा .. .. .. | ४३ |
| १० | ,, ,, पांचवा पोंवाडा .. .. | ६० |
| ११ | शेवटले बाजीराव पेशव्यांचा पोंवाडा .. .. | ६५ |
| १२ | ,, ,, दुसरा पोंवाडा .. | ७४ |
| १३ | ,, ,, तिसरा ,, | ७७ |
| १४ | ,, ,, चवथा ,, .. | ७९ |
| १५ | ,, ,, पांचवा ,, .. | ८० |
| १६ | ,, ,, सहावा ,, .. | ८२ |
| १७ | ,, ,, सातवा ,, .. .. | ८४ |
| १८ | ,, ,, आठवा ,, .. .. | ८६ |
| १९ | रमाबाईचा पोंवाडा .. .. .. .. .. .. .. .. .. | ८८ |
| २० | अहल्याबाईचा पोंवाडा .. .. .. .. .. | ९१ |
| २१ | ,, दुसरा पोंवाडा .. .. .. .. .. .. | ९५ |
| २२ | नाना फडनविसाचा पोंवाडा .. .. .. .. | ९६ |
| २३ | ,, ,, दुसरा पोंवाडा .. .. .. | ९८ |
| २४ | परशरामपंतभाऊचा पोंवाडा .. .. | १०० |
| २५ | फत्तेसिंग गायकवाडाचा पोंवाडा .. .. | १०३ |

२६ यशवंतराव होळकराचा पोंवाडा .. .. .. १०५
२७ टिपू सुलतानाचा पोंवाडा .. .. .. .. १०७
२८ मल्हारराव होळकराचा पोंवाडा .. .. .. ११३
२९ महादजी शिंद्याचा पोंवाडा .. .. .. .. ११६
३० गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे मृत्युवरचा पोंवाडा ११८
३१ सातारचे जंगली राजे यांजवर पोंवाडा .. .. .. १२२
३२ कोल्हापूरचे आबामहाराजांवर पोंवाडा .. .. .. १२४
३३ नागपूरकर आपासाहेब भोंसले यांजवर पोंवाडा .. .. १२६
३४ उमाजी नायकावर पोंवाडा .. .. .. .. .. १३४
३५ पेंढाऱ्याचा दंगा ( रामजोशीकृत ) .. .. .. .. .. १३९
३६ पुणेंशहर वर्णन ( ,, ) .. .. .. .. .. .. १४१
३७ पंढरपूर क्षेत्रवर्णन ( ,, ) .. .. .. .. .. .. १४३
३८ व्यंकटगिरीवर्णन ( ,, ) .. .. .. .. .. .. १४७
३९ तुळजापूर क्षेत्रवर्णन ( ,, ) .. .. .. .. .. .. १४९
४० बेलबागेचें वर्णन ( मनोहरकृत ) .. .. .. .. .. १५२
४१ तुळशीबागेचें वर्णन ( ,, ) .. .. .. .. .. .. १५३
४२ पर्वतीचें वर्णन ( ,, ) .. .. .. .. .. .. १५७
४३ रमण्याचें वर्णन ( मनोहरकृत ) .. .. .. .. .. .. १५९

## शिवाजी महाराजांचा पोवाडा

शिवाजी महाराज हे मराठी राज्याचे मूळ स्थापक होत. याच पुरुषाच्या चातुर्यें करून या महाराष्ट्र देशास भूषण आलें आहे. यांच्या अखंड प्रयत्नानें या महाराष्ट्र देशास यवनांच्या जाचांतून मोकळें केलें. तेव्हां त्यांची स्तुति करावी तितकी थोडीच! आतां असा पुरुष निपजणें मोठें दुरापास्त दिसतें. ही स्वारी भोसल्यांच्या कुळांत १६२७ इसवींत जन्मली. आणि त्रेपन वर्षांनंतर सन १६८० इसवींत शांत झाली. यांच्या पराक्रमाचें ज्यांत वर्णन आहे असलीं पुस्तकें बरींच आहेत तीं वाचण्याचा हव्यास धरण्याविषयीं आम्ही वाचकांस परम विनयानें शिफारस करितों.

असो, यांच्या गुणांचे दिग्दर्शन थोडक्यांत या पोवाड्यांत केलें आहे; आणि हा पोवाडा फारच जुनाट आहे म्हणून यास या पुस्तकांतील प्रथम भागीं जागा दिली आहे.

सकळा देव आदीदेव शिव नमन धरूनी भावू ।
जैसा शिवाजीचा भावू कलिमधी प्रसन्न महादेवू ।
सांबाचा अवतार छत्रपती राजा शिवू ।
शिवाजीच्या तळ्यांत पाणी पिती सर्व जीवू ।
पाणी पूर्ण पिकले न्हावू भाकेंत गुंतला महादेवू ।
राजगडासारिखा जैसा देवें दिला ठावू ।
रगतगड रोयला जावली प्रतापगड मंडण ।
सोनवासहोल्या राजगडावरी सुवर्ण ।
गड हुडा दुर्गचांगले भाग मी राज्याचे गाईन ॥ १ ॥
सांगन शिवाजीच्या हिकमती किल्ले दुर्ग झुलती ।
भले दुणेदार जाणती मराठे राजकुमर ऐकती ।

मोऱ्या चंद्रराव* धरिला गड पण जावली घेतली ।
पावनगड पनाळा प्रभळगड हे संगीन ।
मतंगड घोसाळा राहिल्या अनंत वाड्या दोन ।
कुवळघर वेढिलें काबिज केलें तळ कोकण ।
पावला चवली घेऊन मुलूक काबिज केला महाराजान ।
धोंड पाताळ कोकणघाटचे किल्ले मी गाईन ।
सिरवळ सुपळ देश घेतले जैसे इंदापुरापासून ।
कुणबीस्तान कोकण शेकसल पीर पाहेन ।
घेतली बाराही बंदरें भाग मी राज्याचे गाईन ॥ २ ॥
कल्याण भिवंडी मारून नेली फिर्याद विजापुराला गेली ।
बाच्छाई क्रोध झाला जैसी अग्न प्रंजळली ।
जिता धरा शिवाजीला, कुळवजिरांशी बोलला ।
बोलवा बाजी घोरपड्याला, संगें ह्मादजी भोसल्याला ।
घाटग्या झुंझार रायाला, देवकया जिवाजीला ।
सडंग त्रिमुख रायाला, बेदऱ्या पिलाजीला ।
करन्यावन्या संभाजीला, विंगळ्या सुभानाला ।
राजे खान बडेखान सिद्दीला ।
अबदुलखान, अवघ्या वजीराचा कोट सद्रे बैसले दि-
वाण ।
विडा उचलिला पैजेचा, खान विजापुरांत बोलिला ।
जो बाछाई नावाजला, घोडा फिरंगी सद्रे दिला ।
सातशें उंट भरले बाणाचे, करडे लष्कर खानाचें ।
लश्कर चवदा हजार घोडा तोंडावर धराया चालिला ।
भांड सर्व देतिल कणाकिल्ले विलोकिती ।

---

* चंद्रराव मोरे.

खान दरमजली कुच केलें, चालून तोरण्यासि आला ।
बिनफत्तेमारीच्या बिनीच्या खाली आला ।
ब्राम्हण कृष्णाजी बोलिला ।
साहेब आपसकून झाला ।
खान दरमजली कुच केलें, चालुनी तुलजापुराला गेले।
फोडिलीच भोवानीला, मांडिला देविला ।
खान दरमजली कुच केले, चालुनी पंढरपुराला गेला ।
पंढरीचा विठोबा भिवरेंत बुडविला ।
मसुद बांधली देवाला, मग खानाचा भोग पुरला ।
खान दरमजली कुच केला, चालुनी पाली कारणें गेला।
पालीचा खंडोबा अज्यामत दावी मोंगलाला ।
न्हाटो न्हाटोरे भाई बोलिला, तीन कोस मोड केला ।
दीपमाळ बांधिली देवाला, मग खानाचा भोग पुरला ।
खान दरमजली कुच केला, चालुनी आवुंदाला गेला ।
आवुंदाची येभाई प्रचीत दावी खानाला ।
गोंधळ घातला देविला, मग खानाचा भोग पुरला ।
पांढऱ्या संभूला घेतला, खान दरमजली कुच केला ।
चालुनी वांई कारणें गेला, आपुल्या मुलुकांत राहिला ।
बरवेपणाचे कागद लिहिले, ब्राम्हण कृष्णाजी पाठविला।
हेजीम बोले शिवाजी राजाला, खान आला भेटायाला
शिवाजी जरी तूं भेटसी उदंड, दवलत देईल तुला ।
शिवाजी हेजीमासी बोलतो, खान मजला काय देतो
चहुंआगळे चाळीस गड मी खानाला देतो ।
मजवरी कृपा आहे खानाची ।
जावळीस दर संवारितो ।

तेथें यावें भेटायाला, मी खानाची वाट पाहतो ।
तसलिबा, दिल्या बामणाला, बामण खानाजवळी आला.
शिवाजी राजाचा हेजीम जिवाजी म्हालदार ।
खानापाशी येऊन, धडन बोले अबदुल्याला ।
चौदा हजार घोडा तुम्ही आणिला कशाला ।
अबूत द्याया जगदंबेला ।
हेजीम बोलतांच अबदुलखान खवळला ।
जिवाजी म्हालदार शिवाजी राजाजवळीं आला ।
खान दरमजली कुच केला ।
चालून रणतोंडीची घाटी चढून गडवेढा दिला ।
चवदा दिवस कोंड केला ।
खबर कळली म्हाराजाला ।
राजान गुपीत राहिला, शामराजा बोलाविला ।
रघुनाथ पेशवे, घातोंडच्या माणकोजीला ।
पिंगळ्या सुभानाला, महिकुलमाजी राजा बैसला सद्रेला।
सरदार बैसले बुद पुसे सुभेदाराला ।
भाईनु अबदुलखान आला, त्याचा धाक तो रे देवाला।
कसा जाऊं भेटायाला, बुद्धि सांगावी आम्हाला ।
गाइकवाड कृष्णाजी बोलिला ।
शिवबा सिल चढवा आंगाला ।
गळीं घातली पोलाद कंबर बस्ता वेडा केला ।
पटा जिव म्हाल्यापाशीं दिला ।
दोनी वाघनखें रायाच्या पंज्याला ।
वरुनी वारीक झगा त्याला, भगवंताची दया त्याला ।
वाछाई साज करूनि आला, जिजाबाई भेटी गेला ।

पालखेंत बैसुनी, जिजा आली भेटायाला।
जीजावा घेती अलाई बलाई चढती दवलत येऊंदे तुला।
घे येशाचा विडा आपुल्या स्मरावें महादेवाला।
तसलीम माझी जिजा येवू तुला।
शिवबा बोले जिजावा सये येवढी प्राप्त झाली।
नाहीं भेटलों दिवाणाला।
बारे बुद्धीनें कार्य साधावें, उत्तनें संभाजीचें घ्यावें।
बये येथुनि सलाम सांगे शहाजी राजाला।
गड दिले गडकऱ्याला, राज्य दिलें नेतोजीला*।
पुतन्या उमाजीला।
राजाला पांचशें लोक दिले त्याला।
रणतोडीच्या घाटाला, तुळ्या शिवाजीनं वेडा दिला।
राजांनीं सदरा शृंगारिल्या, गाद्या पडगाद्या घातल्या।
आतल्या शाकुनासा वस्तां दरयांतल्या जोडिल्या।
सुरंग खांब जडताचे, वरि घोंस पोवळियांचे।
माणीकांच्या बरच्या हारी, वरि मोत्याच्या लाविल्या।
तिणच्या सदरे मांडणी, सूर्य लकलकिला गगनीं।
साळस दर्पनाचें पाणी, चांदवे जडताचे चौकोनी।
पलंग टाकिला सोनेरी, मस्तानी पडदा चिठाइत घातला।
नानापरीचीं चित्रें त्याला, घोस हिऱ्याच्या जोडिल्या माळा।
चौघे बळी बांधुनी फळी, एके वळीनें चालिले।
पहिल्या सद्रेला गेले, गडकऱ्यांनीं दटाविले।
दुसरे सद्रेला गेले, कारकुन अबदुल्याला बोले।
तिसऱ्या सदरेला गेले, कंचणींत बुडविले।

* नेताजी पालकर

अबदुला खद्खदां हासीला, जिवाजी म्हालदार शिवा-
जी आले सदरेला।
पहिला सलाम महादेवाला, दुसरा सलाम शाहाजीला।
तिसरा सलाम जगदंबेला, चवथा सलाम गडकऱ्यांला।
माझा पांचवा सलाम, येतो अबदुल्या तुला।
तूं रे कुणबीका छोरा, बनाया दिवाणका सदरा।
ऐसा सदरा नाहीं आल्या, इदलशा बाछावाला।
तू रे कुणबीका छोरा,
खेतवाडी करकर भरण। दिवाणका रस्ता।
खाना ज्याची करणी, काय भ्यावें रघुनाथाला।
खाना जातीके कोण आम्ही जाणतो तुम्हाला।
अबदुला जातीके भटारणी, मिया करना दुकानदारी।
विज्यापुरमे दुकान तेरा, लड्डु जिलबी बिच खाना।
तुरे भटारणीका छोरा, मज राजापर लिया तोरा।
अबदुल्याने कव घातली, शिवाजी गवसुन धरला सारा।
चालवि कटार शिव्यावरी मारा न चाले जरा।
राजान बिचवा लावून दिला, वागपंज्याचा मारा केला।
ज्याचें उदर फाडिलें, खानाची चरबी आली दारा।
अबदुलखान लष्करी भला, पटका कमरेचा सोडिला।
खचून हात फिरंगीं घातला,
मारिला फिरंगीचा गुंडाळा, राजाचा शिर टोप तोडिला।
पांच वेडे मंदीलाचे, चवदा वेडेहो तोड्याचे।
तुटून जरासा लागला, जखम चढली महाराजाला।
मारिला शिवाजीनें गुंडाळा, मान खांदा गवसुन केला।
जानव्याचा दोरा, खान पडलासा देखिला।

सैद बंडू उठावले, मारिला पटा त्याचा ।
शिवाजीनें वरचेवर तोलला, सैद जो मारिला ।
खांद्यापासुन केला सारा, सैद बंडू पडलेसे देखिले ।
त्याचा बामण म्होरे झाला,
परतरे माघारा सर जा शिवाजी बोलिला ।
ब्राम्हण मारूं नये तुला, क्रिया देवाची आम्हाला ।
महाराज खदखदां हासिला, हातिचा पटा टाकुन दिला ।
शिवाजीचा जिवाजी म्हालदार,
त्याणें शिघ्र उडी घातली, काढ्ग बराणपुरी बरचा ।
त्याणें अचाट फेकुन दिला, नाभीकमळीं बैसला ।
बरचा पाठीला फुटला, ब्राम्हण हरहर बोलिला ।
त्याचा प्राण निघुनी गेला, कावजी राजाचा लेक ।
घ्या घ्या करीत आला,
पायां केल्या भोयांचा खटारा धरणीवर पाडिला ।
शिवाजी आले शिर कापुनी न्हेउनी गेले,
प्रतापगडची भोवानी शिर वाहिलें जगदंबेला,
बत्तीस दाताचा बोकड मातला गे होता ।
आहुती द्यावी अबदुल्याची,
येथुनी इशारत कुल राजांच्या लोकांला,
बारा तोफा मारा केला, अवाज प्रतापगडावर होती ।
कडका पायदळ येती,
पडले धडाधडा वोळली निशाणाचे हत्ती ।
त्रिमुख कागड्या सुरेराव लोटला,
रणतोंडीची घाटी, तुक्या भिवाजी भिडला ।
साठ आरबांच्या घोड्या पाडाव केला,

त्याक्षणी हनुमंताला, पायींचे पायदळ शिवाजी राजाला
महाराज पनाळ्यावर गेले, पनाळा चौफेरी बांधिला ।
कैदीन भांडण पनाळा, नहीं देई बाछाहाला ।
सरदार मिळाले सदरेला, बाईन शाहीर बोलाविले ।
अधीनदासकवेश्वर, त्याणें कडाका गाइला ।
दिला एक इनाम गांव, बक्षीस त्याला ।
दोन सोन्याचे लंगर चढविले हाताला ॥—॥

---

## सोनपत पानपत.

हा पोवाडा जुलई सन १८७७ चे निबंधमालेचे अंकात दिला असून
त्यावरचें सदरच येथें दिलें आहे.

( शिवाजी महाराजांनीं ज्याचें आपल्या हातानें बीजारोपण केलें तो वृक्ष वाढतां वाढतां शंभर वर्षांनीं केवढा अवाढव्य विस्तार पावला, व त्याच्या विस्तीर्ण छायेखालीं सगळें भरतखंड नुकतें विसांवा घ्यावयास लागलें न लागलें तों त्यावर एकाएकीं प्रचंड वज्राघात कोणता झाला हें सर्वांस माहीत आहेच. हा महाप्रसंग महाराष्ट्राच्या वैभवाचा मध्य मानला असतां चालेल. याच्यापर्यंत मराठ्यांस जिकडे तिकडे यशच येत गेलें; व यापासून पुढें त्यांच्या सत्तेच्या ऱ्हासास आरंभ झाला. हें महायुद्ध होऊन गेल्यास आज शंभराहून अधिक वर्षे जरी होऊन गेलीं; तरी अद्याप या देशांत आबालवृद्धांस त्याचें स्मरण बुजालें नाहीं. असो; तर असला महाप्रसंग इकडील शाइरांनीं कसा गाइला याविषयीं सर्व शोधक मनुष्यांस व विशेषतः देशाभिमानी पुरुषांस मोठी उत्कंठा झाल्याशिवाय राहणार नाहीं. हें जाणून पुढील पोवाडा आम्हीं उतरून घेऊन साद्यंत छापला आहे. हा आमच्या वाचकांपैकीं थोड्यांच्याच ऐकण्यांत आला असेल; व याचा संग्रह आतां न झाला तर लवकरच तो समूळ नाहींसा होणार आहे हें उघडच आहे. याचे एकंदर अठरा चौक आहेत. भाऊ साहेबांची स्वारीवर नेमणूक होऊन ते दिल्लीवर

गेल्यापासून तों शेवटचा मोड होऊन सगळी धुळधाण होईपर्यंत झालेला सर्व मजकूर यांत आणला आहे. या लढाईंत गाजलेले जे जनकोजी शिंदे, समशेर बहादर, गोविंदपंत बुंदेले, बळवंतराव मेहेंदळे वगैरे वीर, त्यांचें यांत पृथक् पृथक् वर्णन केलेलें आहे. हें महाराष्ट्रदेशीय भाटांच्या तोंडून कानीं पडून गेलीं शंभर वर्षें किती वीरांचे बाहु रणावेशानें स्फुरण पावले असतील !

कोणत्याही पद्याची चाल समजल्याशिवाय त्याची बहार मुळींच वाटत नाहीं हें सर्वांस माहीत आहेच. त्यांतून पद, पोवाडा, लावणी वगैरेंची रचना तर अनियमित असल्यामुळें त्यांची चाल लावतां येणें व ती दुसऱ्यास शब्दांनीं सांगणें म्हणजे मोठीच पंचाईत आहे. यास्तव पुढील प्रबंधाचा पूर्ण रसानुभव होण्यास गोंधळ्यांच्या तोंडूनच तो ऐकिला पाहिजे. तरी वाचकांचा सर्वथा मनोभंग न व्हावा म्हणून इतकें सांगतों कीं, अमृतरायाची सर्व प्रसिद्ध 'दामाजीची रसद' हिच्यासारखीच वरील पोवाड्याची चाल कांहीं अंशीं आहे. )

बहुत दिवस झाले शाहूला । जावें निजभवनाला ॥
नाना राखावें तुम्हि राज्याला । शिक्का दिधला त्याला ॥
अष्ट प्रधान भाऊ बाजूला । हवालले राज्याला ॥
मुलूख मारुन केला चकचूरा । कीं, दुसमान कांपे थरांथरां ॥
भाउसारखा मोहरा । आम्हांवर कां रुसला पंचीप्यारा[1] ॥
१

तखत फोडुनि केली धुळधाणी । असा नाहिं झाला कोणी ॥
राया प्रभुरायाची करणी । नांव गेलें राहुनि ॥
विश्वासराव बसविले नेऊनी । लिहिलें होतें कर्मीं ॥
घडले टाकसाळि रुपये आणि मोहोरा । दिला अवघ्यांशीं रोजमुरा ॥ भाउसारखा०— २

---

1 पंचप्राणांसारखा प्रिय.

बारा वर्षें झालीं राज्याशीं । कळून आलें त्याशीं ॥
धाड पडोरे त्या मुलखाशीं । कुणिकुन आली इवशी[१] ॥
भाउनें हकारलें राव सकळांशी । कुळदक्षिण भाईशीं[२]
दिली नौबद गेला दिल्लीशीं । हालीवलें तक्ताशीं ॥
रणखांब रोवुनि मारितो तलवारा । काशी तीर्थ अवधारीं[३] ॥
भाउसारखा० ——— ३

पहिली लढाइ झालि कुंजपुऱ्यावर । सकळ घेउनि दळभार ॥
म्होरं[४] रोखले कमाणतीर । मार होती चौफेर ॥
कुतुबशहा मारुनि केला चकचूर । त्याचें कापिलें शिर ॥
आला दक्षिणचा राजा धुरंधर । भाउसारखा वीर ॥
सुटला अवदालीशीं दरारा । म्हणें आतां सल्ला करा ॥
भाउसारखा० ——— ४

सल्ला ऐकेना झाला विघोडं[५] । अवघा मुलुख सोड ॥
रुपये देत होता दोन क्रोड । धरिली भाउनीं आड ॥
तुजला मारिन मी करिन वेड । कंधारं[६] पाहिन पुढ ॥
रोवला रणखांब होती धडाधड । नदि जमुनेच्या कड ॥
खेत्री हाणा म्हणती रणशूरा । कुळक्षेत्री धरिला थारा ॥
भाउसारखा० ——— ५

पहिली लढाइ झाली फार ठीक । केले मोर्चे तकीप ॥
भोवतीं खाणलासे खंदक । मधें भाउचे लोक ॥
कुणिकुन अला लवंडिचा घातक । होति बातमी ठिक ॥
दोन वेळां फिरविला माघारा । गिलचाँ[७] केला घाबरा ॥
भाउसारखा० ——— ६

---

१ पीडा, अवदशा. २ दक्षिणच्या सरदांस. ३ तें रणांगण काशीतीर्थच समजा.
४ समोर. ५ बिघाड. ६ काबूल कंदहार. ७ अफगाण.

एक दिवस नेमला मरणाचा। वख्त निर्वाणीचा ॥
भाउनीं पैगम केला सकळाचा। धंवशा[1] वाजे त्याचा ॥
ऐशी हजार खासा नांवाचा। धुरंधर भाऊचा ॥
एकाएकी आला सामोरा। दिला कुचाचा नगारा ॥
भाउसारखा०—— ७

प्रथम पडला गोविंदपंत बुंदेला। केला भाउनीं हल्ला ॥
विसा हजारांशीं गिलचा आला। हुजरातीवर पडला ॥
मग साहिना बळवंत रायाला। ढिगांत जाउनि पडला ॥
भाउ विनवितो बहादरा। रणीं राहेला बिचारा ॥
भाउसारखा०—— ८

विश्वासराव शिपाई रणशूर। भले राजकुमार ॥
मारितो फौजा हातीं तलवार। रणांत होउनि धीर ॥
भोंवती गोळ्या वर्षति अपार। मधें उभे सरदार ॥
गिलचा कापला बेसुमार। भाउ म्हणे मागें फिर ॥
अवचित गोळि लागली धुरंधरा[2]। मुखीं बोलला हरिहरा॥
भाउसारखा०—— ९

जनकोजी शिंदे रणशूर रणगाजी। चढती तुरंग तेजी॥
त्याला भाऊसाहेब होती राजी। औंदा[3] राखा बाजी[4] ॥
मग फुरारले राव जनकोजी। शिरीं छत्र भावजी ॥
नित्य नेम गिलचा कापते चरांचरां। शिरधाडितो पहा
नजरा ॥ भाउसारखा०—— १०

सोनजी भापकर मानजी पायगोडे। रणीं टाकिले घोडे ॥
तुकोजी शिंदे पडले पायांपुढें। जसे अग्नीचे हुडे ॥
आणखी दमाजी गायकवाड। होळकर रणभिडे ॥

---

१ डंका. २ विश्वासरावाला. ३ आज ( या प्रसंगीं. ) ४ बाजू.

अवघ्या शाहीवर आली धाड । आवचित झाला मोड ॥
एकाएकी आला सामोरा । दिला कुचाचा नगारा ॥
भाउसारखा०—— ११

समशेर बहादर रणशुर रणगाडा । रणीं वाजे चौघडा ॥
हाटकुन गिलचे हाणितो धडाधडा । ढाल तरवार जमदडा[1] ॥
ज्याणें रणीं आडविला तिस घोडा । सन्मुख दावी मुखडा ॥
जसा बाजीचा[2] पुत्र हिरा । येती जखमाच्या लहरा ॥
भाउसारखा०—— १२

चेतली जणु खुप झाली लढाई । मार होति सवाई ॥
त्याचा रंग बारगीर बिलाई । गिलचा करितो घाई ॥
झाला मोड पळती कुळशाही[3] । पालखिस गणती नाहीं ॥
एक एक पळून आला माघारा । रणीं राहिला बिचारा ॥
भाउसारखा०—— १३

काशि गत झालि गडर्यांनो भाउला । जनकोजी शिंद्याला ॥
लोक पुसती एकुनेराला[4] । आम्हीं नाहिं पाहीला ॥
भाउसारखा मोहरा हरपला । काय सांगावें नानाला ॥
भाउला नाहिं कोणाचा आसरा । वेढा घातला चौफेरा ॥
भाउसारखा०—— १४

ज्याला पडली भाउची भ्रांत । ते राहिले रणांत ॥
फितुरी पळुन आले दखणांत । वांचविली दौलत[5] ॥
त्यांचा ईश्वर करिल सत्यनाश । येश दिलें गिलच्यास ॥
भाउची भ्रांत पडलि नारिनरां । सकळ जना लहान थोरा
भाउसारखा०—— १५

---

१ आयुधविशेष. २ थोरला बाजीराव. ३ शाहींतले सरदार. ४ एकमेकाला. ५ आपापला सरंजाम.

कागद आला रावनानाला । होते उजन्यां[1] नगराला ॥
कागद वांचितां आंग टाकि धरणीला । मोठा अतिशोक केला ॥
आम्हांवर श्रीहरि देव कोपला । विक्षोभ आणिला राज्याला ॥
दाटला गहिवर गोपिका बाईला । अती कहर वर्षला ॥
नाना फिरुनि चालले माघारां । दिला कुचाचा नगारा ॥
भाऊसारखा०—— १६

भाउसाठीं झुरती जनावरें । जंगलीं पाखरें ॥
राघू मैना अणी खबुतरें । टाहो करिती फार ॥
कुणिकडे गेला अमचा मनोहर । सपन झालें खरें ॥
पैसा मिळेना म्हणती सारे । बंद झाले सावकार ॥
फुटला पर्वतीशीं घाम दरांदरां । वाडा गजबजला सारा
भाउसारखा०—— १७

आम्हीं पद बांधिलें वैताग । जिवास केला त्याग ॥
कोणीकडे गेले भाऊ श्रीरंग । नानाचे जिवलग ॥
कधीं भेट देइल आम्हां संग । जिवा होइल खुषिरंग ॥
एथुन झाला पदाचा अभंग । म्हणे महादु कविरंग ॥
रामा सटवा म्हणे दातारा । वाट पाहतो खरोखरा ॥
भाउसारखा०—— १८

---

१ उज्जयिनी.

## नारायणराव पेशव्यांचा पोवाडा.

थोरले माधवराव मरण पावल्यावर त्यांच्या सांगण्याप्रमाणे नारायणरावास गादीवर बसविलें. माधवरावांनीं मरते समयीं रघुनाथरावाचे ओटींत नारायणरावास घातलें असें म्हणतात. पुढें आनंदीबाईचे मसलतीनें रघुनाथरावानें सुमेरशिंग गारद्याकडून नारायणरावास मारण्याचा बेत केला. ज्या दिवशीं दुपारीं सुमेरशिंग आपल्या लोकांसहवर्तमान वाड्यांत नारायणरावाचा वध करण्याकरितां आला. त्यावेळीं नारायणराव शाल्योदन भोजन करून गाढ निद्रेंत निमग्न झाले होते. बाहेरचा गलबा कानीं पडून ते स्वतः जागे होई पर्यंत त्यांस कोणीं उठविलें नाहीं व त्यांस ही वार्ता कळविली नाहीं. जागे झाल्यावर नारायणराव घाबरे होऊन आपला मृत्यु चुकविण्यासाठीं इकडे तिकडे पळूं लागले, परंतु तो दुष्ट सुमेरशिंग सारखा पाठी लागून वार करून त्यांस ठार मारिलें! चांपाजी टिळेकर म्हणून त्यांचा एक हुजऱ्या होता तो धन्याच्या आंगावर पडून धन्यास मारूं देईना म्हणून ते दोन्ही पुरुष सुमेरशिंगानें तरवारीनें तोडून टाकिलें! 'नारायणरावाचे मृत्युचें नाटक' आहे त्यांत ह्या सर्व गोष्टींचे फारच हृदयभेदक दिग्दर्शन केलें आहे. नारायणरावाचें राज्यावर बसणें व अखेर सन १७७४ इसवी सालींच झाली. त्यानीं आठ महिने राज्यकारभार पाहिला.

दक्षिणचा दिवा मालऽऽऽवला! हिरा हारऽऽपला ॥
कसा! गुपित घाला केला! रावसाहेबाला! ॥ ध्रु० ॥

एकछत्रि करुनि गेले राज्य माधवराव ।
थरथरांचि कांपत होते त्यासि उमराव ।
बसिवले हस्तनापूरिं तखत बाच्छाव ।
दादासि मोकळे केले राज्य कराव ॥
तुटलि आयुष्याचि दोरी, नाहीं उपाव ।

---

* सुमेरशिंगास रघुनाथरावानें जें पत्र पाठविलें होतें त्यांत धरावें असें लिहिलें होतें. पण त्या धचा मा आनंदीबाईनें केला असें म्हणतात.

मरत्या समयास बोलिले नारायणराव ॥
चाल—दादासि मिळोनि असाव ।
द्वैत मनीं नसाव । अशा वेळानें कंठाव ॥
ओटींत नारायणराव तुमच्या हो घातला ।
अशा बहु प्रकारें निरवले हो दादाला ॥
दक्षिणचा० ॥ १ ॥

मग गेले हो साताऱ्यासी, राजापाशी ।
शिक्के रोखे वस्त्रें दिलीं हो नारायण रायाशी ।
आले वाजवित चौघडे शहर पुण्याशी ।
कुच करून लौकर गेले हो नाशकाशी ।
दुसऱ्याची बुद्धि ऐकीली निमित्याशी ।
मग येऊन जप्ती फार केली दादासी ॥
चालः—देती गस्तीवर गस्ती ।
थोर केली बंदोबस्ती ॥ पुल बांधुनि करूं मग वस्ती ॥
नळाशि काम लाविलें—हुकूम झाला ।
पुढें कोट बांधणार होते शहर पुण्याला ॥
दक्षिणचा दिवा मालऽऽऽवला ! हिरा० ॥ २ ॥

शुद्ध भाद्रपद तेरस, दिवस सोमवार ।
त्या दिवशीं दिवस चढला दोनप्रहर ।
मग सुमरशिंग गारदी होउन तैयार ।
संगें महमद साहेब इमानी सरदार ।
हजिरी देतों म्हणोनि लाविली कटार ।
मग शिरले वाड्या मंदी उपसुन तलवार ॥
चालः—झाली गर्दी एकच हल्ला ।
राव निजला जागा झाला । उठुनिया उभा ठेला ॥

राव फिरुनि अवघा वाडा भयाभित झाला ।
थरथरांच कांपत राव दादापैं गेला ।
दक्षणचा दिवा मालऽऽऽवला ! हिरा० ॥ ३ ॥
आतां हिकून पळाले राव, सुमरशिंग माग ।
बरोबर गारदी घेऊनि केला लाग ।
शोध करित पुढें चालले, लावला थांग ।
म्हणे इकुनि पळाला; सुमरशिंगाप्रत सांग ।
राव हात जोडी, दादाला सोडा राग ।
म्हणे आतां वांचवा, जीवदान माग ॥
चालः–डोइ घातली पोटांत ।
आलि माया हृदयांत ।
नका करूं बालकाचा घात ।
दादा ठेविं वर हात वांचवा याला ।
दक्षिणचा दिवा मालऽऽऽवला ! हिरा० ॥ ४ ॥
बोले सुमरशिंग गारदी, तुम्ही वांचिवतां ॥
पुढें आमुचिं मनुष्यें घाण्यांत पिळीतां ॥
तुम्ही मुळीं आपुल्या प्राणासि कां दवडतां ॥
तुळाजि खिसमतदार झाला बोलता ॥
दादानिं काढला हात झाला सरता ।
निःशंक हात मारिला किं खांद्या वरता ॥
चालः–झाला पुरा एकच घायीं । दादाची फिरली द्वाही ।
चौघडा वाजे ठायीं ठायीं । तेथ उपाय नाहीं कांहीं ।
दोधन्यें एकच ठायीं,—माराव कोणाला ।
होयाचें होऊन गेलें शब्द दैवाला ।
दक्षिणचा दिवा मालवला हिरा० ॥ ५ ॥

गंगाबाई करी रुदन, "हा गेले रत्न !
गाईनें वत्स गमविला ! देवा ! धन्य !
टाकून घोडे पालख्या द्रव्य धन ।
नाहीं हौस पुरली गेले नारायणा !"
राव नेले अर्धे राति लावले अग्न ।
खंडिभर लांकडें आठ मण चंदन ॥
चालः-कामा आला खिसमतदार । चापाजी टिळेकर ।
शुद्ध इमानी चाकर । धड पडलें अंगावर ॥
नारुजी नाईक ठार— पुरा झाला ।
जखमा लागल्या ईशराम पंताला ।
दक्षिणचा दिवा मालऽऽऽवला ! हिरा० ॥ ६ ॥

आतां भोळें राज्य दादाचें ! केवळ काशी !
बोले तुकूम देही आउख चिंता दादासी ।
वस्त्रें आणावया पाठीवले अमृतरायासी ।
बोले सुदामा ब्राम्हण प्रसन्न शिव दादासी ॥
चालः-दादाचीं तपें तीं भारी !
शिवसांभ विघ्न नीवारी ! बाहेर निघाली स्वारी ।
दरारा पडला भारी-सर्व दुनियेला ।
बोले लहिरी मुकुंदा दादाचा बोल बाला ।
दक्षिणचा दिवा मालऽऽऽवला । हिरा० ॥ ७ ॥

# सवाई माधवरावांचा पोंवाडा.*

पेशवाईचे राज्यप्रकरणावरून पाहिलें तर सवाई ( धाकटे ) माधवराव हे सहावे पेशवे होत. थोरले माधवरावाचे मृत्युनंतर त्यांचे कनिष्ट बंधु म्हणजे, बाळाजी बाजीराव ऊर्फ नाना साहेब यांचे तृतीय पुत्र जे नारायणराव राज्याधिकारी झाले त्यांचेच हे पुत्र. बाळाजी बाजीरावाचे पहिले पुत्र विश्वासराव हे तर असाध्य जखम लागून पूर्वी पानपतचे लढाईंतच पडले. दुसरे पुत्र माधवराव हे थोर राजकारस्थानी दयावंत आणि परम न्यायी असे होते. ते अल्प वयांत कफोद्भव होऊन थेऊर गांवीं शांत झाले. ( मृत्यु पावले. ) त्यांची पुण्यशील भार्या जी रमाबाई ती पतीशवाबरोबर सती गेली. नंतर पुढें प्रभु नारायणराव राज्यकारभार पाहूं लागले. ती गोष्ट राघोबादादाची बायको जी आनंदीबाई इला दुःसह होऊन तिनें राघोबादादाचें मन वळवून गारद्यांकडून नारायणरावाचा वध करविला. ( त्याविषयीं विशेष हकीकत नारायणरावाचे पोवाड्याचे आरंभीं लिहिली आहे ) त्यावेळीं नारायणरावाची स्त्री गंगाबाई पांच महिन्यांची गरोदर होती. त्या गर्भांत असलेल्या मुलाचे नांवे द्वाही फिरवून राज्य चालविलें. म्हणूनच त्यावेळचे राज्यास 'गर्भी राज्य' असें म्हणतात. राघोबादादाचे पक्षपाती मंडळीकडून गंगाबाईचे जिवाचा घातपात न व्हावा म्हणून त्यांचे विरुद्ध पक्षाकडील मंडळींनी म्हणजे नाना फडनवीस सखाराम बापू यानीं गंगाबाईला पुरंदर किल्ल्यावर ठेवून नाना फडनवीसही तेथें रक्षणासाठीं राहिले. नऊ महिने पूर्ण भरल्यावर सवाई ( धाकटे ) माधवरावांचा जन्म झाला. तेव्हां जिकडे तिकडे आनंदोत्सव झाला. हत्तीवर साखरा वांटल्या. पुण्यास त्या दिवशीं ज्या स्त्रिया प्रसूत झाल्या तितक्या स्त्रियांस बाळंत विडे, तान्ह्या मुलांस आंगडीं टोपडीं राजवाड्यांतून वांटलीं गेलीं. पुढें सवाई माधवरावास सातारचे महाराजांकडून पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं.

सवाई माधवरावाचे कारकीर्दींत या महाराष्ट्र देशाचा पूर्ण उत्कर्ष हो-

---

* यांच हयातींतील उत्कृष्ट हकीकत 'सवाई माधवरावाचें नाटक' म्हणून जें पुस्तक रा. व्यंकट रंगो कट्टी यानीं केलें आहे त्यावरून विदित होईल.

ऊन पुणें शहरीं तर लक्ष्मी अवतरलीच होती! मराठी राज्याचा उत्कर्ष यापूर्वी इतका कधींच झाला नव्हता. खड्यांचें लढाईंत मोंगलांचा यथास्थित मोड करून त्यांजपासून विपुल खंडणी घेतली. शेवटीं तर दिल्लीपतीकडून सवाई माधवरावास "वकील-इ-मुतलग" असा किताब मिळून मोगलांचे राज्यांतील गोवध बंद झाला! सवाई माधवरावानीं एकवीस वर्षे पर्यंत प्रजेचें पुत्रवत पालन करून अखेरीस जुन्यावाड्यांतील तिसरे मजल्यावरून खालीं उडी टाकिली. तेणेंकरून जबर दुखापत होऊन तिसरे दिवशींच अवतार संपला. त्यांचा जन्म सन १७७४ इसवींत होऊन अंत सन १७९६ सालीं झाला.

खालीं सवाई माधवरावाचे जे पोवाडे दोन लिहिले आहेत हे प्रख्यात प्रभाकर कवीच्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

प्रभु नारायणराव धुरंधर दक्षिणचे नृपती ।
प्रसन्न वदनें करुनि जयाला सकळ प्रजा जपती ।
पतिव्रता किती धनाढ्य गंगाबाई भोंल्या खपती ।
सुशील सति सौभाग्यवती-पुढें रूपवत्या लपती ।
सवाइ माधवराव प्रसवली कुळदीपक दिपती ।
पुरंदरीं रक्षणार्थ मंत्री रात्रंदिस जपती ।

चाल ॥ शके सोळाशें शहाण्णवाच्या मुळज्य संवत्सरीं ।
अधिक व्हता वैशाख शुद्ध सप्तमि चंद्रवासरीं
पुनर्वसू नक्षत्र कडकाडित दुपारचे अवसरीं
॥ चाल ॥ झाला जन्म दैदीप्यमान पूतळा
जणु सूर्य उगवला प्रकाश करी भूतळा
दिल द्रव्य कंचुक्या नाहीं गणति पातळा
महोत्साह घरोघरीं लागले लोक करायाला
परशुराम प्रत्यक्ष अले काय छत्र धरायाला
कमि नव्हते पृथ्वींत अवांतर प्राणी न्यायाला

घरांत राहू ग्रासुं पाहतो चंद्र बिंबाला
गोत्रपुरुषकिड कठिण लागली मुळ कुळ कोंबाला
॥ चाल ॥ करिं घेउनि पंच्यारति प्रभुला धनवर ओंवाळुनी
समाचार फुंद फुंदन पुसती निर नेत्रीं ढाळुनी
पहा पहा निट राव बोलती मुख आमचें न्याळुनी
॥ चाल ॥ तुझि अमुची भेट हीच सगुण सुंदरी
न्हा खुशाल आपल्या झुलत राजमंदिरीं
ह्राहिलेख तुझी जन वंदीतिल आदरीं
जड पडल्या करि [illegible]रण सदोदित संकट समयाला
अशापरी निरसून धारीति कंवटाळुन हृदयाला ॥ ५ ॥
प्रतिउत्तर परिसोन विश्वमाउलि मनिं गहिंवरली
नेउन रंगमाहलीं सख्यानीं चहुंकडून सांवरली
विरक्त झाले श्रीमंत हिकडिल स्नेह ममता सरली
स्नान दान देव पुजा गलबलित अगदिच अंतरली
एकादशिची रात्र बऱ्यांतच सहज मात्र सरली
उजाडते द्वादशीस कुणिकुन कुबुद्धि संचरली
॥ चाल ॥ तिसरे मजल्यावरुन घातली उडि कारंज्यावरी
एकाकीं हालचाल न होतां गेलि वार्ता दुरुवरी
सेवकजन सर्वांग विकळ करखांद्यांवर आंवरी
॥ चाल ॥ शके सत्राशें भरसत्राच्या अवसरीं
दक्षिणायनामधिं राक्षस संवत्सरीं
आश्विन शुद्ध पौर्णिमा भौमवासरीं
रविमावळतां मरण झडकरी आलें सखयाला
इथुन अतां प्रारंभ दिसेंदिस अद्भुत प्रळयाला ॥ ६ ॥
हहाःकार जाहला प्रगटतां पुकार शहरांत

बंद पडलिं भणभणित दुकानें भर बाजारांत
वृद्ध तरुण नर नारि बुडाल्या अकांत कहरांत
कुंकु गंध किति सुज्ञ पुसुन धुळ बांधिति पदरांत
स्वयंभुदिप विजतांच विवसि व्यापलि दरबारांत
ठायिं ठांयिं थिजले लोक शोक संचरता अंधेरांत
चाल ॥ बंदोबस्त कडिकोट करुनियां शनिवारांतुन अर्धी
अखंड स्वारि रायाचि निघाली चौथिच्या अमलामर्धी
दुर्लभ दर्शन ज्याचें प्रभु तो नदिंत निजायचा कर्धी
॥ चाल ॥ रचियलें कर्पूर गौर चंदन
र्चिचला शेवटचा चंदन आरुढले विमानीं नारायणनंदन
अनेक रिपूंचें करुनी कंदन दवडुनि देयाला
दर्भासन घातलें विष्णुलोकास बसायाला ॥ ७ ॥
बाइसाब कल्पांत जिवाचा तळ तळून करिती
कां ग कुळस्वामिणी कोपलिस आजी मजवरती
पति पूर्वी सौभाग्यवत्या ज्या पुत्रवत्या मरती
इह लोकीं परलोकीं धन्य त्या कुळास उद्धरती
कसं माझें दुर्दैव उपजल्यें चांडाळिण पुरती
म्हणुनि श्रीमंत प्रभुची मजला अंतरली मुर्ती
॥ चाल ॥ निरोगी सात सहस्त्र उंट न. पार स्वामीचे
वीस सहस्त्र तुरग निवडक भीमथडी ग्रामीचे
सबल दोनशे नव्वद कुंजर विशाल हरकामीचे
॥ चाल ॥ म्हशी दोन सहस्त्र कांटिदार बाणीच्या
साहा सहस्त्र गाई फारत + + + +
कांहीं सफेत कपिला व्याघ्रांबर खाणिच्या
बैल बारा सहस्त्र यवढ्या जिवास खायाला

कोण श्रीमंता वांचूनी समर्थद्यायाला ॥ ८ ॥
शिकार चित्ते व्याघ्र पटाइत वृक सांबर हरणें
जंबुक चित्तळें ससे हि भेंकर कुरवाळुन धरणें
रोस येडके गेंडे सशांना बनात पांघुरणें
आपण खावें तें त्यांस पुत्रवत् किति माया करणें
सुंदर रुप रायाचें कुणावर नाहिं रागें भरणें
कल्गि तुरा शिरपेंच पाचुचीं पडत होति किरणें
॥ चाल ॥ सदय हृदय साक्षात पितांबर परिधाना प्रभु
कृष्ण कुळीं देदीप्य जसा + + + +
तसा करुन दिग्विजय शेवटीं अवघड रचिला विभू
॥ चाल ॥ पाहुंद्या मला तें एकवेळ श्रीमुख
जन्म--तों अतां ह्या जिवास होईल दुःख
भोगिलें रमाबाइनिं कांहीं तरि सुख
हरी जाहला विमुख विसरल्यें सांग पुजायाला
प्रयागिं जावें उठुन वाटतें समाधि घ्यायाला ॥ ९ ॥
अश्व आवडते कुंजर धेनू मृग मैना रडती
मोर खबुतरें तितिर सांबरें मूर्च्छागत पडती
स्वर मंजुळ कोकिळ पक्षी ते पिंजऱ्यामधिं तडफडती
पोपट भारद्वाज चास पर दुःखानें खुडती
भुलांद उलुखा भालु रीत घन विजवा कडकडती
असंख्य तुटती तारे नभ मंडळिं किरणें पडती
॥ चाल ॥ ग्रामव्याघ्र दिवसास भयंकर सद्गत भुंकारिती
सवत्स नित अपरात्रिस कितीक गाई हंबरती
भुतें पिशाचें खेस डाखिणी काय हका मारिती
॥ चाल ॥ दोहो द्वारी बसुनी लक्ष्मी पिंपळा वरी

करि दीर्घ रुदन मध्यान्हीं होतां शर्करी
नाहि न्हात अता होइल अंकुश वाणी वरी
शक्ति घेउन श्रीहरी निघुन जात्ता मुळ ठायाला
सव्यसाचि सारखे लागले मागे प्हायाला ॥ १० ॥

धन्य वंश एकेक पुरुष कल्प वृक्ष पिकले
शत वर्षं द्विज पक्षि अनंदे त्या तरुवर टिकले
जलचर हैदर नबाब सन्मुख रण करितां थकले
ज्याणि पुण्याकडे विलोकिलें, ते संपतिला मुकले
असे प्रभु कसे अमर कराया ब्रम्हदेव चुकले
गहन गती कर्माचि सर्वजण पुर्वी फळ विकलें
॥ चाल ॥ संपविला अवतार धन्यानीं म्हणे गंगूहैबती
ध्वज पडले उलथुनी थडकल्या सुरु साहेब नौबती
कोण करिल प्रतिपाळ तुर्त मुलखास लागली बती
॥ चाल ॥ महादेव गुणीराज श्रुति गादिचे
नवे नुतन नव्हती शाइर जादिपवादिचे
पीळ पेच अर्थ अक्षरांत वस्तादिचे
प्रभाकराचें कवन प्रतिष्ठित सभेंत गायाला
अशा कवीची बुज नाहीं कोणि करायाला ॥ ११ ॥

---

## पोंवाडा.

पूर्वी पेशवाईत शिमग्याचे रंगपंचमीस श्रीमंतांनीं आपल्या प्रजेबरोबर रंग खेळावा अशी चाल असे. हा रंग खेळण्यास रंगपंचमीस मोठी सरकारस्वारी निघत असे. तिजविषयीं खालीं लिहिलेल्या पोवाड्यांत वर्णन आहे.

धन्यधन्य धनिसवाई माधवराव प्रतापी अवतरले ।
कीर्ति दिगंतर करुनि कुळामधि ॥ सर्व पुरुष अवतरले ॥
एकाहुनि एक मंत्रि धुरंधर ॥ बुद्धीबळ शहाणे ठरले ।
दौलतिचा उत्कर्ष दिसांदिस ॥ नाहि दरिद्री कुणि उरले ।
शालीवाहान शक पाहुनि नर्मदा ॥ जाऊनि जळिं घोडे विरले ।
देति मग कारभार श्रीमंतांशी शरण आले नृपपृथिवी वरले ॥
॥ चाल ॥ करुनि मराठी पोषाक खुप जरतरिचे ।
नित्य नवे महोत्साह होति खुप गजरातिचे ।
तऱ्हेतऱ्हेचे रंग तमाशे नित्य होति दरबारांत ।
श्रीमंताचा संकल्प असा कीं रंग करावा शहरांत ।
जसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनिं द्वापारांत ।
तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगांत अति अर अदरांत ॥ धृ० ॥ १ ॥
कल पाहुन मरजिचा बरोबर रुकार पडला साऱ्यांचा ।
सकळ सिद्धकळा संपूर्ण पुण्यामधिं बेत अधिक कारभाऱ्याचा ।
पुढें मुख्य अंबारि झळाळे मागे थाट अंबाऱ्याचा ।
चंद्रबिंब श्रीमंत अवंतर प्रकाश पडला ताऱ्याचा ।
हंडे हौद आणि पायदळांतर पाउस पडे पिचकाऱ्यांचा ।
धुमाधार अनिवार मार बंबाच्या फटकाऱ्यांचा ।
नरवीर जसे काहि केवळ कृष्ण अरजुन ।
बोलति भाट जनविध कीर्ति वर्णुन ।
निघालि स्वारी शनवार पेठ वर्जुन ।

नारि घरोघर झुरझुरक पोलुव सजुनि उभ्या शृंगारांत ।
गुलाल जरदा पक्के दुतर्फा [illegible] रिचविति शहरांत ।
जसा रंग श्रीरंग ॥ २ ॥

सलाम मुजरे सर्व राहिले राव रंगाच्या छंदांत ।
हास्यवदन मन सदोदित शोभे शूर शिपायी वृंदांत ।
दोहिदोहि हांति मुठी भरी गुलाल दिल छत दिसे लाल खुपबुंदांत ।
तक्रावे झिलपेच नाचती सगुणनार आनंदांत ।
॥ चाल ॥ बाळाजि जनार्दन रंगामधिं रंगले ।
रंगाचेपाट चौरस्त्यान चालले ।
कितिएक भरविले गुलालान चौक बंगले ।
॥ चाल ॥ सगुण गुणी जन्मले कुळदीपक महादजी बाबा हुजऱ्यांत ।
तलवार बहादुर शूर शिपायी मुगुटमणी सरदारांत ।
जसारंग—॥ ३ ॥

गाडे भरुनि रंगाचे सज्जुनि सर्व निघाले स्वारींत ।
गुलाल गोटे शिवाजि टीळे निरनिराळे अंबारींत ।
धरि आप्पा बळवंत मेंधळे चौरि वारि मिजाशींत ।
लाल कुसुंबी रुमाल उडती घडोघडी मेहेरपगारीत ।
॥ चाल ॥ भलेभले घोडे खंदामधें घालिती ।
बारगीर बिनिवरी ध्वजरक्षक चालती ।
संपूर्ण भिजविले जनरंगा खालती ।
॥ चाल ॥ नेत्रपाणि वारिती झालिरे झाली गरदी बहु बुधवारांत ।

झुकत झुकत समुदाय चालती स्वारि आली रविवारांत।
जसारंग ॥ ४ ॥
आधिच पुणें गुलजार तशामधि अपूर्व वशिवला आदि-
तवार।
चंद्रबिंब श्रीमंत अवंतर यादव मिळाले दळ फार।
हरिपंत तात्याने उडविला रंग केशरी अनिवार।
हास्यवदनं राजेंद्र मुखावरि शेला लाविती वारंवार।
पाटील बोवाने शिबिरा नेउनि रंग केला जोरावार।
वस्त्र आणि किनखाप वांटिती ठाण कुणाला गजवारं।
॥ चाल ॥ उलटी स्वारी मग महताबा लाऊन।
नजराणे येति मग वाड्यामधे घेऊन।
महादेव गुणराजछंदी करितो वाड्यांत।
॥ चाल ॥ प्रभाकराचें कवन फाकलें सहज सभोंवती श-
हरांत। जसारंग—॥ ५ ॥

## खर्ड्याचे लडाईवरचा पोंवाडा.

या लढाई सारखा जय आणि नफा पेशव्यांस कोणतेच लाढाईपासून मिळाला नाहीं. पेशवे आणि निजाम् यांचे बहुत दिवसांचें वैर या लढाईपासून मिटलें. निजामास फार दिवस खुमखूम होती कीं, पेशव्यांशीं लढाई करून त्यांची धुळधाण करावी! व असा सल्ला त्याचा प्रधान त्यास देत असे, परंतु या लढाईचा परिणाम त्याचे उलट झाला. निजामाचा प्रधान मश्रुल्‌उल्‌मुल्क यास शहाणपणाची फारच घमेंडी होऊन पेशव्याचे वकिलाजवळ एकदां नाना फडनविसास तो कांहीं टाकून बोलला. त्यावरून पेशव्यांचे दरबारीं लढाई करण्याचा बेत ठरून सर्व सिद्धता झाली. त्या वेळीं नाना फडनविसाचा केवढा मरातब होता हें या पोंवाड्यावरूनच समजून येईल. आपले सर्व सरदार बोलावून आणू-

न युद्धास निघाले. युद्धसमयीं तर नानानीं खुद्द गोळे टाकण्यास सांगू-न निजामाचा पूर्ण पराजय करून त्याच्या प्रधानास कैद करून आणिले. व निजामापासून विपूल खंडणी घेऊन जयजयकार करीत परत पुण्यास आले. ही लढाई सवाई माधवरावाचे कारकिर्दींत झाली. परंतु अजूनपर्यं-त तिचें नांव घेतांच हिंदूंस स्फुरण चढत आहे. पानपतचे लढाईंत जो कांहीं अतोनात तोटा पेशव्यांस झाला होता तो या लढाईंत मात्र कांहीं भरून मिळाला असें पुण्याचे दरबारांतील मंडळीस वाटूं लागलें होतें. ही लढाई सन १७९५ मध्यें झाली.

पहिला पोंवाडा सगनभाऊनीं केला आहे.

दुसरा पोंवाडा बाळा लक्ष्मण यानें केला.

तिसरा पोंवाडा आनंदफंदीकृत आहे.

### खडर्याची लढाई शके १७१७ सालीं झाली.

होणारा सारिखें निजामालिला पुढें आठवलें.
एकांतीं अष्टउमराव मिश्री बैसुनि खलबत हें मिटाविलें,
ठायिठायीं सुभ्यांला पत्र लिहुन सांडणी स्वार पिटाविलें;
यंदांची पुण्यावर मोहीम निजामालिनें जहान उठविलें
(चाल) ठायिंठायीं जमाबंदीचें चाललें कलम फौजेचें
राऊत पायदळाचें शेरे झटतिल त्या लोकांचे.
(चाल) धरिला पुण्याचा सुमार, बेदर सोडुनियां मोहरे.
मुलतानि ठोकिले डेरे, तोफा ओढिल्या बाहेर,
(चाल) मुद्दाम दक्षिणेवरती मोहीम झाली;
बाधोनि पुण्यावर कमर चढती झाली.
घेईन हिंदुपद म्हणतो निजाम अल्ली.
कुचावर कूचरे, कुचावर कूच, पाहिना फिरून.
तलवार पुण्यावर धरून, मोगल आला चढाई करून ॥
॥ ध्रु० १ ॥

येणार पुण्यावर मोगल ही बातमी अगोदर होती.
दरकुच मुक्काम डाकीनें डाक नानाला येऊन पोहोंचती.
ब्राम्हणी राज्य कैदवार, एकापेक्षां एक मसलती.
वाड्यांत सुभ्यांच्या खलबत, श्रीमंतांची चढती रती.
(चाल) रात्रीचा मनसुबा केला, वर्तमान दिलें अवघ्यांला
कारखाने ज्याचे त्याला, जरिपटका हरिपंताला.
(चाल) नेमणूक हुजरातीची मराठी नेक नोकेची.
तलवार विश्वासाची, त्या परशराम भाऊची.
(चाल) पानसे, पुरंदरे, रास्ते, आणिक ढमढेरे.
जागा पाहून मैदान पुण्याबाहेर
दिले गारपिरावर दरबार डेरे.
निघाले बाहेर रे, निघाले बाहेर कधिंना फिरून.
तलवार पुण्यावर० ॥ २ ॥

राव रंभे सरदार पांढरे, डफळे, मानकरी;
जाधव, चवाण, घोरपडे, घाटगे, लगे भडकतील जरी;
रणनवरे गायकवाड, वासेडे, बाणकरी.
हे सुभे रोखून मोगलांकडे उभे आपुलाल्या बाजुवरी.
(चाल) इतमाम ज्याचा त्याला, मराठे मुसलमानांला,
चालती कोरबंदीला, दाटती माडमाडीला.
(चाल) मारती तीस हजार चाले पठाणांची तलवार.
लश्कर सोडुनिया मोहोरे चालिलें लुटित पेंढार.
(चाल) गारदी, आरब, सिद्दि आणिक पायदळ.
बाणाचे उंटावर कैंचे दारूगोळे
दर तोफेसंगें हत्ती, छकडयांची माळ.

धासत पडली रे, धासत पडली देशावरून.
तलवार पुण्यावर० ॥ ३ ॥

बावन पागा खासगी छबीना डेऱ्या भोंवता उभा.
शिंद्याच्या सातशें तोफा, बरोबर कंपू सवता सुभा.
आली नागपुराहून फौज भोसल्याचा बाणाची तबां.
पेंढार बासडीवाला होळकर शत्रूला दबदबा.
(चाल) उमराव बलावुनी अवघे, हुद्दे ज्याच्या त्याच्या मागें
पायदळ तोफां संगें; टाकिलें पिछाडिस बुणगें.
(चाल) बिनि दौलतराव शिंद्याला,
कुच करोनि मोहोरे आला सिमेवरता तळ दीला;
मग जिवबा दादा आला.
(चाल) तिनलाख मिळाली छान पेशवेशाई,
प्रतिनिधीबरोबर माधवराव सवाई.
ही कृपा शाहु राजाची ब्राम्ह बाच्छाई.
लढाई मारूं रे लढाई मारूं एकदां सरून,
तलवार पुण्यावर ॥ ४ ॥
होते वकिल मोंगलाकडिल पत्र पाठविलें तपशिल लिहून,
नानाचा अवघा खेळ, बरोबर श्रीमंताला घेऊन.
तिन लाख जाण हिंदुंचा पडला सीमेवरता येऊन,
जसे शाण्णव कुळिचे भूपाळ, भगवा झेंडा घेऊन.
(चाल) नानानें हुकूम केला, तोफांचा बांधा किल्ला.
म्हणे परशराम भाऊला, सांभाळा श्रीमंतांला.
(चाल) एकदां झुज मारावें, मोगल मागें सारावे.

गादिचें नांव राखावें, अवघ्यांनीं यश हें घ्यावें.
(चाल) श्रीमंतांची पहिली चढती स्वारी;
चाकरी हुजुर, बक्षिसी करा तलवारी.
तारिल या समयातुन विठ्ठलहरी.
प्रसंग वाईटरे, प्रसंग वाईट जाइल हरून.
तलवार पुण्यावर० ॥ ५ ॥

केलें कुच निजामालिनें पुढें खरड्यावर चालुन आला.
दिले डेरे मैदानांत पराड्या किल्याच्या बाजुला.
झाले मोगल तयार, तोंड लागलें प्रहर दिवसाला.
आपा बळवंत, बाबाफडके, जखमा परशराम भाउला.
(चाल) पठाणांनीं गर्दी केली, मग चढला निजामाली;
सांडणी बातमी आली, लष्करांत गलबल झाली.
(चाल) नानांनीं हुकूम केला, त्या दवलतराव शिंद्याला
भोंसला नागपुरवाला, मग होळकर तयार झाला.
(चाल) बावनपागा हुजरांत खासगीवाले
डंक्यावर टिपरी पडतां हुशार झाले.
पेंढार घांट रोखुन उभें भोंवताले.
उठा नानाच्या रे, उठा नानाच्या हुकुमावरून,
तलवार पुण्यावर० ॥ ६ ॥

झाला हुकूम तोफखान्याला, किली जिवबादादाचे हातीं
कंपुच्या झडती लइन गोळ्या जणूं गाराशा वर्षती
भोसला शर्थबाणाची केली, गर्दी लावूनबती
टाकीली फौज भाजून मोगल येतो काकुळती.
(चाल) नानाचा हुकूम झाला, तोफांवर घोडे घाला.
चहूंकडून उठला हल्ला, एकदांच हरहर केला.

(चाल) गर्दी पाहून घाबरा झाला, मग नबाब मागें सरला.
खरड्याचा सुमार धरिला, जाऊन किल्ल्यांत शिरला.
(चाल) बेजार मार मारून मोगल केले,
पेंढार पळा देइना उभे भोवतालें,
घेती लुटून मारती घपाघप भाले;
लागले पाठी तोफा भरून ,
तलवार पुण्यावर० ॥ ७ ॥
दौलत केली खराब, मोगल खड्यावर घातला.
भवताल्या लाविल्या तोफा, जिवबादादा आणिक
भोसला.
कंपुचा पहारा खडा, गोळा पेंढारानें साधिला.
जीत धरितों निजामालीला,
(चाल) केली गर्दी मराठयांनीं, बुडवितात मुसलमानी.
जासूद पिटिले नानांनीं नको देऊं तिळमात्र, कोंडापाणी
(चाल) पत्रामधिं नाना बोले, जें व्हायाचें तें झालें;
शत्रूला कैद केलें, हें यश आम्हाला आलें.
जय अपेश परस्वाधीन बसल घसरा,
(चाल) हा मोगल अजिंक्य वीर प्रतापी दुसरा;
दक्षिणेंत केवळ असामी नाहीं दुसरा.
आब राखावा, आब राखावा कीं जावें मरून,
तलवार पुण्यावर० ॥ ८ ॥
काय कडबा दाणा बंद काडलें पाणी कहर वर्षला.
झाले मोगल बेजार, मरूं लागले, आले कौलाला.
दरम्यान मिश्री घेऊन करा भरपाई सोडा मला.
नानाला धाडिलें पत्र, घ्यावी खंडणी होऊंदे सल्ला.

(चाल) याप्रमाणें करार झाला; मग दिवाण हवाली केला,
आले घेऊन मुक्कामाला, सोडिला निजामअल्लीला.
(चाल) फौजेचा उठविला वेढा सोडून खडर्याचा वाडा.
आले बाहेर सुटला घोडा, मग पळतां जीव थोडा.
(चाल) हिंदुनीं उतरला चिरा, घेतली ढाली.
धरली बेदरची वाट, रेवडी झाली.
दरकुच्याने कुच करून पळतो निजामअल्ली
ताब हिंदुनिं रे, ताब हिंदुनीं घेतला हिरून,
तलवार पुण्यावर० ॥ ९ ॥
आले यश रावसाहेबाला; लौकीक नानाचा चहूकडे
दक्षिणेंत झाले महाशुर; जरब नानाचा डंखा झडे
आले जेर करूनी मोगले; निशाण जरिपटका चाले पुढें.
कालुकर्णे वाजे होती; नौबत हत्तीवर चौघडे
(चाल) शत्रुवर बोलबाला आले करून शहरपुण्याला
यशवंत तलवारीला चालती भिऊन गार्दीला
(चाल) ज्यानीं ज्यानीं समशेर केली
बक्षिसी तयाला झाली खुपलुटला निजामाल्ली
कैकाची दरिद्र हरली
(चाल) रावतुर्कीत रंगबाजी गातो शाकी
कवि आपा यशवंता धरितो बाकी
कवि हसेन कलगी वाल्यावर करितो नोकी
शिरोशिरताज गातो भरून ॥ तलवार० ॥ १० ॥

## पोवाडा

(खड्यीच्या लढाईवर.)

श्रीमंत महाराज पेशवे अमोलीक सुरती मोती ।
सवाइ माधवराव सवारी निघाली नबाबावरती ॥ ध्रु० ॥
मिळून फौजा ऐकुन घ्याव्या नामी नामी सरदार ।
रघुजि भोसले दौलतराव शिंदे तुकोजी होळकर ।
प्रथम दिवशीं सशे अपाजी बळवंतराव मुजमुद्दार ।
सखाराम पानशे परशरामभाऊ भले हैत झुंजणार ।
राऽस्ते लक्षुमण ऐका बाबा फडके बिनीवर ।
गणपतराव सवती भेरी अणि खांबाशी शाळुकर ।
मानकरी मराठे लोक ऐका त्यांचा विस्तार ।
मालोजी घोरपडे आदी नाइक राजे निंबाळकर ।
सोनवळे सरकले वाघमारे सयाजी भापकर ।
गोविंदराव चवाणे हैबतराव नांदुरकर ।
मालवणीचे दाजीसाहेब चौराज्यामधि महशुर ।
श्रीमंताच्या बावन पागा त्यामधिं बावन सरदार ।
शिंद्याचे सरदार जीउबा दादा वीर एक भारती ।
पन्नास हजार फौज फिरंगी तिन कंपू संगें जाती ॥ १ ॥
भोसल्याचे खासे विठ्ठलपंडित पठाण ।
भले मर्द शिपाइ रणामधिं भिडे जैसे पंचानन ।
पन्नास हजार फौज तुकोजी होळकराचें संतान ।
गाजविली तलवार रणामधि भले शिपाइ ब्राम्हण ।
गणपतराव सवती भेरी पंधरा हजार तिघेजण ।
शिवाय मराठे लोक बरोबर फिरंगी दहा पलटण ।
हपाशियान आरबी परदेशिक कइएक जाती ।

सवाईमाधवराव पेशवे नित मुजरा घेती ॥ २ ॥
पहिली श्रीमंताची स्वारी पाहुन निघाली मुहूर्त ।
निघाली बाहिर तमाशा पहाती मग जणूं लोक ।
सफेत पोशाक अंगावर घालून गहिना जडित ।
दंडिं पाचरत्नाच्या पेटचा सोन्याचीं कडिं हातांत ।
सोन्याचें पडदळें गळ्यामधि शिपाइबाणा शोभत ।
सजून हत्ती राव खुशि बघती राव बसले अंबारींत ।
वसूनशानी दाजी फडके वर चौरी उडावित ।
चोपदार छडिदार पुकोरां 'नका बोलूं' ललकारित ।
दोहों बाजूनीं उभे शिपाई रामराम मुजरा घेत ।
ऐशी फौज चालली दर्यामधि सागर हालवीत ।
बारा कोस लांबी रुंदी ज्या फौजेचा तळ पडती ।
दरमजली दर कुच चालून आले नागलवाडी वरती ॥
॥ ३ ॥
मंगळवारीं नबाबांनीं पुढें धाडिलें सेनेस ।
कळलें श्रीमंताला बोलुन नेले आपल्या सरदारास ।
कशी करावी मसलत नबाब जाइन म्हणतो पुणीयास ।
परशरामभाऊ म्हणे कि मारू मरू जरी या समयास ।
नानाफडणिस सखाराम पुसती जिउबा दादास ।
जिउबा बोले गर्जुन मोगल काय आणिला जिन्नस ।
उडविन बाविस टोप्या झेंडे नेउन लाविन आकाशास ।
केलीं वस्त्रें पांच जणांसीं दिली आज्ञा झुंजायास ।
पेंढाऱ्याच्या लष्करावर जाऊन ताकिद करिती ।
ज्याची लुट त्याला मुबा कुणी कुणाच ना घेती ॥ ४ ॥

मोडल्या पालख्या हत्ती येऊन पळायन करिती ।
कुणी करीना त्यांची गणती कुणी कुणाला ना पुसती ।
बाराशें तोफेचे गोळे चवदाशें बाण सुटती ।
तलवारीने कईक मेले कइक घायाळ तिथे घुमती ।
पडली गांठ पेंढाऱ्यांची ते हिसकुन घेऊन जाती ।
श्रीमंतानीं नबाबाला खरड्यावर केली जप्ती ।
कइक झाले अमर कइकाच्या तोंडीं पडली माती ।
रुपयाचें तांब्याभर पाणी त्यामध्यें अर्धी माती ।
दाहा पांच सर्दार मिळून नबाबास अर्जव करीती ।
नानाभाऊनीं चालवलें तें चालावें कोण्या रीती ।
बाळा लक्ष्मण गातो पवाडा हमेश बसुनीया एकांतीं ।
उलटले वकील कागद नबाबास वाचून दाविती ।
पासष्ट लाखांची जाहागीर मश्रुमुउलमुलूक द्यावा हातीं
॥ ५ ॥

*मोगलाचे उजवे बाजुला जिवबादादाचें[1] लष्कर ।
भरून तोफा तयार मागें लाऊन दिलें पेंढार ।
आघाडीला परशुरामभाऊ[2] झेक त्याची तलवार ।
सीतर पहाड पहा जिवबादादा कंबरक्यांत सोडी बार ।
धडाधडा तोफेचे बार लागतां पडति स्वार ।
घ्या घ्या म्हणुन घाव घालती रक्ताचे वहाती पूर ।
पळाया कोठे रीघ दिसेना मध्यें शीरलें पेंढार ।
भाल्यानें टोचून पाडिती लुटुन घेतलें लष्कर ।
भामलसे शेनखान बसून हौद्यांतून मारीती तीर ।
आले हानार त्या दोघावर चालविले वार ।
त्यावरले मग रावरंभानें भली गाजविली तलवार ।

---

* हीं इतकीं अधिक कडवीं दुसऱ्या एका प्रतींत आम्हांस आढळलीं आहेत.

१. शिंद्यांचा सरदार. २ हे पेशव्यांचे सेनापती होत.

सवाईमाधवराव पेशवे नित मुजरा घेती ॥ २ ॥
पहिली श्रीमंताची स्वारी पाहुन निघाली मुहूर्त ।
निघाली बाहिर तमाशा पहाती मग जणूं लोक ।
सफेत पोशाक अंगावर घालून गहिना जडित ।
दंडिं पाचरत्नाच्या पेट्या सोन्याचीं कडिं हातांत ।
सोन्याचें पडदळें गळ्यामधि शिपाइबाणा शोभत ।
सजून हत्ती राव खुशि बयती राव बसले अंबारींत ।
बसूनशानी दाजी फडके वर चौरी उडावित ।
चोपदार छडिदार पुकोरां 'नका बोलूं' ललकारित ।
दोहों बाजूनीं उभे शिपाई रामराम मुजरा घेत ।
ऐशी फौज चालली दर्यामधि सागर हालवीत ।
बारा कोस लांबी रुंदी ज्या फौजेचा तळ पडती ।
दरमजली दर कुच चालून आले नागलवाडी वरती ॥
॥ ३ ॥
मंगळवारीं नबाबांनीं पुढें धाडिलें सेनेस ।
कळलें श्रीमंताला बोलुन नेले आपल्या सरदारास ।
कशी करावी मसलत नबाब जाइन म्हणतो पुणीयास ।
परशरामभाऊ म्हणे कि मारू मरू जरी या समयास ।
नानाफडणिस सखाराम पुसती जिउबा दादास ।
जिउबा बोले गर्जुन मोगल काय आणिला जिन्नस ।
उडविन बाविस टोप्या झेंडे नेउन लाविन असमानास ।
केलीं वस्त्रें पांच जणांसीं दिली आज्ञा झुंजायास ।
पेंढाऱ्याच्या लष्करावर जाऊन ताकिद करिती ।
ज्याची लुट त्याला मुबा कुणी कुणाच ना घेती ॥ ४ ॥

मोडल्या पालख्या हत्ती येऊन पळायन करिती ।
कुणी करीना त्यांची गणती कुणी कुणाला ना पुसती ।
बाराशें तोफेचे गोळे चवदा सें बाण सुटती ।
तलवारीने कईक मेले कइक घायाळ तिथे घुमती ।
पडली गांठ पेंढाऱ्यांची ते हिसकुन घेऊन जाती ।
श्रीमंतानीं नबाबाला खरड्यावर केली जप्ती ।
कइक झाले अमर कइकाच्या तोंडीं पडली माती ।
रुपयाचें तांब्याभर पाणी त्यामध्यें अर्धी माती ।
दाहा पांच सर्दार मिळून नबाबास अर्जव करीती ।
नानाभाऊनीं चालवलें तें चालावें कोण्या रीती ।
बाळा लक्ष्मण गातो पवाडा हमेश बसुनीया एकांतीं ।
उलटले वकील कागद नबाबास वाचून दाविती ।
पासष्ट लाखांची जाहागीर मश्रुमूउलमुलूक द्यावा हातीं
॥ ५ ॥

*मोगलाचे उजवे बाजुला जिवबादादांचें[1] लष्कर ।
भरून तोफा तयार मागें लाऊन दिलें पेंढार ।
आघाडीला परशुरामभाऊ[2] झेक त्याची तलवार ।
सीतर पहाड पहा जिवबादादा कंबरक्यांत सोडी बार ।
धडाधडा तोफेचे बार लागतां पडति स्वार ।
घ्या घ्या म्हणुन घाव घालती रक्ताचे वहाती पूर ।
पळाया कोठे रीघ दिसेना मध्यें शीरलें पेंढार ।
भाल्यानें टोचून पाडिती लुटुन घेतलें लष्कर ।
भामलसे शेनखान बसून हौद्यांतून मारीती तीर ।
आले हानार त्या दोघावर चालविले वार ।
त्यावरले मग रावरंभानें भली गाजविली तलवार ।

* हीं इतकीं अधिक कडवीं दुसऱ्या एका प्रतींत आम्हांस आढळलीं आहेत.

१. शिंद्यांचा सरदार. २ हे पेशव्यांचे सेनापती होत.

चारपांचशें लोक पाडले भले शिपाई रणशूर ।
परशुरामभाऊचे पुतणे बळवंतराव झाले ठार ।
चार प्रहर झुंज झाली साहा घटका चढली रात्र ।
तरी तोफेचे गोळे राहीना नबाव झाला मग जार ।
नबाब कहे रावरंभाकु "क्यां हुवा मुजेपर कहर ।
बचाव जान आवतो मेरी चल जलदी तो खरडेपर "।
वाचवला नबाब बाजी न आले परतुन खरड्यावर ।
जळता चंद्रजोती । नबाब गेला निघुन देखुन फौजा भोंताल्या पळती ॥ ६ ॥
मोडल्या पालख्या पडले उंट हत्ती सरदार किती ।
कोण करीत गणीत याची कोण कोणाला ना पुसती ।
बाराशें तोफेचे गोळे चौदाशें बाण सुटती ।
तोफांच्या धोधाट्याखालीं गाई बैल घोडे पळती ।
गांवगांवचे आले लुटारी ती धरून घेऊन जाती ।
पडली गांठ जर पेंढाऱ्यांची धन तेही स्वता नेति ।
कैक झाले गबर कैकांच्या तोंडीं पडली माती ।
लुटला दारू गोळा खजिना हत्यारांस नाहीं गणती ।
खरड्यावर नबाबाभोंवती श्रीमंताची झाली जप्ती ।
रसत पांणी बंद केली रुपये शेर दाणे विकती ।
रुपयाचें तांब्याभर पाणी त्यामध्यें अर्धी माती ।
तानवार झाला येकच कहर फौजा तटातटा मरती ।
दहापांच सरदार मिळुन नबाबास अर्जी करीती ।
करा सल्ला नाहीं तर पाण्याविना फौजा मरीती ।
उमजला नबाब वकील पाठविले रावसाहेबा[1]प्रती ।
गेले वकील रावसाहेबापुढें जाऊन मुजरे करीती ।

---

१. सवाई माधवराव पेशवे.

टाकिले कागद साके म्हत लिहून पुढें लिहून ठेविती ।
जे मागाल ते देऊं साहेब सांपडले तुमचे हातीं ।
नाना[1] भाऊने[2] चालवलें तुम्ही चालवा तेंच रीती ।
रावसाहेब नाना फडनीस मग बसून मनसुबा लिहिती ।
पासष्ट लाखांची जहागीर मसरीमुलुख दे म्हणती ।
आले परतुन वकील कागद नबाबास वाचून दाखवती ।
नबाब म्हणे बरें झालें मसरीमुलुख दे हातीं ॥ श्रीमंत ॥ ७ ॥
सोडला नबाब रावसाहेबाचा झाला लौकीक ।
पांसष्ट लाखांची जहागीर दिला धाडून मसरीमुलुख ।
निघाला मोंगल भागा[3] नगराचा धरला रोंख ।
दरकुच दरमजलीने चालेल श्रीमंतांचे चालले कटक[4] ।
झाले दाखल पुण्यावर मुजरे करीती पाहुन जन लोक ।
यशवंत महाराज सवाई माधवराव झाले अधिक ।
केल्या मेजवान्या सरदारां दिले पोषाख ।
जरी झोंक कडीं तोडे कंठीं चौकडे दिले हत्ती घोडे मुलुख ।
शालिवाहान शके १७१६ चा शिमगा ऐक ।
आन प्रसरी लुर लाख सरज्यावर गोगुलस ।
गुरुदत्तात्रय माहुरगडी शिष्याशीं दिली भाक ।
चिमणराव रंगनाथ हरीचरणीं ठेऊनीया मस्तक ।
गांव पाटुंदे बीड प्रमाणें वाजरच्या तडाका ।
दुस्मानावर कमचा उडतां त्यासी पडला धाक ।
राणुगुदाजी गदाजी गडगा वनहार दासीबाणा जरी झोंक ।
खंडु फकीरा फुलनाथ गोसांवी डफ घेऊन हातीं ।
साहेबखान गातो बानीवर गावया पळोन जाती ॥ ८ ॥

---

१. बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब. २. सदासिवराव भाऊ. ३. हैदराबाद. ४ सैन्य.

## पोंवाडा.

### खरड्याच्या लढाईवर.

श्रीमंत सवाई नांव पावले, दिव्य तनु जशी चित्रबाहुलें, विचित्रपुण्य जरी समावलें, नाना ते राज्याचे आवले, विधात्यानें नेमून ठेविले, बसल्याजागी कैंक छपविले, उन्मत्त जाले तेच खपविले, अतिरति कूल दोरींत ओविले, जगवायाचे तेच जगविले, मग तमाम शत्रु नागविले, तपसामर्थ्यें पेश लपविलें, दिल्ली अग्रावर झेंडे रोविले, अटक करनाटकांत भवले, जिकडे पहावें तिकडे उदवले, माधवराय पुण्याचीं पाऊलें, टिपूसारिखे मुठींत घावले, मेणापरीस मृदु वांकविले, सवाई तेजापुढें धाकले, पुण्य सबळ उत्कृष्ट फांकलें, नाना पुढें बुद्धीवान् चकले, कैंक त्याची तालीम शिकले, तरी ते अपक्क नाहीं पिकले, ज्याणीं दहावीस वर्षे स्वराज्य हांकिलें, श्रीमंताचें तक्त राखिलें, अक्कलवंत कोठेहीं न थकले, श्रीमंत गर्भी असतां एकले, नानानीं राज्य ठोकून हांकिले, माझे करून महाभाव केले, जहाज बुद्धिबळें जवकलें, यावतकाळ पावेतों टिकलें, श्रीमंत पाहून धनवर छकले, छोटेखानी कैंक दबकले, जे स्वामी चरणास लुबकले, ते तरले वरकड अंतरले, मीपणांत जे गर्वें भरले, ते नानानीं हस्तकीं न धरले, ते साहेब सेवेंत घसरले, मग त्यांचे पुण्योदय सरले, न जन्मले माते उदरीं, घाशिराम कोतवाल त्यावर उलथून पडली ब्रम्हपुरीं ॥ सवायी माधवराव सवायी भाग्योदय ज्याचे पदरीं यशवंत श्रीमंत पेशवे अपेश तेथें पाणी भरी ॥ १ ॥

श्रीमंताचें पुण्यसबळ कीं, न्यूनपडेना, पदार्थ एकही, महान्न झाले भिन्नमनोमय खिन्नकरूनीया, शत्रुच्या शकले, मधें मधें एक चिन्ह उदवलें, नवाब झाला सिद्ध करू म्हणे राज्य आपण पृथ्वीचें सारें, गरिबाचे मोडून-पसारे, वकील धाडूनिया परभारे, हळूच लावले सारे दोरे, म्हणे युद्ध करा धरा हत्यारें, त्यामुळें विरश्रीच्या मारे, शहर पुण्याच्या बाहेर डेरे, गारपिरावर दिधले डेरे, श्रीमंताला जैजैकारें होळकरास धाडिले बलाऊन, छोटे मोठे समग्र येऊन, वडिलपणानें जयसंपादा, पाटील गेले ते विष्णुपदा , जबर त्याची सबसे ज्यादा, गादीवर दवलतराव शिंदा, बहुत शिपायांचा पोशिंदा, त्याच्या नांवें करूनी सनदा, लष्करी एकही नाहीं अ-[१]जुरदा, त्याचे पदरचे जिवबादादासुद्धां आणविले, परशरामभाऊ मिरजवाले, नागपुराकडून आले भोसले, बाबा[२]फडके, अपा[३]बळवंत बजाबाबापू, शिलोरकर माधधवरावरास्ते, राजबहादर, गोविंदराव पिंगळे विठ्ठलसिंग आणिक देवरंगराव वढेकर, गोडबोले राघोपंत जयवंत पानशे, मालोजीराजे, घोरपडे, दाजीबा पाटणकर अष्टप्रधानांतील प्रतिनिधि फाकडे मानाजी मागून आले चक्रदेव, नारोपंत भले दाभाडे निंबाळकर हे उभेच ठेले, रामराव दरेकर चमकले, वकील रामजी पाटील झुकले मग याशिवाय चुकले मुकले कोण पाह्याला गेले आपले, तमाम पागेपतके बेरोजगारी घेऊनी कुतके अचाट फौजा मिळून आले वळून गेले जुळून संगम झाला. तिलक्षाचा एकच ठेला त्यामधीं नाना ते कुलक-

१. दुःखी. २ हरीपंत फडक्याचे हे चिरंजीव. ३ मेहेंदळे.

ह्ला होणारी शंकर नाना बंदुखानी तोफा कर्णाला, वाद्यें रणभेरी कर्णाला, गणिता नाहीं श्यामकर्णाला, मरणाला ना भीत घोडे पुढें धकाऊनीं नाना सहवर्तमान पुण्यांत आले राउत तमाम दुनिया आली पाह्याला कन्हया माधवराव फुलाचा झेला, पेशव्यानीं कुच केला, सर्वेचि मोगलही सावध झाला याचा त्याचा पाण्यावरूनी तंटा झाला, तो तंटा नित्यानीच वाढला, श्रीमंतांनी करूनी हल्ला, घ्या घ्या म्हणून कैक धुडावून दिले लुढाऊन मोगल गोगलगाय करूनिया पृथ्वी देयीना धाय मोकली धाय करीत हाय हाय तेव्हां लेंकरा विसरली माय कैक जरबानें खालीं पाहे कीं सर्पासन्निध उंदीर गाय असा मृदु मोगल केला शरण आला मग मरण कसें चिंतावें त्याला उभयतां पक्षी सल्ला झाला पुढें मग महाल मुलुख कांहीं घेतो देतो श्रीमंताला ते आपल्याला कोण सांगतो आतां पुढें जें उडेल मातु[1] तेव्हां कळेल की अमके महाल अमके धातु[2] पडली पांतु[3] नबाबाला रहस्य राखून रंग मारला पुढें [4]ठेविली अस्ता रस्ता धरून पुण्याचा थाट दुरस्ता नबाबावर करवस्ता फिरून आले वळून एक एक नानापरीच्या वस्ता सस्ता दाणापाणी वाद्यांसहवर्तमान मश्रुमुलुख कैद करूनिया श्रीमंतानी कैरागृहीं ठेविलां एथूनी पवाडा समाप्त जहाला सबशहरी संगमनेरी फंदी अनंत कटिबंद छंद ललकारी श्रीमंतादरबारी ॥ सवायी माधवरावसवायी भाग्योदय ज्याचे पदरीं यशवंत श्रीमंत पेशवे अपेश तेथें पाणी भरी ॥

---

१ बातमी. २ नाणें. ३ दक्षिणा. ४ हा पोंवाडा लढाई समाप्त होतांच केला असावा.

काव्य २८

## पोंवाडा

(खर्ड्यांच्या लढाईवर.)

( हा पोंवाडा एप्रिल सन १८७८ चे विविधज्ञानविस्तारचे अंकांत छापला आहे तो येथें जशाचा तसाच सादर केला आहे. )

दैन्यदिवस आज सरले। सवाई माधवराव प्रतापी कलियुगांत अवतरले ॥ ध्रु० ॥ भूभार सर्वहराया। युगायुगीं अवतार धरी हरी दानव संहाराया ॥ कलियुगीं धर्म तराया। ब्राम्हणवंशीं जन्म घेतला रिपुनिर्मूळ कराया ॥ सुकीर्ति मागें उराया। सौख्य दिलें सर्वांस अहारे सवाई माधवराया ॥ चाल १ ॥ धन्य धन्य नानाचें शहाणपण। बृहस्पति ते बनले आपण। गर्भीं प्रभुचें पाहुनि रोपण। तेव्हांच केला दुर्घट हा पण। आरंभिलें मग रक्षण शिपण। सरदारांचें घालुन कुंपण। आपल्या आंगीं ठेऊन निरूपण। हरिपंतांना करुनि रवाना ॥ ॥ चाल २ ॥ दादासाहेब मागें वळविले। लगट करुनि फौजांनीं मिळविले। आपुल्या राज्यापार पळविले। कांहीं दिवस दुःखांत आळविले। इतर कारणीं भले लोळविले। लोहोलंगर पायांत खिळविले। ठेऊन गडावर चणे दळविले। बंदिवान तेथेंच खपविले ॥ ॥ चाल ३ ॥ बंड तोतया सहज मोडिला। एक एक त्याचा मंत्री फोडिला। जमाव ठायिंचे ठायिं तोडिला। अडचणजागीं मुख्य कोंडिला। शहराबाहेर नेउन झोडिला। जो नानांनीं पैसा जोडिला। तोच प्रसंगीं हुजूर ओढिला। लागेल तितकें द्रव्य पुरविलें ॥ चाल ४ ॥

तळेगांवावर[1] इंग्रज हरला । इष्टुरसाहेब[2] रणींच विरला । उरला इंग्रज थांट उतरला । सरंजाम गलबतांत भरला । रातोरात मुंबईत शिरला । सर्वेच गांढर[3] पुढेंच सरला । शिकस्त[4] खाउन तोही फिरला । फिरून पुण्याकडे कधीं पाहिना ॥ चाल ५ ॥ अशी रिपूची मस्ती जिरविली । शुद्ध बुद्ध पहा त्याची हरली । कारभाऱ्यांनीं पाठ पुरविली । पुण्यामधें आमदानी करविली । पुरंधराहुन स्वारी फिरविली । पर्वतीस मग मुंजे[5] ठरविली । गजराची भिक्षावळ मिरविली । कालूकर्णे[6] वाजंत्री वाजती ॥ चाल ६ ॥ लग्नें[7] चिंठ्या देशावर लिहिल्या । ब्राम्हणास पालख्याश्व वहिल्या । पाठविल्या बोलाऊं पाहिल्या । पठाण मोंगल साहित साहिल्या । छत्रपति रोहिले रोहिल्या । भोंसल्याच्या मौजा पाहिल्या । आणिक किती नांवनिशा राहिल्या । कवीश्वराची नजर पुरेना ॥ ॥ चाल ७ ॥ आरशाचे मंडप सजविले । चित्रें काढून चौक उजविले । थयथयात जन सर्व रिझविले । गुलाब

---

१. सन १७७९ चे जानेवारीचे ६ वे तारखेस इंग्लिश लोकांची व पेशव्याचे फौजेची येथें चकामक झडली. पुढें इंग्लिशांचा पराभव होऊन त्यांस वडगांव येथें तह करणें भाग पडलें. हें सैन्य मुंबई सरकारानें राघोबादादाचा पक्ष धरून पाठविलें होतें.

२. क्याप्टन स्टुअर्ट हा मुंबईचे सैन्याबरोबर होता. हा कारली या गांवीं तोफेची गोळी लागून सन १७७९ चे जानेवारीचे ४ थे तारखेस मेला.

३. जनरल् गोडार्ड् यास राघोबादादाचे मदतीस बंगाल्यांतून पाठविलें होतें. त्यास सन १७८१ त मुंबईकडे पिछेहाट करावी लागली.

४. पराभव.

५. सवाई माधवरावांची मुंज शके १७०१ म्हणजे सन १७७९ सालीं झाली.

६. सनई व चवघडा.

७. माधवरावाचें प्रथम लग्न शके १७०४ म्हणजे सन १७८२ त झालें.

आणि अत्तरें भिजाविले। शिष्टशिष्ट शेवटीं पुजविले। रुपये होन मोहरांनीं बुजविले। श्रीमंत कार्यार्थ देह झिजविले। यशस्वी झाली सकळ मंडळी॥ चाल ८॥ सत्राशें[1] सातांत बदामी। हल्ल्याखालीं केलि रिकामी। एक एक मोहोरे नामी नामी। फार उडाले रणसंग्रामीं। बाजीपंत अण्णा ते कामीं। हरीपंत तात्याचे लगामीं। परशुरामपंत त्या मुकामीं। स्वामीसेवक बहुत जपले॥ ॥ चाल ९॥ गलीमास कांहीं नव्हते भेऊन। पराक्रमानें किल्ला घेऊन। अलिबेक्षावर[2] निशाण ठेऊन। पुण्यास नानासहीत येऊन। श्रीमंतांनीं वाड्यामधें नेऊन। पंचामृतीं आनंदें जेऊन। बहुमानाचीं वस्त्रें देऊन। बोळविले तयांला॥ चाल १०॥ सत्राशें तेरावें वरीस। अवघड गेलें पहिल्यापरिस। करनाटकच्या[3] पहा स्वारीस। टोपीकर[4] मोगल[5] पडले भरीस। तरी तो टिपु येइना हारीस। त्यावर तात्या[6] गेले परीस। आणुन टिपु खुब

१. सन १७८६ चे मे महिन्यांत. २. जरीपटक्याचे हत्तीचें नांव.

३. कर्नाटकावर स्वारी सन १७९० त झाली. तिकडे निकाल होण्यास दोन वर्षं लागलीं.

४. इंग्रज लोक. या स्वारींत हिंदुस्थानचा गवरनर जनरल लार्ड कॉर्नवालिस याणें सैनाधिपत्य घेतलें होतें.

५. हैदराबादवाले निझाम अली, हैदराबादेचा निझाम, याचा दुसरा मुलगा शिकंदरजहा हा या स्वारींत होता.

६. प्रथमतः पेशवे यांजकडून परशुराम भाऊ पटवर्धन सैन्यावर मुखत्यार होते. बरेच दिवस झाले तरी टिपू हटेना म्हणुन हरीपंत तात्या फडके यांस तिकडे रवाना केलें. ते ३०,००० लोक बरोबर घेऊन सन १७९१ चे प्रथम दिवशींच पुण्याहून निघाले. पुढें पेशवे, मोंगल व इंग्रज यांचे सैन्याशीं टिपूच्या दोन तीन लढाया झाल्या त्यांत टिपूचा पराभव होऊन त्यास सन १७९२ त तह करावा लागला. नंतर हरीपंत पुण्यास आले.

तळेगांवावर[1] इंग्रज हरला । इष्टुरसाहेब[2] रणींच विरला । उरला इंग्रज घांट उतरला । सरंजाम गलबतांत भरला । रातोरात मुंबईत शिरला । सवेंच गांढर[3] पुढेंच सरला । शिकस्त[4] खाउन तोही फिरला । फिरून पुण्याकडे कधीं पाहिना ॥ चाल ५ ॥ अशी रिपूची मस्ती जिरविली । शुद्ध बुद्ध पहा त्याची हरली । कारभाऱ्यांनीं पाठ पुरविली । पुण्यामधें आमदानी करविली । पुरंधराहुन स्वारी फिरविली । पर्वतीस मग मुंजे[5] ठरविली । गजराची भिक्षावळ मिरविली । कालूकर्णे[6] वाजंत्री वाजती ॥ चाल ६ ॥ लग्नांचे[7] ठ्या देशावर लिहिल्या । ब्राम्हणास पालख्याश्व वहिल्या । पाठविल्या बोलाऊं पहिल्या । पठाण मोंगल साहित साहिल्या । छत्रपति रोहिले रोहिल्या । भोंसल्याच्या मौजा पाहिल्या । आणिक किती नांवनिशा राहिल्या । कवीश्वराची नजर पुरेना ॥ ॥ चाल ७ ॥ आरशाचे मंडप सजविले । चित्रें काढून चौक उजविले । थयथयात जन सर्व रिझविले । गुलाब

---

१ सन १७७९ चे जानेवारीचे ६ वे तारखेस इंग्लिश लोकांची व पेशव्याचे फौजेची येथें चकामक झडली. पुढें इंग्लिशांचा पराभव होऊन त्यांस वडगांव येथें तह करणें भाग पडलें. हें सैन्य मुंबई सरकारानें राघोबादादाचा पक्ष धरून पाठविलें होतें.

२. क्याप्टन स्टुअर्ट हा मुंबईचे सैन्याबरोबर होता. हा कारली या गांवीं तोफेची गोळी लागून सन १७७९ चे जानेवारीचे ४ थे तारखेस मेला.

३. जनरल् गोडार्ड् यास राघोबादादाचे मदतीस बंगाल्यांतून पाठविलें होतें. त्यास सन १७८१ त मुंबईकडे पिछेहाट करावी लागली.

४. पराभव.

५. सवाई माधवरावांची मुंज शके १७०१ म्हणजे सन १७७९ सालीं झाली.

६ सनई व चवघडा.

७. माधवरावाचें प्रथम लग्न शके १७०४ म्हणजे सन १७८२ त झालें.

आणि अत्तरें भिजाविले। शिष्टशिष्ट शेवटीं पुजविले। रुपये होन मोहरांनीं बुजविले। श्रीमंत कार्यार्थ देह झिजविले। यशस्वी झाली सकळ मंडळी॥ चाल ८॥ सत्राशें[1] सातांत बदामी। हल्लचाखालीं केलि रिकामी। एक एक मोहोरे नामी नामी। फार उडाले रणसंग्रामीं। बाजीपंत अण्णा ते कामीं। हरीपंत तात्याचे लगामीं। परशुरामपंत त्या मुकामीं। स्वामीसेवक बहुत जपले॥ ॥ चाल ९॥ गलीमास कांहीं नव्हते भेऊन। पराक्रमानें किल्ला घेऊन। अलिबंक्षावर[2] निशाण ठेऊन। पुण्यास नानासहीत येऊन। श्रीमंतांनीं वाडच्यामधें नेऊन। पंचामृतीं आनंदें जेऊन। बहुमानाचीं वस्त्रें देऊन। बोळविले तयांला॥ चाल १०॥ सत्राशें तेरावें वरीस। अवघड गेलें पहिल्यापरिस। करनाटकच्या[3] पहा स्वारीस। टोपीकर[4] मोंगल[5] पडले भरीस। तरी तो टिपु येइना हारीस। त्यावर तात्या[6] गेले परीस। आणुन टिपु खुब

---

१ सन १७८६ चे मे महिन्यांत. २. जरीपटक्याचे हत्तीचें नांव.

३. कर्नाटकावर स्वारी सन १७९० त झाली. तिकडे निकाल होण्यास दोन वर्षं लागलीं.

४. इंग्रज लोक. या स्वारींत हिंदुस्थानचा गवरनर जनरल लार्ड कॉर्नवालिस याणें सैनाधिपत्य घेतलें होतें.

५. हैदराबादवाले निझाम अल्ली, हैदराबादेचा निझाम, याचा दुसरा मुलगा शिकंदरजहा हा या स्वारींत होता.

६. प्रथमतः पेशवे यांजकडून परशुराम भाऊ पटवर्धन सैन्यावर मुखत्यार होते. बरेच दिवस झाले तरी टिपू हटेना म्हणुन हरीपंत तात्या फडके यांस तिकडे रवाना केलें. ते ३०,००० लोक बरोबर घेऊन सन १७९१ चे प्रथम दिवशींच पुण्याहून निघाले. पुढें पेशवे, मोंगल व इंग्रज यांचे सैन्याशीं टिपूच्या दोन तीन लढाया झाल्या त्यांत टिपूचा पराभव होऊन त्यास सन १७९२ त तह करावा लागला. नंतर हरीपंत पुण्यास आले.

जेरीस । साधुनि मतलब हरिपंतांनीं ॥ चाल १ ली ॥ नंतर मागें फिरले । दरकुच येउन पुण्यास प्रभुचे चरण मस्तकीं धरिले ॥ दैन्य० ॥ १ ॥

केवढें भाग्य रायाचें । चहुंकडे सेवक यशस्वी होतीं हें पुण्य त्या पायांचें ॥ करितां स्मरण जयाचें । कांहीं तरि व्हावा लाभ असें बलवत्तर नांव जयाचें ॥ प्रधानपद मूळ याचें । सत्राशें चवदांत मिळालें वजीरपद[1] बा-

---

१. दिल्लीचा पादशहा दुसरा शहा अलम याणें पेशव्यास "वकील ए मुतालिक" हा किताब सन १७८४ त दिला. तो तीन निरनिराळ्या वेळीं बहाल होऊन सन १७९२ त सवाई माधवराव र्‍हा. J. M. पुणें मुकामीं घेतला. या संबंधानें जी सनद पेशवे यांस आली ती फार्शी भाषेंत लिहिली आहे. ती व तिचें भाषांतर हीं इतिहासांतून लिहिलेलीं दृष्टीस पडत नाहींत म्हणून येथें वाचकांकरितां उतरून घेतों. "अमाइत बे अयालत मर्तबात हपमत बे षौकत मंजिलत जुबदय विफके षान दौलत खाह उमदय खैर अंदपाने बिला इष्तिबाह कसीरुल इक्तिदार अफिदत दिसार सईफे मसलुले मैदान षुजात रुमदे मसकुले मिजमार जलादत मदार असनाफे अवताफ मोहब्बत अन्वाये अलताफ मवरदे इनायत जिल्ले मषमूल अवातिफे जामिल् वकीले मुल्क अमिरुल उमरा मुखतारुल मुमालिक मदारुल मोहम सलतनत उमदय आराकिनें खिलाफत यार वफादार सिदह शिलार सआदतमंद बजान् पयवंद फरदंदे खासुलखास मेलाजदेह महाराजाधिराज पंडित परधान सवाई माधवराव नारायण बहादुर फिदिये शहाआलम पादषाहे गाजी." याचें भाषांतर—"मानकरीपणा व संपात्ते यांचे अधिकारी, सेना व संपत्ति यांचें स्थान, मित्रतेचे चिन्हानें चिन्हितांतील केवळ सार, राज्याभीष्टचिंतक, निःसंशपणें कल्याण इच्छकांतील अत्युत्तम, विश्वासवृद्धिकारक, भरंवशाचें चिन्ह आहे ज्यास, रणभूमीवर केवळ नग्न तलवार, रणकंदनांतील महाशूरत्वाचे केवळ तीक्ष्ण धारेचा भालाच, महाश्रेष्ठ, परमविश्वासू, स्नेहभावाचे सुलक्षणाचा आसमंतात् भाग, नानाप्रकारचें कृपापात्र, सर्व कृपा उतरण्याचें स्थान, कृपेचे छायेनें वेष्टित, अति सर्वोत्तम, देशसंबंधी स्वतंत्रपणें काम चालविणार, सर्व अमीरांचे अमीर, सर्व देशाचा स्वसत्तात्मकपणें कारभार चालविणारे, दौलतीचे सर्व कामाचा भरंवसा आहे ज्यांवर, राज्याधाराचे केवळ स्तंभच अशा सर्व कारभारी मंडळींतील अति सर्वोत्तम, स्नेहभाव सिद्धिस नेणारा सुमित्र, सेनापति, सुदैववान्, केवळ जिवलग, सरकारचे केवळ सुनिश्चित पुत्र, उपायसूचक, असे जे महाराजाधिराज सवाई माधवराव नारायणराव पंडित प्रधान महापराक्रमी हे शहा अलम पादशाहा महायोद्धा याचे सेवक."

च्छायाचें ॥ चाल १ ॥ मुगुटमणी ते पाटिलबावा[1] । कोठवर त्याचा प्रताप गावा । दर्शनमात्रें तापच जावा । नवसनवसितां फळास यावा । हरहमेशा शत्रुसिं दावा । माहित सगळा मराठी कावा । हुशार फौजा लढाई लावा । जिंकुन हिंदुस्थान परतले ॥ चाल २ ॥ चवदा वर्षें बहुत भागले । म्हणून शिरस्ते पाहुन मागले । तरतुदीस कारभारी लागले । उंच उंच पोशाग चांगले । देउन फार मर्जीनें वागले । भेटीसमयीं जंबुर[2] डागले । मग तोफांचे बार शिलगले । सूर्यबिंब अगदींच झांकलें ॥ ॥ चाल ३ ॥ राव जेव्हां नालकींत[3] बसले । कृष्ण तेव्हां ते जनास दिसले । अर्जुन पाटिलबावा भासले । पांयपोस[4] पदरानें पुसले । चरणीं मिठी माराया घुसले । कर प्रभुनीं बगलेंत खुपसले । इमानी चाकर नाहींत असले । धन्य धनी आणि धन्य दास ते ॥ चाल ४ ॥ दोन्हीं दळें या सुखांत दंग । त्यावर झाला अमोल रंग[5] । गुलाल आणि अनिवार पतंग । पळसफुलाचा नाहीं प्रसंग । मस्त चालती पुढें मातंग । कोतवाल घोडे करिती ढंग ।

---

१. महादाजी सिंदे हे आपली लीनता दाखविण्याकरितां आपणास 'पाटिल' म्हणवून घेत असत.

२. हत्ती किंवा सांडणी यांजवर नेतां येतील अशा लहान तोफा.

३. पादशहाकडून किताबाबरोबर जे नग व पोषाख आले त्यांपैकीं एक 'नालकी' होती.

४. माहादाजी शिंदे यांणीं आपली लीनता दाखविण्याकरितां ही युक्ति केली. ही प्रसिद्ध आख्यायिका 'मध्य हिंदुस्थानचे इतिहासांत' लिहिली आहे. पृ० १०८. तीच गोष्ट येथें गोवून लिहिली आहे.

५. पादशहाकडून किताब मिळाला त्याबद्दलचे आनंदप्रदर्शनार्थ हा रंग झाला.

राज्य प्रभुचें असो अभंग । अहर्निशीं कल्ल्याण चिंतितो ॥ चाल ५ ॥ गुलाम सोदे बुडवुन पाजी । पंतप्रधान राखुन राजी । लष्कर दुनया करुन ताजी । शके सत्राशें पंधरामाजीं । माघमासीं भली मारुन बाजी । पाटिलबावा सुमर्द गाजी । अगोदर गेले विष्णुपदाजी । शरीर वानवडीस ठेउनी ॥ चाल ६ ॥ सवाचार महिन्यांचें अंतर । हरिपंत तात्या गेले नंतर । तेथें न चाले तंतरमंतर । वर्तमान हें एक अधिकोत्तर । कांहीं न करती नाना उत्तर । दिलगिर मर्जी सुकलें अंतर । हिरे हरपले राहिले फत्तर । तरी तो पुरुष धिराचा ॥ चाल ७ ॥ दौलतीचे आज खांबच खचले । लाल होते ते कोठेंच पचले । शिपायांचे काय चुडेच पिचले । परंतु नाना नाहीं कचले । कडोविकडीचे विचार सुचले । कलमज्यारीचे घटाव मचले । मोंगलावर मोरचे रचले । जिकडे तिकडे झाली तयारी ॥ चाल ८ ॥ पुकार पडला पृथ्वीवरती । सैन्य समुद्रा आली भरती । आगाउ खर्चीं मोहरा सुर्ती । रात्रंदिवस श्रम नाना करती । कशी ही मोहिम होइल पुरती । राव निघाले सुदिनमुहुर्ती । लिंबलोण उतरितात गरती । इडापिडा काढून टाकिती ॥ चाल ९ ॥ गारपिराच्या मग रोखांना । तमाम रिघला फरासखाना[१] । उजव्या बाजूस जामदारखाना[२] । डावेकडे तो जेंवरखाना[३] । देवढीबराबर सराफखाना[४] । चकचकीत खुब सिलेखा-[५]

१. तंबु, बिछाइत वगैरे ठेवण्याची जागा. शिबिरशाला.

२. पोषाग वगैरे ठेवण्याची जागा.

३. दागदागिने ठेवण्याची जागा. रत्नशाला. ४. तांबूलशाला.

५. चिलखते व वस्त्रं ठेवण्याची जागा.

ना । मधें रायाचा तालिमखाना । खळ खळ खळ लेजिमा वाजती ॥ चाल १० ॥ वाड्याबाहेर जिन्नसखाना । पदार्थ भरपुर मोदीखाना । मागें उतरला उष्टरखाना[1] । डेऱ्यासंनिध नगारखाना । तऱ्हेतऱ्हेचा शिकारखाना । बाजाराच्या पुढें पिलखाना[2] । दिला बिनीवर तोफखाना । मोठ्या मोठ्या पल्ल्याच्या जरबा ॥ चाल १ ली ॥ चोंहोंकडे लोक पसरले । नित्य नवे गणतीस लागती एकांडे देशावरले ॥ दैन्य० ॥ २ ॥

बहुत शिंदे जमले । शिलेपोस[3] पलटणें लाविती पठाण जरीजे समले[4] ॥ रणपंडित तगमले । भले भले पंजाबी ज्वान दक्षणेंत येउन रमले ॥ ज्यांपुढें शत्रु दमले । त्यांणीं शतावधि कोस स्वामिकार्यास्तव लौकर क्रमले ॥ चाल १ ॥ आधींच दौलतराव[5] निघाले । काय दैवाचे शिकंदर ताले । फौज सभोंवतीं जमून चाले । खांद्यावरतीं घेउन भाले । सर्व लढावया तयार झाले । जिवबांदादा[6] गर्जत आले । हासनभाई उज्जनीवाले । महाराजाचे केवळ कलिजे ॥ चाल २ ॥ बाळोबांस[7] तर

१. उंट बांधण्याची जागा.

२. हत्ती बांधण्याची जागा. गजशाला. ३. चिलखतें.

४. पटके. बंगाली लोक जो एक पटका बांधतात त्यास 'शमला' म्हणतात.

५. महादजी शिंदे वानवडीस वारल्याचें वर आलेंच आहे. त्यांचे मागून त्यांचा धाकटा पुतण्या आनंदराव म्हणून होता, त्याचा मुलगा दौलतराव गादीवर आला. त्या वेळीं त्याचें वय सुमारें १५ वर्षांचे होतें. याची सर्व कर्तबगारी, शौर्य, हीं शेवटले बाजीराव यांचे कारकीर्दींत दृष्टोत्पत्तीस आलीं.

६. जिबवादादा बक्षी हा शूर पुरुष शिंद्यांचा कारभारी व सेनापती होता. हा सन १७९६ चे अखेरीस मेला.

७. बाळोबा तात्या हाही शिंद्याचे कारभाऱ्यांपैकीं होता. या पुरुषाचा बाजीरावास गादीवर बसविण्याचे खटपटींत बराच संबंध होता.

काळिज नाहीं । धीट रणामधें उभाच राही । धोंडिबास जगदंबा साही । जय करण्याची चिंता वाही । सदाशीव मल्हार कांहीं । मागें पुढें तिळमात्र न पाही । देवजी गवळी रिपूस बाही । रणांगणाचा समय साधिती ॥ चाल ३ ॥ निसंग नारायणराव बक्षी । हटकुन मारी उडता पक्षी । बंदुकीला कट पट्यास नक्षी । फते होई तों गोड न भेक्षी । रायाजी[1] पाटिल महत्व रक्षी । नित्य कल्ल्याण धन्याचें लक्षी । पिढीजाद शिंद्याचे पक्षी । केवळ अंतर रंगाजिवांची ॥ चाल ४ ॥ पेरुसाहेब[2] कठीण कठीण फिरंगी । कळाकुशलता ज्याचेअंगीं । सामायन किळकाटा जंगी । मुकीरसाहेब भले बहुरंगी । हपिसर पदरीं चंगी भंगी । जीनसाहेबाची[3] समशेर नंगी । दुर्जन साहेब झटे प्रसंगीं । झर झर झर झर बुरुज बांधुनी ॥ चाल ५ ॥ शहामतखा सरदार किराणी । बाच्छायजादे थेट इराणी । किती काबुलखंदार दुराणी । मुजफरखाची टोळी खोराणी । कडकडीत सिंगरूपची राणी । तारिफ करिती गोष्ट पुराणी । इतरांची ठेविना शिराणी । पंचविशीमध्यें ज्वान पलटणी ॥ चाल ६ ॥ एथुन सरली शिंदेशाई । होळकराची आली अवाई । तुकोजीबावांना[4]

१. रायाजी पाटील यांचे आडनांव शिंदे. वानवडी या गांवचा हा पाटील. महादजी शिंदे याचे खात्रीस उतरलेल्या सदरांपैकीं हा होता. यानें रजपुतांचा पराभव करून जय मिळविला. आग्रा हस्तगत करून घेण्याकरितां यास शिंद्यानें पाठविलें होतें, त्याप्रमाणें तें शहर घेऊन तेथील कांहीं दिवस यानें सुभेदारी केली.

२. हा फ्रेंच जातीचा शिंद्यांचा सुभेदार होता. यांचें नांव पेरन.

३ हाही शिंद्यांचे पदरचा फ्रेंच सरदार यांचें नांव जीन ब्याप्टिस्ट.

४ हा अहिल्याबाईचा दत्तपुत्र ह्या विख्यात पुरुषाविषयीं विशेष लिहिणें नको.

गुरमाई । आधींच बळ स्वारशिपाई । वारगळ बरोबर फणशे[1] जावाई । लोक हाती बुळे वाघ सवाई । वाघमारे कुळ धनगरभाई । खेरीज ब्राम्हण नागो[2] जिवाजी ॥ ॥ चाल ७ ॥ शिवाय होळकर खासे खासे । काशीबाजी तर हुंगुन फांसे । लढाईचे आणुन नकाशे । स्वस्तपणें करतात तमाशे । बापुसाहेबांना येती उमासे । मल्हारजी- नीं देउन दिलासे । जा जा म्हणती लोक वगासे । ज्या- हा मर्द तरवारकराचे ॥ चाल ८ ॥ हरजी विठूजी आनं- दराव । स्वतां धनी येशवंतराव । संताजीचें प्रसिद्ध नांव । आंबोजीचा तिखट स्वभाव । दूर नेला साधिता- त डाव । विचारी मतकर माधवराव । भागवतांनीं सो- डून गांव । तावडतोब निघाले ॥ चाल ९ ॥ महाशूर पटवर्धन सारे । ठाइं ठाइं त्यांचे फार पसारे । चिंतामण[3]- राव शूर कसारे । केवळ एकांगी वीर जसारे । परशूराम[4] रामचंद्र असारे । चहुंकडे ज्याचा पूर्ण ठसारे । आपासा[5]- हेब तोही तसारे । थरथर ज्याला शूर कांपती ॥ चाल

---

१. अहिल्याबाईची मुलगी मुक्ताबाई या घराण्यांत दिली होती, म्हणून ‘ जावई ’ हें नातें.

२. होळकराचे कारभारी.

३. चिंतामणराव पटवर्धन हे सांगली संस्थानाचे मालक. हा पुरुष फार शूर हो- ता. धोंडिबा वाघाचा पाठलाग करण्यामध्यें हे होते. हे, सवाई माधवराव, व शे- वटले बाजीराव असे तिघे एका वर्षी, एका दिवशीं व एका वेळेस जन्मले असें जुन्या लोकांचे तोंडून ऐकिलें आहे.

४. परशराम भाऊ तासगांवचे संस्थानाचे मालक. हा शूर पुरुष पेशवे यांचा सेनापति होता. मराठ्यांचा इतिहास याचे शूरत्वाचे कृत्यांनीं भरला आहे.

५. अप्पासाहेब हा परशराम भाऊंचा मुलगा. हा वडिलाप्रमाणेंच शूर होता. सवाई माधवरावाचे वेळीं टिपूवर ज्या स्वाऱ्या झाल्या त्यांत हा होता. पुढें हा बाजी- रावाचे वेळींही पेशव्यांचे कामी पडला.

१० ॥ रास्ते आनंदराव दादा । पानशांची बहु मर्यादा । विंचुरकरांमाधिं गांडु एखादा । राजा बहादर पुरुष जवादा । चौपट खर्च दुप्पट आदा । पुरंधऱ्यांची कदीम इरादा । तत्पर पेठे मोंगलवादा । ओढेकरही येऊन भेटले ॥ चाल पहिली ॥ वामोरकर सांवरले । आंबेकर आणि बारामतीकर प्रसंगास अनुसरले ॥ दैन्य० ३ ॥

खास पतक नानाचे । निवडक माणुस त्यांत पुरातन सूचक संधानाचे ॥ पद देउनि मानाचें । खुष करून बा[१]-वांस काम मग सांगुन सुलतानाचें ॥ बळ विशेष यवनांचें । हें ऐकुनि लोकांनीं सोडिलें पाणी शरीरसदनाचें ॥ ॥ चाल १ ॥ आपा[२] बळवंतराव सुबुद्ध । बिनीवाले पुरुषार्थी प्रबुद्ध । पवारांत मर्दानें शुद्ध । वाढविती भ[illegible]कर विरुद्ध । केवढ्यांना शुष्कवत युद्ध । काढिती हांडे रणीं अशुद्ध । धायगुडे निर्बाणी कुबुद्ध । शेखमिरा फौजेंत मिसळले ॥ चाल २ ॥ पराक्रमी हिमतीचे दरेकर । तसेच जाधव बुरुजवाडीकर । अमीरसिंग जाधव माळेगांवकर । सुजाण गोपाळराव तळेगांवकर । जानराव नाइकनठ निंबाळकर । शेकर सोयरे बाळो वडाळकर । करारी डफळे अनंतपुरकर । आढोव्याचे लोक इमानी ॥ चाल ३ ॥ कामरगांवकर मग बोलवले । प्रतिनिधीला किती गौरविले । हर्ष वाहाले पुढें सरसावले । रणनवरे

---

१. बाबाफडके यासच बाबूराव फडके असें म्हणतात. हा हरिपंत तात्यांचा मुलगा‘ या लढाईंत हा हुजरातीवर मुख्य होता. जरीपटकाही याचेच स्वाधीन होता.

२. आपा बळवंत मेहंदळे हा बळवंतराव मेहंदळे जे पाणीपत येथील लढाईंत पडले यांचा मुलगा. थोरले माधवरावाचे वेळीं आपा बळवंत यांस बरोबर सैन्य देऊन हैदरावर त्रिंबकराव मामा पेठे गेले होते त्यांचे मदतीस पाठविलें होते.

दचकुन धांवले। समाधान राउत पावले। बन्याबापु जसे नवरे मिरवले। शहर पुणें रक्षणार्थ ठेविले। माधवराव रामचंद्र कानडे ॥ चाल ४ ॥ सरमजामी सरदार संपले। शिलेदार मागें नाहीं लपले। धाराशिवकर लेले खपले। जमेतसुद्धां ते आपआपले। गोट गणतिला तमाम जपले। सान पदोगें निगडे टपले। खुळे वाघ आणि बाबर सुपले। भगत बडे डोबाले दिपले। जाधव काळे माळशिकारे ॥ चाल ५ ॥ खंडोजीराव गोविंद बर्वे। लाड शिरोळे धायबर सुर्वे। दाभाडच्याचा हात न धरवे। भगवंतशिंग बैसे बेपर्वे। वझरकराचा लौकिक मिरवे। खंडाळ्याचे पोशाग हिरवे। नलगे भोयते सुंदर सर्वे। सखाराम हरी बाबुराव ते ॥ चाल ६ ॥ कडकडीत हुजुरात हुजुरची। वीससहस्र जूट पदरची। राउत घोडा बंदुक बरची। केवळ आगच उतरे वरची। एक एक पागा अमोल घरची। दाद न देती देशांतरची। काय कथा त्या भागानगराची। रणांगणीं काळास जिंकिती ॥ चाल ७ ॥ दिघे फडतरे बाबरकाठे। तळापीर मानसिंग खलाटे। मारिती पुढें समोर सपाटे। निलाम कवडे जाले खपाटे। देवकांत्याचे फार हाकाटे। मुळेगांवढे करिती गल्हाटे। जगतापाचे महतर भोयटे। भले मुर्तुजा महात थडच्याचे ॥ चाल ८ ॥ गणेश गंगाधर थोरात। नीळकंठ रामचंद्र भरात। आयतुळे मान्य सकळ शूरांत बेहरे मांजरे योग्य वीरांत। राघो बापुजी रणधीरांत। येसोजी हरी सैन्य पुरांत। दारकोजीबावा निंबाळकरांत। विरश्रीत तो धुंद सग्याबा ॥ चाल ९ ॥ कृष्णशिंग हैबत-

शिंग तारे । तसेच लक्ष्मणसिंग बारे । दावलबावा महात सारे । मिळाले भापकर ते परभारे । मैराळजी पायघुडे विचारे । इंदापुरकर नव्हत बिचारे । गणेश विठ्ठल वाघमारे । बिडकर खुर्देकर आटीचे ॥ चाल १० ॥ गिरजोजी बर्गे फार दमाचे । बहादर बारगिर ते कदमाचे । आठवले तर बहुकामाचे । दुर्जनशिंग राठोड श्रमाचे । टिळे कपाळीं रामनामाचे । बिनीबरोबर ते नेमाचे । श्रीमंतस्मरणें काळ[illegible]चे । जसे दूत सांबाचे प्रतापी ॥ ॥ चाल पहिली ॥ प्रपंच वैद्य विसरले । चिलखत बदतर शिलेटोप मल्हारराव पांघरले ॥ दैन्य० ४ ॥

लष्कर सगळें गुर्कें । जरीपटक्या भोंताले घालिती गरर मानकरी गर्कें ॥ सुंदर गोरे भुर्कें । घोरपडे पाटणकर महाडिक खानवीलकर शिर्कें ॥ मुंगी मधें ना फिर्कें । चव्हाण मोहिते गुजर घाडगे निंबाळकर दे चर्कें ॥ ॥ चाल १ ॥ पुढें पसरले रिसालदार । मुसामुत्री नामदार । सय्यद अहमद जमादार । अमीर आबास नव्हे नादार । शहामीरखा ते डौलदार । इतक्यांवर ते हुकूमदार । राघोपंत ते दौलदार । तसे काशिबा बल्लाळ रानडे ॥ चाल २ ॥ गोरा मुसावास अमोल । मुसानारद तो समतोल । विनाकपंताचा गलोल[1] । आबा काळे गुणीच डोल । टोपकराचे बोलती बोल । पायदळाचा बांधुनि गोल । तंबुर तासे वाजति ढोल । उठावल्या बोरखा निशाणें ॥ चाल ३ ॥ संस्थानियाविरहित राजे ।

---

१ दगड ज्यानें फेंकतां येईल असें धमण्य.

सेनासाहेब[1] किताब साजे । राघोजीबावा नांव विराजे । बाणांचा भडमार. माजे । सरखेलांचा लौकिक गाजे । समशेर बहादर गरीब नवाजे । अकलकोटी लोक ताजे । दुर्जनशिंग रजपूत हडोटी ॥ चाल ४ ॥ दक्षण उत्तर पश्चिम भागीं । पसरुन तोफा जागोजागीं । तमाम गारदी त्याचे मार्गीं । स्वारसैन्य त्यामागें झगागी । जरीपटका तो दुरुन धगागी । कोणीच नव्हता त्यांत अभागी । त्वरित बक्षिस पावे बिदागी । जासुद सांडणीस्वार धांवती ॥ चाल ५ ॥ काय पलटणाच्या फैरा झडती । पर्जन्यापरी गोळ्या पडती । शिरकमळें कंदुकवत् उडती । छिन्नभिन्न किती होउन रडती । कितीक पाण्याविण तडफडती । कितीक प्रेतामधेंच दडती । वीर विरांशीं निसंग भिडती । सतीसारिखे विडे उचलती ॥ चाल ६॥ पाउल पाउल पुढें सरकती । घाव चुकाउन शूर थडकती । सपुत वाघापरी गुरकती । हत्यार लाउन मागें मुरकती । खुणेनें शत्रु वर्म तरकती । मोंगलबच्चे मागें खरकती । जिवबा दादा मनीं चरकती । अररररर शाबास बापांनो ॥ चाल ७ ॥ सुटती तोफा धुंद दणादण । गुंगत गोळे येती छणाछण । सों सों करिती बाण सणासण । खालेल घोडे उडती टणाटण । टपा हाणती दुरुनः टणाटण । वाजति पट्टे[2] खांडे खणाखण । नौबती झांजा झडती झणाझण । एकच गर्दी झाली धुराची ॥ चाल

---

१. हा किताब आंग्रे यांस होता. यांचा पूर्ण किताब 'सेना सरखेल' असा होता. पेशवाईत गायकवाड यांचा किताब 'सेना खासखेल' व नागपुरकर भोंसल्यांचा 'सेना साहेब सुभा' असा होता.

२ रुंदपाती, दोधारी, शेवटीं वाटोळी व सरळ अशी तरवार.

८ ॥ थोर मांडली रणधुमाळी । अगदींच बसली मग कांठाळी । फौज पसरली रानोमाळीं । लाखोलाख तरवार झळाळी । होळकराची फिरती पाळी । जिवबाची[1] मर्दुमकी निराळी । मोंगलाची केली टवाळी । सबळपुण्य श्रीमंत प्रभूचें ॥ चाल ९ ॥ अठरा घटका लाही फुटली । तोफ हजारों हजार सुटली । मिरजकरांची मंडळी झटली । भाउबरोबर निसंग तुटली । मोंगलसेना मागें हटली । त्यासमई कैकांची उपटली । पेंढाऱ्यांनीं दौलत लुटली । गबर झाले एका दिसांत ॥ चाल १० ॥ शके सत्राशें सोळा भरतां । आनंद संवत्सरही सरतां । दहा दिवस शिमग्याचे उरतां । वद्य पंचमी सुवेळ ठरतां । तीन प्रहराचा अंमल फिरतां । मोंगलाशीं प्रसंग करतां । पळाले मोंगल धीर न धरतां । चंद्रउदई खडर्यांत कोंडिले ॥ चाल १ ली ॥ गढींत खासे शिरले । मराठे मोंगल पठाण पुर्भे । इतर घरोघर भरले ॥ दैन्य० ५ ॥

बहुत खराबी जहाली । मोहोऱ्यावरची फौज सैनिकासहित रस्ते नाहाली ॥ त्यांत उन्हाची काहाली । रुपयाचें दिडशेर पाणी अशी कठीण वेळा वाहाली ॥ ती सर्व जनांनीं पाहाली । जिवबादादा परशुरामपंता-

---

१. या लढाईत परशराम भाऊंस वार लागून ते व्याकूळ झाले त्यानंतर त्यांजवर वार करणाऱ्या पठाणाचें शीर भाऊंचे वडील पुत्र हरिपंत यांनीं उडविलें. पुढें पठाण लोकांनीं हल्ला करण्याचें चालविलें. तेव्हां पेशवे यांचें सैन्य पळावयास लागलें. जरीपटक्याचे अधिकारी बाबा फडके यानींही मागें पाय काढण्याचा विचार केला. हें पाहून जिवबा दादा पुढें सरले व बाबा फडके यांस 'नामर्द आहां,' अशा आशयाचें पुष्कळ बोलून त्यांस सांगिलें कीं, 'तुम्हास भय वाटत असेल तर शिंद्यांचे लष्काराचे पाठी पडा.' पुढें ते पठाणांवर चाल करून गेले व त्यांचा त्यांनीं पराभव केला. या गोष्टीला अनुलक्षून वरची उक्ति असावी.

ची दिसंदिस बाहाली ॥ चाल १ ॥ निजाम अल्लीखान नव्हे सामान्य । बाच्छाई सुलतानांत मान्य । जुनाट पुरुषांत राजमान्य । अपार पदरीं मण धनधान्य । कोण बरोबरी करील अन्य । दैव धन्याचें मुळीं प्राधान्य । तशांत झालें अनुकुळ दैन्य । नाहीं तर घेते खबर पुण्याची ॥ चाल २ ॥ जेव्हां मारती यवन मुसंडी । तेव्हांच होई ती फौज दुखंडी । साठ सहस्र पठाण बुंडी । तिनशें तोफा थोर अखंडी । पंचरशी आणि बिडी लोखंडी । तयार दारु तिनशें खंडी । असें असुनीया दबली लंडी । धरून मश्रुल्मुलूख[1] आणिला ॥ चाल ३ ॥ संकटीं मोंगल अति पडियेला । देश होता जो तोडीस

---

१. मशीर उल् मुल्क याचें नांव गुलाम सय्यदखान. हा सन १७३४ त एलिचपूर येथें जन्मला. निझाम उल् मुल्क यांजबराबर जे कांहीं उत्तरेंतून लोक आले त्यांपैकीं याचा आजा होता. निझामाचे पदरीं प्रथमतः पन्नास रुपये दरमहाचे चाकरीवर हा राहिला. पुढें सलाबत जंगाचा धाकटा भाऊ निझामअल्ली याचा पक्ष याणें स्वीकारला. हैदराबादचे दरबारांत फ्रेंच लोकांचें वजन फार होतें. तें निझाम अल्लीस रुचत नव्हतें. त्यांचा पाय त्या दरबारांतून ज्या उपायानें निघेल तो उपाय करण्यास तो टपत असे. त्यानें फ्रेंच सरदार बुसी याचा वकील हैदरजंग यास मारिलें. त्यांत मशीर उल्मुल्क सामील होता. यामुळें निझामअल्लीची याचेवर विशेष मेहेरबानी झाली. हें त्या दरबारांतलि कांहीं मुत्सद्यांस खपलें नाहीं. त्यांनीं यास कांहीं दिवस हैदराबादचे हद्दीपार केलें होतें. पुढें सन १७८२ त हा प्रधानमंडळांत प्रविष्ट झाला. सन १७९१ सालीं टिपूवर मराठे व इंग्रज यांणीं स्वारी केली तेव्हां शिकंदरजहाबराबर हाही गेला होता. पुढें ज्या लढाईवियीं हा पवाडा आहे तिचे अखेरीस तह झाला, त्यांत मशीर उल्मुल्क यास ओलीस म्हणून पेशवे यांणीं मागून घेतलें. यासच घेण्याचें कारण हा पेशव्यांचा वकील गोविंदराव काळे याजवळ नानाफडनविसाचा उपमर्द होईल अशा तऱ्हेनें बोलला होता. पुढें पुणें मुक्कामीं असतां त्यानें बाजीरावास गादीवर बसविण्याचे खटपटींत पडून आपली मुक्तता करून घेतली व निझामअल्लीची तहाचे बिकट कचाटींतून सोडवणूक करून घेतली. हा हैदराबादेस सन १७९४ चे जून महिन्यांत परत

( पुढें चालू. )

नेला। तो तेहतीस लक्षांचा गेला। तीन कोटींचा करार केला। पण नानांनीं सिद्धिस नेला। फिरला मोंगलाचाढपेला। नक्षत्रापरी आला तजेला। त्यामधें माधव चंद्र उदेला॥ चाल ४॥ स्वारी नव्हे हें स्वयंवर झालें। श्रीमंतांस ऐश्वर्य मिळालें। अपेश अटकेपार पळालें। यादवसैन्य हरीभोंतालें। तसेंच लष्कर पुण्यास आलें। पहावया जन सर्व निघाले। दर्शन होतां शरीर निवालें। घरोघरीं आनंद माइना॥ चाल ५॥ पाहुन पूर्वापार शिरस्ते। भवानीपेठेपासुन रस्ते। दीपोत्सव शोभती दुरस्ते। शृंगारुन [illegible]तुरंगबस्ते। शहरामाजीं पदार्थ

(मागील पृष्ठावरून.)

गेला. नंतर हा पुनः दिवाणाचें काम पाहूं लागला. हा सन १८०४ त मृत्यु पावला. यानें इंग्लिशांचा पक्ष धरून त्यांचें फार साहाय्य केलें. त्या दरबारांतून फ्रेंच लोकांचें समूळ उच्चाटन करविण्यास हाच कारण झाला. या व इतर कामगिरीबद्दल यास वर्षाचे लाख रुपयांचें पेनशन लार्ड वेलस्ली यानें सन १८०० त करून दिलें. यास मशीर उल् मुल्क, अतफ जहा व अझीम उल् उमराव असे तीन किताब होते.

१. वकरे. छत्रपतीची किंवा पेशवे यांची स्वारी निघाली म्हणजे जो क्रम असे तोच क्रम प्रभाकरानें येथें धरला आहे असें नाहीं, परंतु बहुतेक सर्वांचीं नांवें मागें पुढें कोठें तरी दिलीं आहेत. स्वारीचा क्रम कसा असे याची याद देतों, कारण पूर्वीचे राजे नाहींत तेव्हां स्वाऱ्याही नाहींत. यांतील अंशतः स्वारीचा क्रम कांहीं संस्थानांतून दृष्टीस पडतो.–" (१) जरीपटक्याचे हत्ती दोन. (२) सर्व फौजेंतील निशाणें. पागा करवल लोक. लढाईत सेनाधुरंधरपदाचे अधिकारी व सेनासाहेब सुभापदाचे अधिकारी विनी रक्षणास. (३) तोफखाना, गाडया, रथ. (४) सरदार शूर हत्ती व घोडे यांवर. (५) पायदळ लोक, पटेकरी, बिंदीकरी, सांग, बरची, बाणेकरी, खासबारदार, बंदुकीचे लोक. (६) रणवाद्यें, तासे मर्फे, हलग्या, वाजंत्री शिंगाडे, करणे. (७) कोतवाल हत्ती, सांडणी, बाणाच्या कैचा. (८) खासे घोडे कोतवाल. (९) मंगलवाद्यें, शहाजाने, कालूसनया, घोडयावर नगारखाना. (१०) भाट, बंदीजन. (११) लग्या, निशाणें, बाणदार, जरित्वतोमर, भाले, बोथाट्या, चोपदार, भालदार, वेत्रधारी. (१२) जेठी व मल्ल शूर लोक पायदळाचे. (१३) अंबारींत खासे स्वारी व उजवे व डावे बाजूस मागून योग्यतेचे मानकरी."

(विष्णु गोपाळ भिडेकृत छत्रपतीचा इतिहास.)

सस्ते । पहिलवान आणि जेठी मस्ते. । खुराक त्यांना बदामपिस्ते । सदा धुंद जिलीबेंत[1] चालती ॥ चाल ६ ॥ भांड[2] भाट भालदार भैवय्ये[3] । सुस्वर गाती धाडी[4] गवय्ये । शिरापुरीचे सदा खवय्ये । मिठाई देती नित्य हलवय्ये । लोक सभोंवते किती लढवय्ये । नानासारिखे वीर संगवय्ये[5] । बलाढ्य शत्रु पराभवय्ये । धनी राव राजेंद्र कन्हय्ये ॥ चाल ७ ॥ कलगी[6] बाणा बोथाटचा दाट । बिनाइटचाचा खळखळाट । अंबाऱ्यांच[7] मागें थाट । त्या मागें हुजॅरात अचाट । सत्तर[8] हस्ती पुढें जुनाट । मधून फुटेना मुंगीस वाट । झुगारिल्या जरी दुरून ताट तरी तें खालीं कधीं पडेना ॥ चाल ८ ॥ सत्राशें सत्रामधिं स्वारी । राक्षस संवत्सरीं स्वनगरीं । उलटुनि आली घरीं माघारी । संवत् वैशाखाची बहारी । शुद्ध त्रयोदशी शुक्रवारीं । दहा घटका रात्रीच्या सुमारीं । गुढ्या उभारुन राजद्वारीं । गृहप्रवेश केला प्रभुनीं ॥ चाल ९ ॥ न्यॅहाल केले सरदारांना । दिला चौघडा मिरजकरांना । खेरीज जहागिर विंचुरकरांना । कडीं कंठ्या देउनी शूरांना । गौरवुनी नानानीं वीरांना । निरोप दिधले मग अमिरांना । गेले कृष्णाभीमातिरांना कुटुंबसुद्धां स्वस्थ नांदती ॥ चाल १० ॥ गंगुहैबती शाईर मोठे ।

---

१. परिवार. २. हिंदुस्थानांतील स्त्रीविश घेऊन किंवा एरवींच जे नाचतात व गातात. हे खुषमस्करे असतात.

३. गुजराथेंतलि नट व नर्तक.

४. मुसलमान जातीचे गवई हे स्वारींत चालत राजाचें यश गातात.

५. साहाय्य करणारा, मंत्री.

६. पताका. ७ खासगी पागा. ८ उच्चत्वास पावविलें.

कवनीं ज्यांच्या बुंद्बनोटे । महादेवाचे सवाई सोटे । गुणीराजाचे शब्द [1]शिघोटे । जसे गोडिला घिवर चिरोटे । इतर कवीश्वर केवळ गोटे । अर्थ प्रास लावितात खोटे । पगड्या फिरवुन डौल मिरविती ॥ चाल १ ॥ कैक प्रसंगीं हरले । बिनडाकिल दागिने अमोलिक प्रभाकराचे ठरले ॥ दैन्य० ॥ ६ ॥

---

### पोंवाडा.

( खर्ड्यांचे लढाईवर. )

त्रेतायुगीं शूर पाहीं । परशुराम विख्यात, कलिंत माधवराव सवाई ॥ ध्रु० ॥ एकवीस वेळां धरत्री । फरशधरें अति पराक्रमें कुंभिनी केली निक्षेत्रीं । माघ शुभनक्षत्रीं । पुरंदरीं जन्मतां दक्षिणेमध्यें राज्य येक छत्रीं ॥ नाना प्रधान मंत्री । श्रीमंत गर्भीं असतां राज्य रक्षिलें आराधुन यंत्री ॥ चाल ॥ किर्ती दिगांतरीं मिरवे । जे महा महा दळ दक्षण उरवे । करुन पुंडाई वर्तती गर्वें । अजिंक शत्रु जिंकुनि सर्वे । त्यांच्या मुखें वदविलें बर्वे । श्रीमंता सन्मुख युद्ध न करवे । स्वकरें बुद्धी शस्त्र न धरवे ॥ ॥ चाल ॥ नाना ज्ञानगभस्ती आस्ता । करी स्वराज्य न्युन न दिसतां । मुलखामध्यें चौथाई शिरस्ता । शहर पुण्यासी येती रस्ता । जयजय धर्म राज्य इंद्रप्रहस्ता । तैसे श्रीमंत तक्तीं बैसतां । संनिध नाना दिपिच्या वस्ता । मोंगलावर कंबरवस्तां । युद्धीं गवस्ता काय अवस्था । तें कथन बुध श्रवणीं वरस्ता । वाटे प्रजेशीं सौख्य समस्ता । ऐकुनि हे व्यवस्था सारी ॥ चाल ॥ आहारे आव-

---

१. सरळ.

घे भूप तयारी । पर्वतीस जाते जंवस्वारी । जगदृष्टी आदर्श आंबारीं ॥ चोपदारललकारीभारी । हारोहारी रयत व्यापारीं । सावकारीं मुजरे होता मगमान तया साहेबदरबारीं ॥ चाल ॥ नानाची चतुराई धन्य तयाचें करणें दुसरी उपमा नाहीं । फरश० ॥ १ ॥ आमृत वेळ सुमुहुर्ती । गारपिरावर डेरे दिधले शत्रुशीं बांधुन शर्ती । रणीं पण केल्या आर्थी । नानाचें शौर्य तेज जे अर्जुन जैद्रथ वधार्थी । दळ तीन लक्षांची भरती । व्हावयास नानाची धाडिलीं पत्रें देशावरती ॥ ॥ चाल ॥ कोण कोण सरदार ते नकळे । प्रळयकाळ शत्रुशीं तमले । वैकुंठीं यशाचे इमलें । बांधुन मग सुरवंशीं जन्मले । तें श्रवण करा कथनी नकळे । जरीपटक्याचे सवें नेमिलें । बाबाफडके हुजरांतीतले । मानकरी शत्रुशीं तमले । शिरी समले लाउन निकरानें ॥ ॥ चाल ॥ धायगुडे पाटणकर मानें ॥ जाधव यादव रणाभिमानें । घोरपडे केवढे मर्दाने । निंबाळकर पांढरें स्फुराणे ढमढरे बरे सत्रानें । उभे आपआपल्या बाजुनें । हुजरांतितले नामाभिधानें । किंचित थकली यथामतीनें । मध्यम पतकीं हिंदुस्थानें । विंचुरकर पवार धिरानें । उभे सडे फौजेंत भरानें ॥ चाल ॥ राजे बाहादर रंगराव होळकर स्वतां आदी उमराव । तयाचें जाहीर पृथ्वीवर नांव । प्रतापि शिंदे दौलतराव । सैन्य समुदाव समंधी ॥ ॥ चाल ॥ जिउबादादा ते रणफंदी । काबीज हिंदुस्थान सिबंदी । करुन आलें दक्षिण संधी । मिरजवाले भोसले सुबुद्धी । आपा बळवंतराव निशाधी । ते परशुरामपंत प्रतिनिधी । बजाबाबापु ते स्थीरबुद्धी । फिरंगाणीं हाप-

साणी सिद्धी । फराशीस आरबस्तानी सिंधी । चंदी चं-दावरबुंदी । कोटग्याचे नृपाळ असंख्य सवे शुरांची मांदी । धनी माधवराव त्यामधीं । प्रवर्तले मग मोंगल युद्धीं । राज्य अविंधी । बुडउन होतां किंचित आवधि । परागंदा शत्रुशीं करूं म्हणती । द्वादश कोस तळाची गणती । महा महा मागिल युद्धांती । सैन्य नकळे तें पैवस्ती । वडिल वृद्ध आश्चर्य सांगती । धन्यधन्य नानाच्या युक्ती ॥ चाल ॥ असो शत्रुच्या पराजयालागीं वेळ होती । मजलोमजलीं चढाई करुन चाललें सैन्य पुढें नेमुन सन्मुख लढाई । परशुराम० ॥ २ ॥ युद्ध प्रसंग काळीं । मोंगल दळरण युक्तीशीं सादर श्रीमंत सैन्य मुऱ्हाळी । होतां रण खंदाळी । यंत्राचे भडिमार न दिसे धुम्रें सूर्य निराळी । मोकलितां शर जाळीं । भयाभीत गज अश्व शूरशत्रु सैन्य माळोमाळीं ॥ चाल ॥ येक चरण वाद्याची घाई । वीरश्रीची घुमराई । अचळप्राय मत्तकुंजर शाई । चक्राकार उभे शूर पाई । दळ अशिलतां धरुन करा पाई ॥ चाल ॥ ठाई ठाई रथ शोभिवंत मग दाही दिशा चवताळती वारू । असी वादा असीवार तोंडाई । थाट पुढें शत्रुचा देखोन हाट करुनीया साठ तुरंगा । जाणउन मग गाठ घालिती । प्राणाशीं दुर्जीयाच्या दाउन उर्ध्व वाटमाघारे फिरतां । दाट पराक्रम तुमचा साहेब अफाट कीर्ती । वडला वडली भार असे जवपढती । चढती कळा धन्याची जाणुन वीर असे भीडती । तेथें चढती । मारुन अडती कैनरमुंडे पडती । झडती । घे यासीं येक येकासी उलटे । किंवा काळचपर सैन्यावर उलटे । पापभार शत्रु निव-

टलें फुटलें परदळ लुटलें। अवघें विटले। मोगल मल्ल युद्धासी उठले। मागें इतक्यांत यशस्वी। श्रीमंत वीर प्रगटले। बळें लगटले। खटलेखोर तो मशरुन मुलुख। त्यासी विगटले। घाबरलें दळ त्यांचें पळाया। पुढें वीर सरले। गांगरलें परिवारासहित हरिले। अवघे पराक्रम त्रिभुवनीं भरलें। जें शत्रुचें मीपण हरलें। कारागृहीं ठेवावें ठरलें। सब सैन्य जयवंतराव साहेबांचें फिरलें॥ चाल॥ विरलें जिकडे तिकडे सारें। विनहत्यारें येती शरण तृषेचें भारें। पाणी पाजुन प्राण वांचवा। म्हणती हें परभारें वार्ता। ऐकुन कानीं श्रीमंतानीं। आज्ञा दिधली नाहीं मनाई। कोणासी पाणी घ्या सर्वांशीं। इकडे आज्ञा वकिलाशीं। चवथाई आणखी माहाल मुलुख पूर्वीचा आपुला। होता तो मागुन घ्या त्याशीं। श्रीमंत आज्ञेनें बाबासी मग। वकिल भेटले। चवथाई मुलखाचें निवेदन श्रुत केलें। मग वकिल आदरें गौरविलें। त्याकरे त्वरें मग। तें कबुलायतपत्र दिधलें। वाचितांच श्रीमंत हर्षकृत मनीं झाले। जय संपादुन शहर पुण्यासी येउन आदरलें॥ चाल॥ करुन नगाची राई। जयवाद्यें वाद्यें वाजवीत परतली श्रीमंताची शाई॥ ३॥ शृंगारुन गजातें। अदर्श आंबारींत। करिती शूर मुजरे पिटुन भुजातें। उभवुन यश ध्वजातें। पुणें मार्गीं लागलें हें ऐकुन श्रवणीं सौख्य प्रजातें। आनंदरुप द्वीजातें। ठेउनया श्रीराम आले भेटायाला भरतानुजातें। स्नेहसद्गदीत नंदिग्रामीं। तैसे श्रीमंत थेऊर मुकामीं। स्वामी देखुन स्वसेवका सुख अंतरयामीं। व्योमीहुन सुरपुष्प-

साणी सिद्दी । फराशीस आरबस्तानी सिंधी । चंदी चं-
दावरबुंदी । कोट्याचे नृपाळ असंख्य सवे शुरांची
मांदी । धनी माधवराव त्यामधीं । प्रवर्तले मग मोंगल
युद्धीं । राज्य अविंधी । बुडउन होतां किंचित आवधि ।
परागंदा शत्रुशीं करूं म्हणती । द्वादश कोस तळाची
गणती । महा महा मागिल युद्धांती । सैन्य नकळे तें
पैवस्ती । वडिल वृद्ध आश्चर्य सांगती । धन्यधन्य नाना-
च्या युक्ती ॥ चाल ॥ असो शत्रुच्या पराजयालागीं वेळ
होती । मजलोमजलीं चढाई करुन चाललें सैन्य पुढें
नेमुन सन्मुख लढाई । परशुराम० ॥ २ ॥ युद्ध प्रसंग
काळीं । मोंगल दळरण युक्तीशीं सादर श्रीमंत सैन्य
मुऱ्हाळी । होतां रण खंदाळी । यंत्राचे भडिमार न दिसे
धुम्रें सूर्य निराळी । मोकलितां शर जाळीं । भयाभीत
गज अश्व शूरशत्रु सैन्य माळोमाळीं ॥ चाल ॥ येक च-
रण वाद्याची घाई । वीरश्रीची घुमराई । अचळप्राय
मत्तकुंजर शाई । चक्राकार उभे शूर पाई । दळ अशि-
लतां धरुन करा पाई ॥ चाल ॥ ठाईं ठाईं रथ शोभिवं-
त मग दाही दिशा चवताळती वारू । असी वादा
असीवार तोंडाईं । थाट पुढें शत्रुचा देखोन हाट करुनी-
या साठ तुरंगा । जाणउन मग गाठ घालिती । प्राणा-
शीं दुर्जीयाच्या दाउन उर्ध्व वाटमाघारे फिरती । दाट
पराक्रम तुमचा साहेब अफाट कीर्ती । वडला वडली
भार असे जवपढती । चढती कळा धन्याची जाणुन
वीर असे भीडती । तेथें चढती । मारुन अडती कैनर-
मुंडे पडती । झडती । घे यासीं येक येकासी उलटे ।
किंवा काळचपर सैन्यावर उलटे । पापभार शत्रु निव-

टलें फुटलें परदळ लुटलें । अवघें विटले । मोगल मल्ल युद्धासी उठले । मागें इतक्यांत यशस्वी । श्रीमंत वीर प्रगटले । बळें लगटले । खटलेखोर तो मशरुन मुलुख । त्यासी विगटले । घाबरलें दळ त्यांचें पळाया । पुढें वीर सरले । गांगरलें परिवारासहित हरिले । अवघे पराक्रम त्रिभुवनैं भरलें । जें शत्रुचें मीपण हरलें । कारागृहीं ठेवावें ठरलें । सब सैन्य जयवंतराव साहेबांचें फिरलें ॥ चाल ॥ विरलें जिकडे तिकडे सारें । विनहत्यारें येती शरण तृषेचें भारें । पाणी पाजुन प्राण वांचवा । म्हणती हें परभारें वार्ता । ऐकुन कानीं श्रीमंतानीं । आज्ञा दिधली नाहीं मनाई । कोणासी पाणी घ्या सर्वांशीं । इकडे आज्ञा वकिलाशीं । चवथाई आणखी माहाल मुलुख पूर्वींचा आपुला । होता तो मागुन घ्या त्याशीं । श्रीमंत आज्ञेनें बाबासी मग । वकिल भेटले । चवथाई मुलखाचें निवेदन श्रुत केलें । मग वकिल आदरें गौरविलें । त्याकरे त्वरें मग । तें कबुलायतपत्र दिधलें । वाचितांच श्रीमंत हर्षकृत मनी झाले । जय संपादुन शहर पुण्यासी येउन आदरलें ॥ चाल ॥ करुन नगाची राई । जयवाद्यें वाद्यें वाजवीत परतली श्रीमंताची शाई ॥ ३ ॥ शृंगारुन गजातें । अदर्श आंबारींत । करिती शूर मुजरे पिटुन भुजातें । उभवुन यश ध्वजातें । पुणें मार्गी लागलें हें ऐकुन श्रवणी सौख्य प्रजातें । आनंदरुप द्वीजातें । ठेउनया श्रीराम आले भेटायाला भरतानुजातें । स्नेहसद्गदीत नंदीग्रामीं । तैसे श्रीमंत थेऊर मुकामीं । स्वामी देखुन स्वसेवका सुख अंतरयामीं । व्योमीहुन सुरपुष्प-

वृष्टि करिताती सकाळिक । सरंजामी ते सरदार तैनामी । स्वामी संनिध शोभताती । अती सव्यवामी । कामीं पडलें रणसंग्रामी । मुहुर्त शुभपाहुन स्वधामी । यावयास जमावले । ताकीद शहरांतील । रस्ते झाडा ऐसें ऐकतां दूतधांवले । निर्मळ रस्ते करुन द्वुतर्फा । दीपलावले । नगर लोक पाहावया धांवले । पाहुन मन विश्रांती पावलें । तेसमई कोणाचे कसें जिवीं भासलें । पूर्व तपश्चैर्येचें फळ आज उद्भवलें । कीं श्रीमंत रुप या दृष्टी माजी समावलें । सर्वांनीं धन्यग्राशीं पोहोंचाविलें । वाड्यांत आनंदें बैसविलें । गादीवर साहेब । मग मुजरे करुन सकळ शुरांनीं । त्वरेनें निरोपावारे घेतले स्वनगरायीं जाया इच्छिलें । येथुन मोंगल युद्ध संपलें । श्रेष्ट भाग्य रायाचें केवढें । शके सोळाशें शहाणवांतील जन्म । धन्य तधीपासून या दिवसों दिवशीं । राज्याचीं चिन्हें दाखविली लिला । अद्भुत हे किर्ती गाजती । सरकरुनया सर्व ही शृष्टी । शके सतराशे सत्तर राक्षसनाम संवत्सरे । शुक्लपक्ष अश्विनी पौर्णिमा । ते दिवशीं सायंकाळीं मग संपाविला अवतार आपला । श्रीशांत सिद्ध कृपावरे । होनाजी बाळाकरीं कवन रसिक जें जनासी प्रियया । श्रीमंत राज्यामधीं प्रजेला । सुखापार । ऋषी महान महान कल्याण वांच्छिती । गादीचा अधिकार ज्याला लक्ष श्रीमंतापाईं । लाउनी रामा अंदु नीशिदिनी रसिक कवनरस गाई । त्रेतायुगीं शुरपाही परशराम विख्यात कलित० ॥ ४ ॥*

---

* हा होनाजीबाळकृत पोवाडा मागाहून मिळाला आहे.

## शेवटले बाजीराव पेशवे यांजवर पोवाडा.

इसवी सन अठराशें अठरामध्यें आमच्या देशांत केवढी राज्यक्रांति झाली हें सर्वांस विदित आहेच. त्याबद्दल येथें आज आम्ही विस्तार पूर्वक लिहिणें प्रशस्त नाहीं. कारण तो दुःखकारक प्रसंग येवढ्याशा चार ओळींत तो काय मावणार आहे? त्या वेळीं सर्व प्रजा दुःखानें आक्रोश करीत होती. तो प्रकार पुढील चार पोवाड्यांत फार चांगला वर्णन केला आहे. चार पोवाडे चारजणांनीं केले आहेत, परंतु त्यांतील शोक कारक स्थिति सारखीच आहे. या पोवाड्यांच्या चालीही मोठ्या हृदयास लागण्या सारख्या करुणापर अशा आहेत. म्हणून ते पोवाडे ऐकतांच हृदय अति दुःखानें भरून येतें.

यांतील पहिला पोवाडा **प्रभाकर** कवीनें केला आहे. त्याच्या नेहेमींच्या संप्रदायाप्रमाणें त्यानें साकल्य माहिती त्यांत दिली असून तो फार चांगला आणि लांबणीचा असा आहे. दुसरा **सगनभाऊ**नें केला आहे. **होनाजीबाळा**चे तीन पोवाडे आहेत. चवथा **मोतीराम**वाणी म्हणून कोणी होता त्यानें केला आहे. याखेरीज शेवटीं तीन चौक आहेत ते **सवाईफंदी**कृत आहेत.

**परशराम** कवीनें पेशवाई बुडाल्यावरील इंग्रजी राज्यरीतीचें वर्णन केलें आहे; त्यासही येथेंच स्थळ दिलें आहे.

यशस्वी झाले श्रीमंत पहिले सर्व लढायाला ।
आतांच आलें अपेश कोठुन बाजीरायाला ॥ ध्रु० ॥
दादासाहेब पुण्यप्रतापी निःशिम शिवभक्त ।
स्वारी करून दरसाल हालविलें दिल्लीचें तक्त ॥
आनंदीबाई सुशीळशिरोमणी सुगुणसंयुक्त ।
पतीभजनीं सादर घडोघडी अखंड आसक्त ॥
बाजीरावसाहेब सदोदित जो जीवन्मुक्त ।
जन्मांतरीं तप केलें निराहारीं राहुन एकभुक्त ॥

चाल ॥ शके सोळाशें शाहाण्णवीं अतिउत्तम
जयसंवत्सरीं ॥
पौष शुद्ध दशमीस भरणीनक्षत्र भौमवासरीं ॥
ठीक पहिल्या प्रहरांत जन्मले रात्रीच्या अवसरीं ।
चाल ॥ पहा बाईसाहेब धारमुक्कामीं[1] राहुनी ॥
कंठीलाकाळ कांहीं दिवस दुःख साहुनी ।
केलें तेथुन कुच सुपुत्रमुख पाहुनी ॥ चाल पहिली ॥
गंगातिरीं येऊन राहिली अपूर्व ठायाला ।
कचेश्वर शुक्रेश्वर सन्निध दर्शन घ्यायाला ॥ १ ॥
समाधान सर्वांस[2] वाटलें कोपरगांवास ।
स्वारी शिकारीस बरोबर जाती कथा उच्छावास ॥
जें करणें तें पुसून करती अमृतरावास ।
एकास नख लागल्या दुःख होई त्रिवर्गभावांस ॥
असें असुन नानानीं मांडिला अति सासुरवास ।
हळुच नेऊन जुनरास ठेविले श्रीमंतरावांस ॥
चाल ॥ इतक्या संधींत सवाई माधवराव मरण पावले ।
तेव्हांपासून नानानीं राक्षसी कपट डौल दावले ॥
परशराम रामचंद्र निरोपुन मग वाटेस लाविले ॥
चाल ॥ आले खडकी पुलावर श्रीमंतांस घेउनी ।
दर्शनास नाना परिवारें येउनी ॥
दाखविली याद एकांतीं राव नेउनी ॥ चाल पहि० ॥
भय मानुनि शिंद्याचें निघाले वांइस जायाला ।
सातार्‍यांत राहून लागले भेद करायाला ॥ २ ॥

---

१. राघोबा दादा पळत असतां आनंदी बाईस धारेस ठेविलें होतें त्या वेळीं बाजीरावाचा जन्म झाला.

२. कोपरगांवीं.

आपण बाळोबा होऊन एक केली खचीत मसलत।
चिमाण्पास धनी करून राखिली जुनाट दौलत ॥
करारांत दोघांच्या झाली कांहीं किंचित गफलत।
म्हणुनि फिरून नानानीं उलटी मारून केली गल्लत।
सूत्रधारी जो पुरुष ज्याच्या गुणास जग भुलत ॥
हातांत सगळे दोर पतंगापरी फौजा हालत ॥
चाल ॥ परशराम रामचंद्र आणि बाळोबास ठा-
उक रण।
राज्यकारणी नव्हेत एक केशरी एक वारण ॥
कठिण गांठ नानाशीं न चाले तेथें जारणमारण।
चाल ॥ महाडास बसुनि नानानीं बेत ठरविले ॥
बाळोबास शिंद्याकडून कैद करविलें।
शिवनेरी गडावर पटवर्धन धरविले ॥ चाल पहिली ॥
रास्ते झाले जामीन प्रसंगीं अवघड समयाला।
असा गुजरला वक्त नेले मांडवगण पहायाला ॥ ३ ॥
घडी बसउन महाडाहून नाना त्वरितच उलटले।
द्वेषबुद्धि विसरून संशय सर्वांचे फिटले ॥
शिंदे भोंसले होळकर मश्रुलमुल्क एकवटले।
दळबादळ डेऱ्यांत श्रीमंतासन्निध संगटले ॥
बाजीराव राज्यावर बसतां आनंदें जन नटले ॥
तोफांचे भडिमार हजारों बार तेव्हां सुटले ॥
चाल ॥ नंतर नाना एकविसांमधिं समाधिस्त झाले।
महालमुलुख शिंद्यांनीं बेविसांमधिं आपले पाहिले
यशवंतराव होळकर लढाई समजुन उभे राहिले ॥
चाल ॥ शिंद्यांनीं करून माळव्यांत खातरजमा।

१२.

केली फौज गंगेच्या रोखावर खुप जमा ॥
सोडीना कंबर कधिं काढिना पायजमा ॥ चाल पहिली
कुच मुक्काम दररोज बनेना पलंगीं निजायाला ।
घेई जोठाशीं पचंग समरीं कोण जिंकील याला ॥ ४ ॥

दिला मार दळणास जातिनें पुण्यास येउनियां ।
शहर सभोंते वेढून बसले चौक्या ठेउनियां ॥
खंडेराव रास्त्यांनीं प्रभुला वसईस नेउनियां ।
सुखांत होते स्वस्थ सतत पंचामृत जेउनियां ॥
इंग्रजास कुमकेस प्रसंगीं बरोबर घेउनियां ।
सरमजाम अलिबहादरपैकीं तयास देउनियां ॥
॥ चाल ॥ अगोदर सोजर तुरुक धांवले मघाशीं दक्षणी ।

त्या भयानें होळकर परतले नांहीं कोणी संरक्षणीं ।
भरधोशानें श्रीमंत त्यावर पुण्यास येतांक्षणीं ॥
॥ चाल ॥ मग झाला बंदोबस्त पहिल्या सारिखा ।
परि घरांत शिरला सबळ शत्रु पारखा ॥
लाल शरीर टोपी आंगीं आठप्रहर आंगरखा ।
॥ चाल पहिली ॥ धर्म कर्म ना जातपात स्थल नाहीं बसायाला ।

असें असून संपूर्ण व्यापला प्राण हरायाला ॥ ५ ॥

फार दिवस आधिं जपत होते या इंग्रज राज्याला ।
अनायासें झालें निमित्त पंढरपुरास कज्जाला ॥
संकट पडलें कांहीं सुचेना प्रधान पुज्याला ।
रति फिरली सारांश मिळाले लोक आपुज्याला ॥
भयचिंता रोगानीं ग्रासिलें काळिज मज्जाला ।

पदर पसरिती उणाख आणखी नीच निर्लज्जाला ॥
चाल ॥ परम कठिण वाटलें आठवलें त्रिभुवन राव-
बाजीला ॥
थोर थोर मध्यस्थ घातले साहेबांचे समजीला ।
निरुपाय जाणुन हवालीं केलें मग त्रिंबकजीला ॥
चाल ॥ ठेविला बंदोबस्तीनें नेऊन साष्टीस ।
एक वर्ष ठेविल्यानंतर या गोष्टीस ॥
केलें गच्छ भाद्रपद वद्यांतील षष्ठीस ॥ चाल पहिली ॥
स्वदेशीं जागा बिकट पाहिली निठुर बसायाला ।
शोध लाऊन पाठविलें साहेबानीं धरायाला ॥ ६ ॥
इंग्रजाचा अन्यायी निघाला पाठ पेशव्याची ।
म्हणून साहेब लोकांनीं आरंभिलें आगळिक दाव्याची
वसई प्रांत कल्याण गेली गुजराथ पुराव्याची ॥
रायगड सिंहगड बेलग जागा केवळ विसांव्याची ।
कर्नाटक दिल्लीहून ठाणीं बैसलीं पेशव्याचीं ।
कोणास नकळे पुढील इमारत इंग्रजी काव्याची ॥
चाल ॥ अश्विनमासीं वद्य एकादशी दोन प्रहर
लोटतां ।
श्रीमंत बापुसाहेब एकांतीं पर्वतीस भेटतां ॥
हुकूम होतांक्षणीं रणांगणीं मग फौजा लोटतां ॥
चाल ॥ बैसले राव दुर्बिणींत युद्ध लक्षित ।
भले भले सरदार सैन्य रक्षित ॥
लागुन गोळी झाले ठार मोरदीक्षित ॥ चाल पहि० ॥
तसाच पांडोबानीं केला नाहीं उशीर उठायाला ।
उडीसरशीं तरवार करून गेले लवकर विलयाला ॥
॥ ७ ॥

आला त्रास फार वाटतें ह्यावरून बक्षीस ।
विन्मुख होऊन श्रीमंत आणिले चहूंकडून स्वामीस ॥
फसले शके सत्राशें एकुणचाळिसांत रणभूमीस ।
ईश्वर संवत्सरांत कार्तिक शुक्ल अष्टमीस ॥
प्रहरदिसा रविवारीं सर्व आले आरब गुरमाईस ।
खुब मोर्चा बांधून विनविती श्रीमंत स्वामीस ॥ चाल ॥
दारुगोळी पुरवावी आम्ही आज हटकून त्याशीं लढूं ।
गर्दीस मिळऊन देउन पलटणें क्षणांत डोंगर चढूं ॥
शिपाइगिरीची शर्थ करून समशेरी सोन्यानें मढूं ॥
चाल ॥ लाविलें बापुसाहेबांनीं तोंड जाउनी ।
दीडप्रहर रात्र होतांच श्रीमंत दम खाउनी ॥
गेली स्वारी मशाला हिलाल मग लाउनी ॥ चाल प०
जलदी करुनि साहेबांनीं लाविलें निशाण पुणियाला ।
खेंचून वाड्याबाहेर काढिलें कदीम शिपायाला ॥८॥

सकळ शहरचे लोक हजारों हजार हळहळती ।
सौख्य स्मरून राज्याचें मीनापरी अखंड तळमळती ।
रात्रंदिवस श्रीमंत न घेतां उसंत पुढें पळती ॥
ममस्वरूप पलटणें मागें एकदांच खळबळती ॥
धडाक्यानें तोफांच्या वृक्ष आणि पर्वत आदळती ।
त्यांत संधि साधून एकाएकीं दुरून कोसळती ॥ चाल ॥
भणाभण झालें सैन्य सोडिली कितीकांनीं सोबत ॥
कितिक इमानी बरोबर झुकले घर टाकुन चुंबित ।
कितिक मुकामीं अन्न मिळेना गेली साहेब नौबत ॥
चाल ॥ कोठें डेरे दांडे कोठें उंठ तट्टे राहिलीं? ।
कोठें होउन सहज झटपट रक्तें वाहिलीं ॥

कोठें श्रीमंत बाईसाहेब सडी राहिली ॥ चाल प० ॥
बहुत कोमावली पहावेना दृष्टीनें भयाला ।
हरहर नारायण असें कसें केलें सखयाला ॥ ९ ॥
माघ शुद्ध पौर्णिमेस बापुसाहेब[1] रणीं भिडले ।
जखम करून जनरलास फिरतां जन म्हणती पडले ॥
गोविंदराव घोरपड्याचे दोन हात भले झटले ।
आनंदराव बाबर ढिगामधिं खुब जाऊन गढले ॥
मानाजी शिंदे मागें पहातांना डोइ देउन अडले ।
छत्रपती महराज तळावर समस्त सांपडले ॥ चाल ॥
घाबरले श्रीमंत सुचेना मन गेलें वेधुनी ॥
बाईसाहेबांना तशीच घोड्यावर पाठीस बांधुनी ।
नेलें काढुनियां अमृतराव बळवंत ज्येष्ठ बंधुनीं ॥ चाल
दहा प्रहर पुरे पंतप्रधानं श्रम पावले ।
नाहीं स्नान शमन नाहीं स्वस्थपणें जेवले ॥
आले आले ऐकतां उठपळ राव धांवले ॥ चाल प०॥
गर्भगळित जाहले लागले शुष्क दिसायाला ।
बाईसाहेबांना फुरसद न पडे बसून न्हायाला ॥१०॥
दिवाळी आणि संक्रांत कंठिला दुःखांत फालगुन ।
रागरंग नाहीं आनंद ठाऊक रायालागून ॥
सदैव चिंताग्रस्त शब्द बोलती वैतागून ।
कर जोडून फौजेस पाहिलें घडोघडी सांगून ॥
धैर्य धरून कोणी कसून लढेना क्रियेस जागून ।
कर्म पुढें प्रारब्ध धांवलें लगबग मागून ॥ चाल ॥
पांढरकवठ्यावर रिचविल्या घनगारा अद्भुत ।

---

१. जनरल स्मीथशीं बापूगोखल्यानें जो शेवटीं सामना केला होता तो येथें दाखविला आहे.

थंडीनें मेले लोक उठविलें गारपगाऱ्यांनीं भूत ॥
बेफाम होतें लष्कर नव्हती कांहीं वार्ता संभूत ॥
चाल ॥ ओढवलें कसें सर्वांचें समयीं संचित ।
कडकडून पडलें गगन जसें अवचित ॥
दुःखाचे झाले डोंगर नाहीं सुख किंचित ॥ चाल प० ॥
अनुचित घडली गोष्ट दिसेना ठाव लपायाला ।
कोणे ठिकाणीं नदींत गेलें सैन्य बुडायाला ॥ ११ ॥

जे श्रीमंत सुकुमार वनांतरीं ते भडकत फिरती ।
कळलें तिकडे भरदिवसास प्रभु कांट्यांमधिं शिरती ॥
आपला घोडा आपण स्वहस्तें चुचकारून धरिती ।
खालीं पसरून उपवस्त्र दिलगिरींत वर निद्रा करिती ॥
अस्तमानीं कधिं रात्रीं भात भक्षिती पाटावरती ।
दरकुच दरमजलीस कृपेंतील सेवक अंतरती ॥
चाल ॥ पेशव्यांचे राज्यांत असा नाहीं कहर कोणी पाहिला ।
हत्ती घोडे उंट खजीना जेथील तेथें राहिला ॥
बाजीराव होय धन्य म्हणून त्यावरी आकांत साहिला ।
॥ चाल ॥ नर्मदेस शालीवाहन शक संपला ।
त्याठायीं ठेविला शकपती आपला ॥
भरचंद्र राहुग्रहणांत जसा लोपला ॥ चाल पहिली ॥
सांब कसा कोपला लागले गलीम लुटायाला ।
सिद्ध झाले मालकमारू रावराजेंद्र मिटायाला ॥ १२ ॥

समस्त लष्कर दुःखित पाहुन श्रीमंत गहिंवरले ।
सद्गद झाला कंठ नेत्र दोन्ही पाण्यानीं भरले ॥
आम्हांपुढें जे शत्रु रणांगणीं नाहीं क्षणभर ठरले ॥

ते आमच्या जन्मास दुष्ट चंडाळ पुरून उरले ।
केवळ असा विश्वासघात केल्यानें कोण तरले ? ॥
इंद्र आदि करून आपल्या संकटास अनुसरले ॥चाल॥
तुमची आमची हीच भेट आतां राव सर्वांना सांगती ।
कृपा लोभ परिपूर्ण करित जा द्या दर्शन मागुती ॥
ऐसें उत्तर ऐकून शतावधि पायीं सेवक लागती ॥
चाल ॥ महाराज उपेक्षून आम्हांस जाऊं नये ।
दुर ढकलून शरणागतांस लावूं नये ॥
महा कसाबाचें घर गाईस दावूं नये ॥ चाल प० ॥
हिंमत सोडूं नये सर्व पुढें येईल उदयाला ।
कोण काळ कोण दिवस धन्यांनीं पुसावें हृदयाला ॥१३

प्राण असून शरिरांत बुडालों वियोग लोटांत ।
बरोबर येतों म्हणून घालिती किती डोयी पोटांत ।
निराश जाणून झाली रडारड मराठी गोटांत ।
निर्दयांनीं लांबिली पालखी पलटण कोटांत ॥
मातबर लोकांचीं ओझीं चालतात मोटांत ।
गरीब करी गुजराण प्रसंगीं एक्या जोटांत ॥ चाल ॥
कुंकवावांचून कपाळ मंगळसूत्रावांचून गळा ।
तसा सैन्य समुदाय उदाशित रंग दिसे वेगळा ॥
धर्म बुडाला अधर्म झाला दुनयेमाधें आगळा ॥ चाल ॥
कसें प्रभुनीं ब्रम्हावर्त शहर वसविलें ।
अगदींच पुण्याच्या लोकांला फसविलें ॥
हुरहूर करित कां ! उन्हामध्यें बसविलें ॥ चाल प० ॥
नाहीं तर तोंड पुढें दिसेना जीव जगवायाला ।
कोणास जावें शरण कोण हरि देईल खायाला ! ॥१४॥

विपरित आला काळ मेरुला गिळिलें मुग्यांनीं ।
पंडितांस जिंकिलें सभेमध्यें मदांध भंग्यांनीं ॥
भीमास आणिलें हरीस रंणांगणीं अशक्त लुंग्यांनीं ।
कुबेरास पळविलें अकिंचन कसें तेलंग्यांनीं ॥
जळीं राघव माशास आडविलें असंख्य जिंग्यांनीं ।
जर्जर झाला विष्णु वाहन बदकांचे दंग्यांनीं ॥चाल॥
ईश्वर सत्ता विचित्र सारें दैवानें घडविलें ॥
हरिश्चंद्र आणि रामचंद्र नळ पांडवास रडविलें ॥
फितुर करून सर्वांनीं असलें राज्य मात्र बुडविलें ॥
चाल ॥ म्हणे गंगु हैवती जर पावल शंकर ।
तर दृष्टीस पडतील पुढें राव लवकर ।
महादेव गुणी श्रीमंतांचे चाकर ॥ चाल पहिली ॥
प्रभाकराची जडण घडण कडकडित म्हणायाला ।
दुरून नारो गोविंद वंदि त्या निशिदिनीं पायांला
॥ १५ ॥

---

## पोवाडा

( बाजीरावावरचा )

गगन कडकडुन पडलें पार नाहीं दुःखाला अरे दुःखाला । श्री शैल्य मलकार्जुन आम्ही अंतरलों सुखाला ॥ ध्रु० ॥

शिरीं दुःखाचे डोंगर ग्रहदशा पाठिला ।
एक वरिस नऊ महिने प्रभुरायाच्या भेटीला ।
गाया अनाथापरी दिवस वैऱ्याचे लोटिला ।
जगन्नीवासा कां अंतरलों रेषिम गांठिला ।

आनंदांत केलें राज्य सोनें बांधून काठिला ।
दुनिया बापुडी दिसती, पैसा असून गांठिलो[1] ।
दक्षिणचें सौभाग्य गळसरी कोण्या रोहकाला ।
अरे रोहकाला । श्रीशैल्या° ॥ १ ॥
रायाच्या मनीं नवते पडूं नये उपाधीला ।
चौघांनीं भरी भरून घातली गोष्ट विषादिलो[2] ।
फुटली मुठ आवळ्याची.राव पडला आवकाळीलों[3] ।
फास करूनि केसांचे शत्रुंनीं समया साधिला ।
लक्षांचें अन्न गेलें राव अंतरले गादीलों[4] ।
एकटे पक्षावाणी उडाले टाकून मादिला[5] ।
बंगले बाग बागिचे वस्त्र लाखाचे फुकाला ।
अरे फुकाला । श्रीशैल्य° ॥ २ ॥
कशी उचलली तळी मिळालेते बाराभाई ।
परदेशीं पांखरूं कसें केलेंस विठाबाई ।
तीथवार सण कैंचा जंगल वस्ती कोण्या ठांई ।
पंचप्राण शहराकडे वढतील ओस दिशा दाही ।
आग लागली दर्यांत बुडालें जहाज ठीक नाहीं ।
वनवास आला राजेंद्राला निजली शेषशाई ।
ज्याचें होतें त्यास पारखें काळोखी मुखाला ।
अरे मुखाला । श्रीशैल्य° ॥ ३ ॥
रोजगार सावकार बंद उदम्याचीं दुकानें ।
केविलवाणे जन आपापल्या राव दुःखानें ।
नाहीं निखालस उदीम आठरा बंद कारखाने ।

---

१ यावरून पेशवाई नष्ट झाल्यावर राज्यांत पैसा विपूल होता असें दिसतें.
२ वाईट परिणामास. ३ दुर्दशेला. ४ राज्याला. ५ पक्ष्याचे स्त्रीजातीस मादी म्हणतात.

फिकीर झाली प्राप्त काळजी ज्याचा तोच जाणें ।
धड अहेव न रांडकी न कैसें केलें भगवंतानें ।
निरउपाय झाली गोष्ट कंबर बसली घोरानें ।
वडलावडली नव्हता बोल लागला हो नखाला ।
अरे नखाला श्रीशैल्य० ॥ ४ ॥
भोळा[1] माझा सांभ वामन अहो निर्मळ काया[2] ।
त्याच्या पदरचे च्यार उठले बसले बुडवाया ।
निमकहरामी झाले लक्षपती धन खाया ।
सात ताल हवेलीचा[3] ज्यांनीं ढासळला पाया ।
शिकारखाने रमणे ब्राम्हण मोकलती धाया ।
एक्या प्राण्या वांचून शहर करिती गाया वाया[4] ।
थान पितें बालक लोटून दिलेंस रघुराया ।
मी अनाथ माउली कशी नाहीं आली तुजमाया ।
रयत बिचारी लोल[5] झाली उपटली पराला ।
अरे परला । श्रीशैल्य० ॥ ५ ॥
पुण्या सारखें शहर चहुं मुलखीं दुसरें नाहीं ।
छत्रपतीचें देणें सवाई श्रीमंत पेशवाई ।
कृष्ण गोकुळीं नांदत होता तैसी सकळ शाही[6] ।
नाच तमाशे गायन करिती भोंती रोषनाई ।
शेळीनें व्याघ्रास पिटीलें राहिले ठायीं ।
आधार महाआक्रीत झाले लागले तक्ताला पाय ।
बाळा बहिरू म्हणे की धन्य ईश्वर करणी काय? ।
घोर होईल परी हरण च्यार दिवस स्वस्थ राही ।

---

१ बाजीरावास या कवीनें भोळा असें म्हटलें आहे. २ शरीर. ३ जुन्या वाड्याची ही गोष्ट असेलसें वाटतें. ४ आतां कसें करावें ? काय करावें ? असा प्रकार त्या वेळीं झाला होता. ५ पंख उपटल्यावर लोल म्हणतात. ६ राजमंडळ.

सगन भाऊ म्हणे परिसा विनंती उतरावें तुकाला। अरे तुकाला श्री० ॥ ६ ॥

---

## पोवाडा

( बाजीरावावरचा )

शके सत्राशें एकुण चाळसा मधीं ॥ ईश्वरें नाम हा बरवा संवत्सर होता तधीं ॥ झाली प्रथम लढाई दिपवाळीचे आधीं। वेळ कठीण मोठी तेंव्हांची कैकांच्या हरव्या शुधी ॥ म्यां सांगितलें रहा स्वस्थ चारदी। ऐकिलें नाहीं गडे माझें चाकरीस गेले गुणनिधी ॥ चाल ॥ टाकूनी पती मजला गेले ते परतून येतील कधीं। आजवर सोडून सखयाला राहिलेंच नवतें कधीं। आठवण तयाची होती मजला क्षणोक्षणीं पदोपदीं। बंदुकी तोफेचे गोळे येतात लष्करांमधीं। रक्ताचे पूर वाहाताती जशी भरून चालली नदी। हा पण लढाईचा भारी श्रीहरीच नेयील सिद्धी। याउपरांतीं ललाटीं नकळे काय लिहिलें सिद्धी। इश्वरि सुत्र घर ज्याचें त्याला पारखें ॥ १ ॥ पती नाहींत घरींग बाई तीळ घालूं कोणाचे मुखीं। आला संक्रांतीचा सण जीव हा दुःखी ॥ पती० ध्रु० ॥

पाहिल्या पासून श्रीमंताचें लष्कर। माहुलीवर जमाव झाला पुढें नजीक गारपिर। होते पंतप्रतिनिधी[1] सचिवें[2], स्वारी बरोबर। काळे गोविंदराव[3], बापू[4], नानाजी माणकेश्वर। होते अबा पुरंदर आणिक विंचूरकर[5]। राजे बाहादर आणि रास्ते, पटवर्धनमिरजकर[6]। मोरू

---

१ कऱ्हाडकर. २ भोरचे सचीव. ३ हे काळे पूर्वीं हैदराबादेस वकील होते. ४ गोखले सरदार. ५ विट्ठलराव नरसिंगराव हे होत. ६ चिंतामणराव अप्पा हे होते.

दीक्षित पडले प्रथम लढाईवर। ते अघाडीवरती बापू गोखले रणी रणशूर ॥ चाल ॥ पत्र धाडून निपाणींतून आणिले निपाणकर। आले अक्कल कोटचे राजे, ढमढेरे, लिंबाळकर। होळकर, दौलतराव शिंदे त्याहिंदुस्थानामधीं दूर। भोंसले न गायकवाड अशीं नांवें सांगूं कोठवर। किती वर्णूं श्रीमंत सरदार हे आणखी ॥ पती० ॥

इंग्रेजें घेऊन टेंकडी बांधलें बळ। मोर्चे साधून त्या वेळीं किंचित न मागें ढळ। होते गोसावी[1] अरब शिंदे पायदळ। एलवड्यावर पहिल्यानें जाऊनियां केलीकळ[2]। त्यामागें उभे राहिले घोडे दळ। महाकाळीच्या[3] गोळ्यानें इंग्रेजें सोडिला तळ ॥ चाल ॥ पुढें इंग्रेज चालून येतां खूप झालें रण मंडळ। त्यावेळीं अकाशीं पाहातां चंद्रानें केलें खळ। सरली फौज अवघी मागें शहरांत सुटला पळ। सावकार वाणी उदमी बैसले होऊनी निर्मळ। द्रव्याच्या शोकें करून कितीकाला भरला चळ। सोडून पुजारी गेले त्या देवाचें देऊळ। कैकांचे कुटुंबें चुकले रानांत करी तळमळ। ईश्वरि सुत्र घर ज्याचें त्याला पारखें ॥ पती० ३ ॥

बातमी स्वारीची[4] पंढरपुराकडे। लागले पलटणी मागें किंचित न मागें आड। आडू माडू शिपाइ सरदार होऊनया सडे। इंग्रेजांस घेऊन अवघे चालतात मागें पुढें ॥ चाल ॥ पलटणी कोरेगांवीं जाउनीं घातली आड। चाकणच्या किल्ल्यावरी उभयतां चारले खडे। सोईचा मारितां हात शिर जैसें चेंडू उडें। विरश्रीशूरा-

१ गोसाव्यांचीं पलटणें पेशवाईत होतीं. येथें गोसावीपुऱ्यांत जे जंगी वाडे लागून राहिले आहेत ते त्यांचेच. २ तंटा उपस्थित केला. ३ तोफ. ४ बाजीराव साहेब.

चे आंगीं सागरीं बाई भरतील हुडे। ऐकतां न बातमी ऐशी काळीज माझें धडडडे। सांगती भट ब्राम्हण मजला तुज यशवंत होई चुडे। कवी होनाजी बाळा बोले श्रीहरी नेईल सांकडें। कवी काशिनाथ ऐकतां जन हे सुखी ॥ प० ॥ ४ ॥

---

पोवाडा

( बाजीरावावरचा. )

पुणें शहर किलवाणी दिसती जागा। करुणा कां येईना तुला अरे श्रीरंगा ॥ ध्रु० ॥ जाऊन राव राहिले ब्रम्हावर्ती। वनचरा हातें पृथ्वी केली निक्षेत्री। एका प्राण्याहून सुन्य दिसे धरत्री[1]। रयतेला लागला वनवा[2] जळती अंत्रीं। राायांचे आश्रमीं ब्राम्हण गायित्री। कशी एका एकीं झाली धन्य कळसुत्री। शाहु छत्रपतीचें देणें गेलें भंगा। व्याघ्राचे घरामधीं जंबूक करितो दंगा ॥ पुणें० ॥ १ ॥ कांहींच योग्यता नाहीं राजेशाला। पंचामृत माहित नवतें मोशीम शाला। चवरंग पलंग तरी गेले! किंमत खुर्च्यांला। उन्माद सदां धुंदी मधीं दारू निशाला। भरगच्चीमंदील, चिरे, शाल, दुशाला। आल्या डगल्या टोप्या कंदील नाहीं मशाला। पालख्या अबदागिरी गेल्या माहून पागा। झाले मेणा छऱ्या जागो जागा ॥ पु० २ ॥

दक्षिणचें मंगळसूत्र कोठें दडलें?। मध्यभागीं जाऊन समुद्रीं जाहाज बुडालें। वनवास आला नळराया तसें हें घडलें। कशी एकाएकी शिरीं आकाश कडकड-

---

१ पृथ्वी. २ अग्नि.

लें। मसलत करुनी बारांनीं मधी सोडिवलें। आले निघून वनवासीं हो राव राहिले। तूं बौध्य होउन बसलाशी पांडुरंगा। अझुन सत्व किती पाहाशी होशील जागा। करुणा कां येईना तुला अरे श्रीरंगा॥ पु० ३॥

रायाचे मनामधीं नवतें दुजेपण कांहीं भरी घालून चहुंकडे गेले च्यार बाराभाई। चौमुलखीं दर्प जयाचा कीर्त सवाई। हा दर्प लोपला पर्वताची रायी[1]। असें कधींच नवतें झालें होती लाखो शाई। घटकेंत बुडाला सरली ज्याची कमाई। कवी विठ्ठल मोरू म्हणे पाहावें सोंगा। गुणी मोर्तारामे[2] म्हणे सादर व्हावें प्रसंगा॥ पुणें० ॥ ४॥

---

पोवाडा – होनाजी बाळकृत.

( बाजीरावावरचा. )

श्रीमंत बाजीराव प्रभुचें पुण्य आगळें दिसे।
जीव नील वर्णापरी परस्परें शत्रु विराले तसे॥ धृ०॥
राव दादा कैलासवाशीचें पुण्य उदयालें।
त्रिवर्ग[3] राघववंशी सुपुत्र तें स्वराज्य पावलें॥
नाना रिती बहुतांनीं विरोधें अतिउपाय योजिलें॥
न करितांच वध हातीं तयाशी न मारितां मारिलें।
अरुणोदय जालीया नभीं बालार्क[4] तेज पसरलें॥
सवाई बाजिराव धर्मरुप गादीवर बैसले॥ चाल॥
ऐश्वर कळा साजती॥ पाहुन शत्रु लाजती जयवाद्य
नित्य वाजती॥

---

१ मोहोरी. २ हा वाणी महमदवाडीचा राहणार होता. ३ आमृतराव, बाजीराव, चिमाअप्पा यांपैकीं पहिले दत्तक व दुसरे दोघे औरस होत. ४ प्रातःकाळचा सूर्य.

धर्मिक निती गर्जती ॥ किर्ती यामंडळांत विसले ॥
जिवनी ॥ १ ॥
परमगहन अति सुशीळ सत्य उपाय सत्य अंतरीं ॥
सुर्यवंशींचा राव जसा हरिश्चंद्र अयोध्या पुरीं ॥
क्षमा शांतीचा सिंधु सत्य निःकपट हृदय मंदिरीं ॥
प्राण भ्रमर भावार्थ कमळिचा आंत गुंजारव[1] करी ॥
याचिन्हें मंडित भुपती विख्यात यश घे श्वरी ॥
ज्याचे तप सामर्थ्यें वितळती शत्रु अभ्रापरी ॥ चाल ॥
जना चक्रामधीं येकसरे ॥ केंशरी[2] एकला शिरे ॥
नेती भाग आपल्या परी ॥ तेवींस्वार्थ तरी बरी च-
क्रांत विज पाहा कसे ॥ २ ॥
आज मर्जी कोणती उद्याचा बेत आणिक मसलती ॥
सेवक जन संनिध परंतु ते कोणीच नेणती ॥
कळोन द्यावा खुणा येकांतिच्या गुज गुह्य या प्रती ॥
यास्तव ते नृपाळ विच्यारें गुप्तरूप बैसती ॥
जनांत बोलणें तेची प्रगटार्थ करून बोलती ॥
मुख्य प्रभुचें लक्षण प्रत्यक्ष ज्यास वचन भारती
॥ चाल ॥
म्हणउन युक्तीनें आशा ॥ नृप जिंकित दाही दिशा ॥
निर्दोष जोडिंती यशा ॥ प्रथमारंभीं तशा कल्पनें
कार्यसिद्धी होतसे ॥ २ ॥
सांब कृपा परिपुर्ण पुर्व पुजा[3] बहुत चांगली ॥
स्वजन जनाची केवळ बरवी विद्या फळासी आली ॥
निर्धारीं शर पंजरीं येकेपरी कैसी जाळी ॥

---

१ मधु चोखीत राहणें. २ सिंह. ३ सेवा.

गत वस्तु सायास न करितां ज्याची त्यास लाधली ॥
मोडुन त्रिबक्[1] चाप रामचंद्रें जानकी परणिली[2] ॥
दुरधरें पण जनकांचा अद्भुत ख्याती करून दाविली
॥ चाल ॥
भेदुन यंत्र तें आधीं ॥ पांचाळ मंडपामधीं ॥
पार्थें[3] जिंकिली द्रौपदी ॥ धनी प्रतापी राजपदी शो-
भलें सुशोभित तसें ॥
होनाजी बाळा म्हणे प्रजेच्या आनंद हृदयीं असें
जिवनी लवणा० ॥ ४ ॥

---

## पोवाडा

( बाजीरावावरचा. )

दिन असतां आंधार आकाशतळीं पडलाबाई ॥
विश्वतरंगाकार प्रभुविण शुन्य दिशा दाही ॥ ध्रु० ॥
च्यारी दिशेमध्यें परमप्रतापी राज्य सबळ भारी ॥
यशध्वज चहुंकडे किर्ती या पृथ्वी माझारी ॥
दहशत परराज्यांत न करितां शत्रुवर स्वारी ॥
प्रतिवर्षी घरीं खंडण्या चालुन येती परभारी ॥
केवढादर्प[4] ज्याचा वाघबकरीं या दरबारीं ॥
एकेठाईं जळ प्राशन करिती निरवैर प्रकारीं ॥
विवेक बळ सुविच्यारीं नितीचीं कामेंचालती सारीं ॥
यथा धर्म वर्तती प्रज्या आहा आपल्या वयवदरीं ॥
॥ चाल ॥
असें असतां हें विघ्न कसें वोढविलें लवलाईं[5] ॥

---

१ भार्गव धनुष्य. २ वरीली. ३ अर्जुनानें. ४ धाक. ५ लवकर.

फिरली बुद्धी सर्वांची रणांगणी नेमिली लढाई ॥
विश्व० १ ॥
भर दिपवाळीमध्यें युद्ध चाललें शस्त्रआस्त्रीं ॥
श्रीमंत इंग्रज दळीं कितीएक शूर पावले परत्री ॥
त्यांत सखा सर्वज्ञ आतां कधीं हरी दाविल नेत्रीं ॥
निजध्यास लागला पडेना चैन दिवस रात्रीं ॥
तेजहीन ह्या प्रजा प्रभुकरितां अंत्री[1] ॥
मुर्तीमंत येकाळीं विषय विधवारूपें धरत्री ॥
असंख्य क्षेत्रांमाजी स्वामींची कृती कोण्याक्षेत्रीं ॥
वर्तमान आदि अंत न कळे कागदपत्रीं ॥
मुळीच गर्भी श्रीमंत दुःख ठाऊक नाहीं तयासी ॥
टाकुन वनांत त्यास आले सोडून बाराभाई ॥
॥ विश्व० ॥ २ ॥
सुंदर जागोजागीं उत्तमोत्तम विलास स्थानें ॥
इंद्र भुवनवतआरसेमहाल ठाई मय सभेप्रमाणें ॥
कंदिल तरू बिलोरी पराचमखमाली बिछोने ॥
तंबेमरामत पडले बंद आठरा कारखाने ॥
कुंकुमहीन दक्षिण वनितेचेंवदनें[2] दैन्यवाणे ॥
येक्या प्राण्यावीण दिसती ते देशपरगाणे ॥
उदारचित्तें यथासांग दिधलें पवित्रदानें ॥
तीर्थक्षेत्रीं वांछित ठेविले विप्र यथामानें ॥ चाल ॥
निर्मळ शशी सारखी आचळ आहे पदरीं पुण्याई ॥
तरीच भेटतील स्वामी येरव्ही नसे उपाय कांहीं ॥
॥ विश्व० ३ ॥
आहा विधात्या[3] कैसें अक्षर लिहिलें कपाळीं ॥

---

१ मनी २ स्त्रीचें मुख. ३ ब्रह्मदेवा.

निराश्रीत सर्वस्वे आसरा नाहीं तिन्ही ताळीं ॥
मोठा काळ कठिण लागलें कितीएक रानोमाळीं ॥
कुठवर चिंता वाहावी वियोगानळें हृदय जाळी ॥
दुर्धर युद्धप्रसंगें गेली वैऱ्याची दिपवाळी ॥
जालें आपण परदेशीं करून कोणाचे हवालीं ॥
विचित्र गती दैवाची वाजती दोही हातीं टाळी ॥
होणारा सारखें वर्तलें वर्तमान ते काळीं ॥
नकळे ईश्वरी सूत्र झाली पाहा पर्वताची राई[1] ॥
नवेंच सर्व निघालें लोपली मागिल चतुराई ॥
॥ विश्व० ४ ॥

पारखी जाहली होऊन आयोध्या पुरीराया हरिश्चंद्राशीं ॥
रोहीदास[2] तारामती[3] राणीं त्रिवर्ग जाले वनवासी ॥
सत्यधीर भूपती न ढळला किंचित सत्वासी ॥
घेऊन कौसिक[4] पुण्य पावला आपल्या स्वपदासी ॥
असतां श्रीहरी सखा कांतो वनवास पांडवाशीं ॥
काळमहात्म विचित्र असावें सादर भोगासी ॥
विषलिखित जाली प्राप्त विषया त्या चंद्रहासासीं ॥
देशोधडी फिरावेलें कलिनें रायानळाशीं ॥
अशा पुण्यरूपें नृप न सोडी भोग सर्वाथाई ॥
होनाजीबाळा म्हणे कर्ता हर्ता शेषशाई ॥ ५ ॥

---

## पोवाडा

( बाजीरावावरचा. )

**उट्या केशरी टिळाकस्तुरी कमाल खानी हार गजरे ॥**
**गहेनाजी बहेनाजी आक्षयी जवळ पालखीच्या हुजरे ॥ध्रु.॥**

---

१ मोहोरी  २ हरीश्चंद्राचा पुत्र.  ३ हरीश्चंद्राची राणी  २ विश्वामित्रऋषी.

जुनीं माणसें तीं कणसाला महाग गैरे[1] त्याची बुजरे[2] ॥
चार चटारी, भटारी हलके जाणून घे अलबत मुजरे ॥
सुंदर स्त्री दुसऱ्याची तिसरा[3] दे बैल गुतून आवता ॥
शाल्योदन मिष्टान्न भोगता सवाशेर ज्याचा सवता[4] ॥
चोविस वर्षे चैन भोगिली राज्याक्रांति जाणूनि नवता ॥१॥
जनीच कर्मि लयीशी गुर्मी कुटुंब दाखल नजराणा ॥
प्रभुफार संतोषि न किमपी दोष निजा इजजवळजाणा ॥
असें अवश्य घडवी आडवीतिडवी चार प्रहर दमद्या
ताणा ॥
दौलतीस बाजीराय अपाय[5] करील म्हणत[6] होते नाना ॥
खेळ करूनि उफराटा वरतां पाटा रयतेच्या भवतीरे ॥२॥
कुलकल्ला[7] त्रिंबकजी इंगुळ अगदीं राहिलें दिडबोटें ॥
पंढरपुरीं महाद्वारीं शास्त्रीपार केले कर्मच खोटें[8] ॥
चौकून मग इचकोबा हाय तोबा सुकून गेले ओठ ॥
आळ येतां चंडाळ गडावर पदरीं काय पडला + + ॥
सर्वांची रग जिरली म्हणून तळी भरली आला दिप-
मालवता ॥
फंदीमूल म्हणे असती विरसकागादि पुण्याची घालवता
॥ ३ ॥

---

१ वाईट. २ चहा. ३ ही बाजीराव साहेबाची अति निंद्यचाल सर्वांस माहित असेलच. ४ बाजीराव खाणारा जब्बर असे. ५ राज्य बुडवील. ६ हें नानाचें धोरण खरें झालें. ७ त्रिंबकजी हा बाजीरावाच्या नाकचा बाल असल्यामुळें गर्वानें उन्मत्त झाला होता. फंदीचे हे सिवधडे भाऊच होते. निंबगांवजाळी संगमनेराचे नजीकच आहे. ८ गंगाधरशास्त्रयास मारिलें.

## पोवाडा *

( बाजीरावावरचा. )

मोठमोठे सरदार मानकरी जरब चहूंकडे दरारा ॥
राव्यापरि पिंजऱ्यांत ठेविले मोहोनि चंदी चारा ॥
देशमुख देशपांडे मुजुमदारीचा सिसकारा ॥
हसुम भिलांनीं घ्यावी पोत्यांतून हुकूम कोणावर
नाहीं जोरा ॥
पाटिल, कुळकर्णी, नावाडी घालून दमले येरझारा ॥
सत्यसाहेबी अगदीं बुडाली महाराची त्याहून तोरा ॥
शहाणे, पुरखे, अकलवंत हेवटी हात्यारें बिनकाजी ॥
कवळे कामवठ तरणे कारभारी बहाल त्यावर खुषमर्जी
॥ १ ॥
जुने कायदे अगदीं बुडाले जेव्हांपुन झाली इंग्रजी ॥
कांदा भाजी एकच मोलें तुपसाखर मैदा सोजी ॥ ध्रु० ॥
रंगबाजी चौघडे नगारे कालुकर्णें सिंगें भेरी ॥
निशाण नगारे जिलीब मशाली अवद्नी हरपली सडी
स्वारी ॥
तुर्कस्वार पलटणें पायदळ रव चाले मुंगीच्या हारी ॥
जिकडे तिकडे तंबूर वाजे हातीं झांजा पायी मोहोरी ॥
कवाइत शिकून जनरल हदीचा करून ठेवावा रोजगारी॥
जिकडे बदली जाईल तिकडे घेऊन कबीला बरोबरी ॥
राज्यधन अवघेंचि हरपलें प्याद्याचे केले फर्जी ॥
चवरी अबदागीर टाकून छत्री आणून धरी वरजी ॥ २ ॥

---

* ज्यावेळीं आमची नवीन मंडळी इंग्रजांचा वरवरचा कावा पाहून अगदीं भुलून जाऊन त्यांची स्तुति करण्यांत गुंतून राहिली होती त्यावेळीं अगदीं उदासिनवृत्तीनें परशराम कवीनें हा पोवाडा केला आहे. हा कवि तीसचाळीस वर्षांपूर्वी जिवंत असून त्यानें या पोवाड्यांतील स्थितीचा अनुभवही घेतला होता असें दिसतें.

रथ अंबाऱ्या पालख्या टांगून ठेविल्या आढ्याला ॥
दमणी छकड्या मजे बसाया दुःख नाहीं जीतमढ्याला ॥
हत्ती उंट तुरळक; विरळा जीर्ण[१] शेंपूट नाहीं घोड्याला
भाले बरची ढालतलवारी नापुसती तीन कवड्यांला ॥
चकमकीच्या[२] बंदुका काढिल्या नाहीं गरज कळ तोढ्याला॥
सरंजाम सरकारी अगदीं गुल लाखो पाहे जोड्याला ॥
एकसारखे शिपायी पाहून एकासारखी एक मर्जी ॥
टोपी डगलीं तंगविजारा खडी चवकीला हुजुरजी ॥ ३ ॥
आठ आणे चार आणे एकोत्रा सावकारीचा शिरस्ता ॥
आतां सावकारी मारवाड्याची घरबुडवी दिवसां दिसतां
ती टोल्यांचा कागद त्यावर हजारांचा भरला रस्ता ॥
घरादारांचा लिलांव करुनि तुरुंगांत टाकिती त्वरिता॥
एक साल सुकाळ एक साल दुकाळ हरजिन्नस व्हावा सस्ता ॥
जिकडे तिकडे मरी पांगली पाउस घाला जाला दुस्ता॥
चिबचेपहा दाम चालवी लज्जाची तो मुकलकाजी ॥
शक जबरा वाघ बकरी एकेजागीं पाणी पाजी ॥ ४ ॥
पहा रांडांनीं ताळ सोडले मर्जीस आलें तर नांदेल ॥
उत्तम मध्यम कनिष्टवर्णाचे अवघ्यांनीं केली धांदल ॥
आठरा पगड मांग महारते एक्या पोहऱ्यानें पाणी शेंदील॥
ऐकत होतों आतांच आलें अधर्माचें वेड धांदल ॥
रामनाम जो भजेल दोन्ही हृदयामधीं ज्याच्या कोंदेल ॥
नामी विठ्ठल परशराम म्हणे कवनिकाचें मुख चेंदेल ॥
रामकृष्ण गुणी रामा गातो साधुची धुळ रजनी ॥
गुण दुर्गुण ज्याचा त्याला असेल तशी त्याला बंदी ॥५॥

१ खोगीर २ केपाच्या.

# रमाबाईचा पोंवाडा.

आम्हास या पुस्तकांतील. दुसरे पोंवाडे मिळविण्यास जितके श्रम पडले त्या सर्वांहून अधिक श्रम हा **रमाबाईचा** पोंवाडा मिळविण्यास पडले. या पुस्तकांतील बहुतेक ऐतिहासिक पुरुषांचे पोवाडे मिळालेले पाहून आम्हास तिच्या पोवाड्याविषयीं भारी आस्था वाटूं लागली; परंतु तो पुष्कळ गोंधळ्यांकडे मुळींच नसल्याचें समजलें. यावरून आम्हास फारच दिलगिरी वाटली. परंतु आमच्या वाचकांच्या भाग्यानें म्हणा कीं, आमची ही यत्किंचित सेवा त्या महासाध्वी सतीस घ्यावयाची होती म्हणा पण शेवटीं एका सचोटीच्या वृद्ध गोंधळ्याकडून हा खालीं दिलेला पोंवाडा आम्हास मिळाला. पण त्यांतही कांहीं कमताई राहिलीच ती अशी कीं, यांतील शेवटचा एक चौक आणि मधला एक चौक असे दोन अजिबात त्या गोंधळ्याच्या विस्मृतीमुळें राहिले. गोंधळ्यानें असें सांगितलें कीं, हा पोंवाडा पूर्वीं मला सर्व म्हणजे सात चौक मुख पाठ येत होते परंतु अलीकडे पोवाडे ऐकण्याची कोणाचीच विशेष भक्ति नसल्यामुळें तें पाठांतर अर्थातच मळीण झालें. आज स्मरण करितां करितां पांच चौकांची मात्र चांगली आठवण होती, बाकी राहिलेल्या दोन चौकांची चूक भूल होते याकरितां ते अजिबात गाळाऊ करावे हें चांगलें. या गोंधळ्याच्या सांगण्यावरून एक मोठाच मुद्दा असा निघतो कीं, पूर्वीं म्हणजे सुमार पन्नास वर्षांपूर्वीं शूर लोकांचे व तसेच नांवाजलेल्या पुरुषांचे पोंवाडे ऐकण्याची व म्हणण्याची अभिरुचि पूर्वींच्या लोकांत विशेष होती असें उघड दिसून येतें. दुसरें असेंही दिसून येतें कीं, आतांप्रमाणें इतिहासादि ग्रंथांचा त्यावेळीं अगदींच मागमूस नसतां या असल्या पोंवाड्यांतील विश्वासनीय माहिती वरूनच आपल्या पूर्वजांचा इतिहास समजून घेण्याचा हव्यास पूर्वींचे लोकांस विशेषच होता. आणि म्हणून राजद्वारीं किंवा अमीरउमराव लोकांचे घरीं गोंधळी व तसेच कोणी जे पोवाडे म्हणत असतील त्यांची चहा होत असे असें दिसतें.

**रमाबाई** ही पुण्यशील व पतिव्रता बायको कोणासही माहित नसेल असें वाटत नाहीं. **थोरले माधवराव** साहेब पेशवे यांची चांगली कारकीर्द तर अझून पर्यंत पुष्कळांचे तोंडून आपण ऐकतो. त्यांच्या

सारखी न्यायपद्धति व रयतेची कळकळ कोणत्याच पेशव्यांनीं अनुसरली नाहीं असें म्हणतात. याच नीतिमान् पुरुषाची **रमाबाई** ही धर्मपत्नि होय. भ्रतार मरण पावल्यावर ही सती या लोकच्या क्षणभंगुर सुखास लाथ मारून परलोकीं चालती झाली! थोरले **माधवराव** थेऊरास असतां त्यांस कफाची विकृति होऊन त्यांचा अंत झाला त्यावेळीं **रमाबाई**ही सहगमन करती झाली. या स्त्री पुरुषांची प्रीति अत्यंत असे. ही स्त्री फार उदार बुद्धीची धर्मशील आणि सुस्वभावाची होती अशी ख्याति आहे. खालच्या पोवाड्यावरून तर वरील गोष्टींचें दिग्दर्शन होईलच.

'थोरले **माधवरावांचें** नाटक' म्हणून एक उत्कृष्ठ पुस्तक रा० ब० **विनायकराव जनार्दन कीर्तने** यानीं रचिलें आहे. त्यांत थोरले **माधवराव** आणि **रमाबाई** यांचें सर्व कालक्रमण फार उत्तम वर्णिलें आहे. म्हणून तें पुस्तक वाचण्याविषयीं आम्ही आपले वाचकांस फार फार शिफारस करितों. त्या पुस्तकापासून वाचकांस दुसराही एक उत्कृष्ठ लाभ होईल तो हा कीं, मराठी भाषेचें अत्यंत शुद्ध आणि मनोरमरूप त्या नाटकांत दिसून येईल.

सांग रमाबाई सत्वधीर। रावसाहेब ईश्वर अवतार। सांग रमाबाई० ॥ ध्रु० ॥ नाना साहेब होते पुण्यपावन। उदरीं जन्मलें ऐकरत्न। विश्वासराव[1], रावें[2], नारायण[3]। जसे बंधु राम लक्षुमण। हिऱ्यारत्नाची जोडी विर्दूसालि[4] कोण.। ज्याची कळा तोच जाण ॥ चाल ॥ वाजे खणखण। धवशा दिला बसवून। नाहीं गेले पुणें सोडून। केलें काबीज झुंजेल्याविण[5]। वसई सुरतेचें ठाणें। कुलाबा.फिरंगण। आंग्रे आणिले धरून। ते बंदीशाळेंत अजून। सोडवील कोण। द्वाही त्याची फीर। सांगरमा० ॥ १ ॥ रावसाहेब होते बुद्धीचे सागर। कर्मी त्यांचे अ-

---

१ हे थोरलेपुत्र पानपतचे युद्धांत पडले २ माधवराव. ३ नारायणराव हे धाकटे यांस राघोबादादानें मारविलें. ४ नाहींशी केली ५. युद्धावांचून.

घटीत । त्यांचे बुद्धीचा नकळे अंत । हत्ती घोड्याचे मोठे परिक्षवंत । स्वारी निघाली त्वरीत ॥ चाल ॥ संग-सडी स्वारी अहो रावसंग सडी स्वारी । संगे चौघड्यां-च्या भेरी । काळू वाजती नानापरी । बारगिरांची गत काय न्यारी । पुढें धांवती विटेकरी । आयन्यांची खासी अंबारी । गज सजवून तयामाझारी । र्धाणती राव किंक-र ॥ सांग रमा० ॥ २ ॥

स्वारी पुण्याहून गेली थेऊराला[1] । त्या गणपतीच्या सेवेला । रमाबाई विनवी त्यागणपतीला । चुडेदान दे-यीं तूं मजला । एवढें वरीस राख साहेबांला । अवघा सोन्यानें मढवीन तुजला । मंदिल मुंडासा शिरींपेंच वाहिला । हिरे जोडीन तुझ्या मुकटाला । सोन्याचा क-ळस लावीन तुझ्या शिखराला । पांचालक्षांचा नवस केला ॥ चाल ॥ बाई विनविती । मज प्रसन्न व्हावें गण-पती । कशी हीन झाली तुझी मति । मंगळवाराच्या रा-तीं । साद्दष्ट आलें गणपती । उभेठालेग, बाई पाहती । कर जोडून बोले गणपती । काय आहेग ? माझे हातीं । कर जोडूनि सांगे गणपती । करता हरता श्रीपती । मी मोदकाचा बहुपती । ऐकून बाई हांसली चित्तीं । पुढें उगवला दिवस बुधवार । सांगरमा० ॥ ३ ॥

दिवस उगवला बुधवार बुद्धिवंत । दिशा धुंदकार-ल्या समस्त । गेले निजधामा रावसाहेब श्रीमंत । दैंवा-ज्ञा झाली त्वरीत । रमाबाई होती दुसऱ्या डेऱ्यांत । कळली बातमी आली धांवत । पदर टाकिला खांद्यावर

---

१ दर चतुर्थीस रावसाहेब थेउरास देवदर्शनास जात असत.

त्वरीत । धांवत आली देवळांत । जातों आम्ही नाहीं राहत ॥ चाल ॥ करा बोलावण । अहो राव करा बोलावण । आम्हां निजधामाशीं जाणें । तुळशी मंजुळी तोडून । त्या माळा गळ्यांत घालून । सर्व शृंगार उतरून । हें निर्वाणीचें लेणें । गोपीका बाई म्हणे । जवळ बोलून नारायण । राघोबा दादा येऊन । हात वटिंत घालून । शव निर्विले नारायण । वर्णिती राव किंकर । सांग रमाबाई० ॥ ४ ॥

बाई चालली थेऊरांतून । कुंडी[१] साहेबाची घेऊन । अबीर गुलाल गेली गर्दी होऊन । मुच्छदी उधळती पानें । आणिक चवघडे वाजती खणखण । पुढें हुजराती घेऊन । मुळेच्यातिरीं उभी राहिली जाऊन । काशीचें पाणी आल्या कावडी भरून । बाईनें केलें जलपुजन । रमाबाई पाषाण हिय्या केला । प्राण ज्योतीशीं मिळविला । उभी धर्मशिळे ठाकली । हातची टाळी पिटली । दवराळ जळू लागली । हाक इंद्र सभेला गेली । विमानें धाडून दिलीं । दोघें विमानीं बसविलीं । सती शोभली जशी सुलोचनानार । सांग० ॥ ५ ॥

## अहिल्या बाईचा पोंवाडा.

**अहिल्याबाई** होळकरीण ही **मल्हारराव** होळकराची स्नुषा होय. **खंडेराव** म्हणून जो मल्हाररावाचा मुलगा होता त्याचीच ही बायको. **अहिल्याबाई**चा भ्रतार तिच्या वयाच्या एकविसाव्या वर्षीच निवर्तला. तिचा एक मुलगा **मालिराव** म्हणून होता तो पराकाष्ठेचा व्रात्य होता.

१ शव.

**अहिल्याबाई**स नवरा मेला त्यामुळें वैधव्याचें केवढें दुःख तरूणपणींच सोसावें लागलें! परंतु साध्वी असल्यामुळें तिनें आपलें सर्व आयुष्य पुण्यकर्मांत घालविण्याचा निश्चय केला. ती वैधव्यांत शुभ्र वस्त्रेंच परिधान करीत असे. ही पुण्यशील बायको दृढनिश्चयाची, धारिष्ठाची आणि धार्मिक अशी होती. ती राज्य करीत होती, परंतु त्या सुखास बिलकूल न भुलतां आपल्या देहाचें सार्थक करण्यांत सदां निमग्न असे. तिनें प्रजेचें पालन पुत्राप्रमाणें केलें. महेश्वरीं गेलें म्हणजे तेथील नर्मदेचे घाट व टोलेजंग देवालयें पाहून तिची शुभ्रकीर्ति मनांत येते. ती शरीरानें सडपातळ व मध्यम उंच असे. तिची मुखचर्या फार तेजःपुंज दिसे. ती साधा पोषाक नेहमीं करी. ती साठ वर्षांची होऊन मरण पावली. "ती संस्कृत पुराणें वाची, व त्यांचा तिला चांगला अर्थ कळत असे. तिची कोणी स्तुति केली, तर ती तिला अगदीं आवडत नसे. तारुण्याची भरंज्वानी, अमर्याद ऐश्वर्य व सत्ता, ह्या गोष्टी अनुकूल असून नवरा गत झाला असतांहि तिचें पातिव्रत्य तिळभर चळलें नाहीं, अशी जी पुण्यवती सती **अहिल्याबाई** होळकरीण, तिची जितकी स्तुति करावी, तितकी थोडीच वाटेल."

"**अहिल्याबाई** होळकरीण हिचा लौकिक सगळ्या हिंदुस्थानांत आहे. ह्या साध्वीचें नांव ज्यास ठाऊक नाहीं असा मनुष्य विरळा, तिच्या औदार्याचें, भूतदयेचें, धार्मिकतेचें कांहींच चिन्ह जेथें नाहीं. असा तर हिंदुस्थानाचा कोणताच भाग नाहीं. दक्षिणेस रामेश्वरापासून तों तहत उत्तरेस बदरीकेदारापर्यंत जीं जीं प्रसिद्ध क्षेत्रें व पुण्यस्थानें आहेत त्या त्या ठिकाणीं **अहिल्याबाई**चें कांहीं ना कांहीं कृत्य किंवा देणें आहेच. कोठें देवालयें, कोठें धर्मशाळा, कोठें तलाव इत्यादि धर्म कृत्यें केलीं आहेत. कोठें तिनें अन्नसत्रें व सदावर्तें घातलीं आहेत. कोठें कोठें देवस्थानांस इनामें वगैरे दिलीं आहेत. तेव्हां इतकी प्रसिद्ध जी स्त्री तिच्या गुणाचें वर्णन करणें योग्य आहे.

हा खालचा पोंवाडा प्रसिद्ध **प्रभाकर** कवीनें केला आहे. त्याच प्रमाणें या पोंवाड्यापुढें जें महेश्वरचें थोडेसें वर्णन कटाव रूपानें केलें आहे तें अनंदफंदीनें केलेलें आहे."

साति धन्यधन्य कलयुगीं अहिल्याबाई ।
गेली कीर्ति करुनियां भुमंडळाचे ठायीं ॥ ध्रु० ॥
महाराज अहिल्याबाई पुण्य प्राणी ।
संपूर्ण स्त्रियांमाधिं श्रेष्ठ रत्नखाणी ॥
दर्शनें मोठ्या पापाची होईल हानी ॥
झडतात रोग पापाची होईल हानी ॥
वर्णिती कीर्ती गातात संत ते गाणीं ॥
झाली दैवदर्शें ती होळकरांची राणी ॥
॥ चाल ॥ उद्धार कुलाचा केला ॥
पण आपला सिद्धीस नेला ॥
महेश्वरास जो कुणी गेला ॥ चाल पहिली ॥
राहिला तेथें जो जाऊन घेऊन बापभाई ॥
संसार चालवी दीन दुबळ्यांची आई ॥ १ ॥
प्रत्यहीं द्यावीं ब्राम्हणास [1]दशदानें ॥
ऐकावीं पुराणें बहुत आनंदानें ॥
शोभतीं होमकुंडें द्विज वृंदावनें ॥
टाकिती हजारों नेमांत अवदानें ॥
\+ + + + + + + + +
॥ चाल ॥ कधीं कोटि लिंगें करवावीं ॥
[2]वधूवरें कधीं मिरवावीं
[3]अर्भकां दुधें पुरवावीं ॥ चाल पहिली ॥
पर्वणी पाहुनी दान देतसे गाई ॥
जपमाळ अखंडित हातीं वर्णूं काई ॥ २ ॥
जेथें ज्योतिलिंग जेथें तीर्थं महाक्षेत्रें ॥
घातलीं तेथें नेहमीं अन्नछत्रें ॥

---

१ दहा दानें २ नवरानवरी ३ बालकांस.

ज्यासि आलि जरा[1] झालिं कांहीं विकळ गात्रें ॥
पुरवावीं त्यास औषधें वस्त्रें पात्रें ॥
कितिकांनीं घेतलीं स्मार्त अग्निहोत्रें ॥
दिलीं स्वहस्तें करून त्या भटास क्षणमात्रें ॥
॥ चाल ॥ आधिं इच्छा[2] भोजन द्यावें ॥
उपरांतिक तीर्थ घ्यावें ॥
वाढून ताट वर मगन्यावें ॥ चाल पहिली ॥
जेविल्या सर्व मग आपण अन्नखाई ॥
रघुवीर[3] चरित्रें ती रात्रीस गाई ॥ ३ ॥
आली यात्राकऱ्याला वाटी पंचे जोडे ॥
कोणास आंगरखे कोणास धोतरजोडे ॥
कोणास दुशाला कोणास बटूघोडे ॥
गवयास मिळावे सुवर्ण कंठी तोडे ॥
\+ + + + + + +
घाली गिऱ्याशाचे पायांत बेडचा खोडे ॥
॥ चाल ॥ बांधिले घांट मठफार ॥
कुठें शिवास संतत धार ॥
कुठें वनांत पाणी गार ॥ चाल पहिली ॥
त्यासाठीं मुशाफर कायें धांवत जाई ॥
विश्रांत पावती पाहुन आमराई ॥ ४ ॥
किती ग्रहण संधींत तीलतुला त्या केल्या ॥
कधिंकनक रौप्य आणि कधीं गुळाच्या बेल्या ॥
सांभाळ करून काशीस यात्रा नेल्या ॥
कावडी शतावधि रामेश्वरीं गेल्या ॥

---

१ उतरतीकळा २ मागेल तें भोजन ३ श्रीरामचंद्र.

संसारीं असुन तिच्या वासना मेल्या ॥
तिजपुढें सहज मग मुक्ति उभ्या ठेल्या ॥
॥ चाल ॥ कवि गंगु हैबती म्हणती ॥
पुण्याची कोण करील गणती ॥
राज्यास होती पडपणती ॥ चाल पहिली ॥
महादेव गुणीचें लक्ष तिचे पाई ॥
कवनांत प्रभाकर करितसे चतुराई ॥ ५

---

### पोंवाडा

( अहिल्याबाईचा. )

नर्मदा निकट तट; बहुत अफाट, पायऱ्यादाट, चिरेबंदी वाट, मुक्तीचीं शिवालयें ॥ कैलास साम्यता, नानापरिची रचना, रचिलीं रामकृष्ण मंदिरें ॥ बहुत सुंदरें, बांधलीं घरें रम्य रमणूक हवेल्या ॥ नयनीं पाहिल्या, नूतन थाट, प्रताप अहिल्या, किल्यावर तळवटी ॥ शहर गुलजार, बहुत बाजार, हाजारों दुकानें ॥ लक्षापति सावकार, भारी भारी माल, खजिना रस्ता ॥ स्वता सुकाळ, नाहीं दुकाळ, बालवृद्ध प्रतिपाल, करिती ॥ गरिब गुरिब कंगाल, गांजले, आडले, भिडले, त्या देखुनिया अन्नसत्र ॥ सर्वत्र सारखे, नाहीं पारखें, पाहिलें नयनीं ॥ महेश्वरक्षेत्रपूर ॥ १ ॥

दानधर्म करी, नित्य शिवार्चन, सत्शील ऐकून धांवति, देशोदेशीचे ॥ कर्नाटक तैलंग, द्रविड वऱ्हाड कोल्हापूर, कृष्णातीर गंगातीर, कोंकण काशीकर ॥ गयावळ माळवे, विरांगडे येति कावडे वेडेबागडे, गुज-

राथी मैथुळी, पुरी भारती, दिगंबर जटाधारी ॥ बैरागी योगी, कानफाडे दर्शना येती हरिदासाचे प्रेमळ भक्त, सांप्रदाय पुष्कळ पाहिले नयनीं ॥ मेहेश्वर० ॥ २ ॥

## नाना फडनविसांचा पोंवाडा.

पानपतचे लढाईतून नाना फडनवीस परत आल्यावर त्यांजवर नानासाहेब पेशव्यांची मर्जी फारच बसली. तेव्हां पासून ते कारभार पाहूं लागले. त्यांनीं पांच पुरुषांचा कारभार ( कारकीर्द ) पाहिला; त्यांतून तिघा पुरुषांचे वेळीं तर सर्व राजसूत्र यांचेच स्वाधीन होतें. या पुष्कळ दिवसांचे अनुभवावरून त्यांस अतिशयीत माहिती होऊन भारीच शहाणपण प्राप्त झालें होतें. त्यांचे मरणानंतर मराठी राज्यांतील चातुर्य आणि प्रामाणिकपणा हीं त्यांजबरोबरच गेलीं असें लोक म्हणूं लागले, ती गोष्ट यथायोग्य आहे. ते राज्याचा कारभार करीत असतां मराठी राज्याचा उत्कर्ष करून स्वराज्य संरक्षण केलें. व त्यांच्या मागें काय झालें तें तर दिसतच आहे. अर्वाचीन काळीं होऊन गेलेल्या साडेतीन शाहाण्यांपैकीं हे अर्धे शहाणे होत, असें म्हणतात. राज्यकारभारांत नाना इतका चतुर साऱ्या हिंदुस्थानांत त्या काळीं दुसरा पुरुष नव्हता असा अभ्राकार अद्यापपर्यंत आहे. नानाचें नांव माहित नाहीं असा पुरुष आमच्या देशांत विरळाच सांपडेल. नानापाशीं द्रव्य विपूल होतें असें म्हणतात कारण त्यांच्या हातानें राज्यप्रकरणी उलादाल्या पुष्कळच झाल्या होत्या. हल्लीं पुण्यांत नानाचे नांवावर तीन मोठाल्या इमारती मोडत आहेत. एक नानांनीं बांधलेला बेलबाग; दुसरा नानाचा वाडा; आणि तिसरा नानाचा हौद. याखेरीज नानाची बाग म्हणून हल्लीं काळेवावरांत सुंदर एक बाग आहे, ती नातूकडेस आहे. असो, एकंदरींत नानाफडनविसाप्रमाणें दीर्घ मसलती कावेबाज सर्व सरदारांत छाप ठेवणारे* आणि मोठे जब्बर लिहिणारे. असे आजपर्यंत कोणीच झाले नाहीं. यांचे

* 'नाना फडनविसाची बखर' म्हणून जी कैलासवासी विष्णु परशराम पंडित यांनीं सारांशरूपानें केली आहे तिजवरून याविषयीं चांगली माहिती कळण्याचा सुमार आहे.

वेळीं इंग्रेजांचें कोण पाड असे हें सर्वांस विदीत आहेच. हे कोणाचा-च वरचढ चालूं देत नसत. निजामाशि राजे 'मेणापरि मृदु वांकविले' असें म्हटले आहे अशा प्रकारचा मराठी राज्याचा बेतबांत राखून सन १८०० मध्यें हे मरण पावले.

हा खालचा पोंवाडा बाळा बहिरू नांवचे कवीनें केला आहे व दुसरा आनंदफंदी संगमनेरकर यांनीं केला आहे.

रतिवंत[1] महाराज पेशवे माधव विष्णू अवतार ॥
हिंदुस्थान कर्नाटक तेलंगण काबिज केलें सार ॥
घरिं बसल्या घरिं खंडण्या येती वृतांत ऐका साचार ॥
शिंदे होळकर गाइकवाड नामी नामी सरदार ॥
जात रोहिले पठाण कांपति राज उदापूरचा राणा ॥
खुब शर्तीनें राज्य राखिलें यशवंत फडनीस नाना ॥ १ ॥
जरीपटक्याचें निशाण तात्या हरिपंताला सरदारी ॥
चौ खंडांमधिं धौंशा[2] वाजतो कड्काला दहशत[3]भारी ॥
हुजरातिची[4] जिलीब[5] चालती मानकरी सेना सारी ॥
पाटणकर घोरपडे निंबळकर तलवारीचे धारकरी[6] ॥
अपाजि बळवंतराव शिपाई शॉईमधिं एक दाणा ॥
खुबशर्तीनें राज्य राखिलें यशवंत फडनीस नाना ॥ २ ॥
भले बुद्धीचे सागर नाना ऐसे नाहीं होणार ॥
मर्दामर्दी राज्य राखिलें मनसोबीची तलवार ॥
इंग्रजाला खडे चारिले नाहीं लागुं दिला थारा ॥
दर्यामधीं पिटून घातला काय सांगूं वारंवार ॥
बदामीचा किल्ला घेतला असा पुरुष नाहीं शहाणा ॥
खुब शर्तीनें राज्य राखिलें यशवंत फडनीस नाना ॥ ३ ॥
भले बुद्धीचे सागर बुद्धीवंत बुद्धीचे सागर ॥

१ दैववान. २ नौबद किंवा कीर्ति. ३ भीति. ४ खासगीकडील घोडस्वारांची. ५ खासा स्वारीचा इतमाम. ६ तरवार मारणारे.

दुष्टाचें निर्दाळण करुनि राज राखिलें एकछत्र ॥
श्रीमंताच्या वाड्यामधीं सबनिस अण्णा खेडकर ॥
कुल अखत्यारी बंदोबस्ती बाळाजीपंत ठोसर ॥
नाना परिचे विलास करितो जैसा गोकुळीं हा कहाना[1] ॥
खुब शर्तीनें राज्य राखिलें यशवंत फडणीस नाना ॥ ४ ॥
लक्ष[2] धन्याचे पायीं चित्तापासुनि हा ज्याचा भाव ॥
पहा राई[3]चे पर्वत केले वाढिवले माधवराव ॥
लग्नासाठीं आणले ज्याणें मोठे मोठे उमराव ॥
जागजागीं दिल्या बैठका अनंत होतो उत्साव ॥
तखतराया रत रस्त्यांचा पुढें वाजे नौबतखाना ॥
खुब शर्तीनें राज्य राखिलें यशवंत फडनीस नाना ॥५ ॥
राव बाजीचें पुण्य प्रतापी पुणें शहर केवळ काशी ॥
गोब्राम्हणा प्रति पाळितो दक्षिणा श्रावणमासीं ॥
तिकून धन याधन्य म्हणें या पेशव्याच्या वंशासी ॥
बाळा बहिरू करी कविता बसूनया नित्य गासी ॥
सेवक सिताराम ज्यांचा दशनामी भगवा बाणा ॥
खुब शर्तीनें राज्य राखिलें यशवंत फडणीस नाना ॥६ ॥

---

### पोंवाडा

( नाना फडणविसाचा. )

सवाइ माधवराव सवाई, सवाई डंखा बजाया ।
फडणीस नानाकी तारिफ अक्कल नेतो गजप किया ॥ध्रु० ॥
बिनाधारसे राज्य चलाया नाकिसे चक्मक झडी ।
कैक मुच्छदी सबगये सबभये नानाकी तो अक्कल बडी ।
दिल्ली अटक लाहोर माहोर कर्नाटक बीच पुकार पेडी ।

---

१ कृष्ण. २ मन. ३ मोहरी.

चारो तरफ तजेला निकला चंदा ऐशी किरत बडी ।
जिने बैठे राज कमाया दिलके ते खुप दिल दिलासा दिया।
साहेब बंदगी करना पुना छोड कहू अया न गया ।
अजी बडी अकल ॥ १ ॥

कैक मुच्छदी होगये अक्कल नानाकी नयी पायाकिसे।
निजामाल्ली भगा दिया साहेब जसदे हाराऊसे ।
टिपूसरीखे लाये बगलमे ज्या पहुंचे दरवाजेसे ।
पेशवोका निमक जहालम मनी किया वो गाजीसे ।
क्या नवाबका हुवा खराबा तोबा हुस भयि डुबा दिया।
तुम हागबी कानोसे सुनते याजस लेकर कोनगया ।
कुचबी नहि सवाइ माधव० ॥ २ ॥

किया मोगलपर हल्ला उसदीन कयी उमराव संगाचले।
शिंदे होलकर और नागपुरवाले भोसले आनमिले ।
दाभाडे पाटणकर निंभालकर कट्टे लढने वाले ।
पवार जाधव माधवरावके संगात नाना बी निकले ।
फडके आपाबळवंत रास्ते अभये इसमे कोन रह्या ।
चुका भुला हुवा देखने कहा आपना आखार गया ।
अजी किसे खबर सवाइ माध० ॥ ३ ॥

सबमिल हल्ला किया उडादिया नबाबके धुडके धुडके
मशार मुलुख पकड कैदमे डालदिया बैठो चुपके ।
पानी विगर घोडे उट हत्ती तमाम मरगये नबाबके ।
रुपयका जल एक कटोरा पानी ऐसी जगा रखे ।
किसे खबर भयी मेहेर मुलुख नबावने क्या दिया लिया।
फंदी अनंत कुतैक्या मालुम सुनते है कुच कबुल किया ।
सच होयगा । सवाइ माधव० ॥ ४ ॥

# पोंवाडा परशुरामपंत भाऊचा.

**परशुराम भाऊ पटवर्धन** हे पेशव्यांचे सेनापति सर्वांस ठाऊक आहेतच. पटवर्धन कुलांत हें एक कुलदीपक रत्नच होऊन गेलें. ब्राम्हणांत शौर्य तें काय असणार? असा जो कित्येकांचा समज होता त्याचें पूर्ण निरसन या तरवार बहादर पुरुषानें करून टाकलें. धन्य याची माता कीं, अशी पुत्ररत्न प्रसवली. यानीं पुष्कळ लढाया मारल्या. त्या सर्वांचें दिग्दर्शन होण्या जोगें अद्याप कोठें पुस्तक प्रसिद्ध झालें नाहीं, ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे. पटवर्धन घराणें एकंदर शूर खरेंच; परंतु या पुरुषाची बरोबरी त्यांच्यांतही करण्याजोगा कोणी पुरुष निपजला नव्हता. अगदीं पेशवाईचे अखेरीस दोनच पुरुष नांव घेण्यासारखे शूर होऊन गेले,—एक **परशुरामपंत भाऊ** पटवर्धन आणि दुसरे **बापू गोखले; परशुराम भाऊंच्या** घोड्यावरील जीन कधींच उतरीत नसत असें म्हणतात; रात्र असो दिवस असो सदोदीत एक दोन घोडे खोगीर घालून तोंडांत लगाम देऊन मोतद्दाराचे हातीं असायाचेच. याचें कारण तें उघड दिसतच आहे कीं, केव्हां आणि कसाही आणीबाणीचा प्रसंग आला तरी स्वारी तयारच असायाची! लढाईचें नांव निघालें तर यांस स्फुरण चढत असे. मग असला पुरुष घरीं बसून किंवा दुखण्यामुळें पलंगावर पडून मरावयाचा नाहीं हें अर्थात दिसतच आहे. कोल्हापुराकडील बंड मोडण्यासाठीं स्वारी जिवावर उदार होऊन लढत असतां अकस्मात मृत्यु पावली. कोल्हापुरकराकडून आपल्या राज्यास नेहमीं त्रास होतो याचा बंदोबस्त करावा कसा? याविषयीं सातारकरांस मोठी नेहमीं चिंता असे, परंतु सातारचे राजाचे धूर्त प्रधान जे पेशवे यानीं तिचें निवारण केलें. सर्व सरदारांत पटवर्धनासारखे तरवार बहादर शिपाई दुसरे कोणीच नसून कोल्हापुरकरांस वस्ताद तेच योग्य आहेत. असा विचार करून कोल्हापुरकरांचे सरहद्दीवर पटवर्धनास जहागिरी दिल्या. त्या दिवसापासून सातारकरांचे राज्यास उपद्रव तर लागला नाहींच; पण उलटा फायदा मात्र होत गेला. पटवर्धनांनीं आपल्या जहागिरी कोल्हापुरकरांच्या प्रांतांत मन माने तशा वाढविल्या.

हा खालचा पोवाडा प्रभाकर दातार यानीं केला आहे.

फार दिवस आम्ही ऐकत होतों कीर्ति परस्पर कानानीं॥
आज विनायक परशराम ते पुरुष पाहिले नयनानीं॥ध्रु०॥
वंशध्वज वंशांत विनायक परशराम ते अवतरले॥
काय जन्मांतरिं पुण्य कळेना घोर वनांतरि आचरले॥
सर्वगुण संपन्न म्हणुन हे अजिंक नर शाईत ठरले॥
कधिं कोणाचें तेज पडेना आपोआप रिपु मागें सरले॥
स्वस्थपणें भोगितात दौलत स्वकीर्ति आपुल्या अनुसरले॥
उठुनि सदा दर्शनास येती किती याचक देशावरले॥
समाचार सगळ्याचा घेउनि गौरवावें मग मानानीं॥
पात्र पाहुनि संतुष्ट करावें कनक रौप्य कांहिं दानानीं॥
फार०॥१॥
तीर्थरुपापासुनि भाग्य मिळविलें अधिक अखंडित पुत्रांनीं
कीर्ति वर्णितां रुकार द्यावा विदेशांत सर्वत्रांनीं॥
थोर थोर जंद्राल करुन खुप बहुत साधन सूत्रांनीं॥
निर्भयपणें नांदती खुशालित शोभति नाना पात्रानीं॥
चंद्र मधें यजमान वेष्टिला नभीं सुभट नक्षत्रांनीं॥
रमणिक वाडा प्रशस्त भिंती सुरंग लिहिल्या चित्रांनीं॥
मधुर गाणें गाउन गवई गुणि अळवितात मग तानांनीं॥
देणें दिलें ठिक रमारमण आणि उमारमण भगवानांनीं॥
फार०॥२॥
स्वतां सुज्ञ सर्वज्ञ प्रसंगीं सहजगतीनें लुटवावें॥
आशाभूत विद्यार्थी निरंतर गुरुकडुन नित्य पढवावें॥
रागरंग हरहमेश मौजा पहिलवान खुप लढवावे॥
स्वार कबिल सरदार कारकुन पाहुन पराक्रम चढवावे॥
चहादानिंत आबांनि आनंदें त्रिकाळ काढे कढवावे॥

पल्लेदार पागोटें दुपेटे रुप्यानीं जंबिमे मढवावे ॥
हुशार सारे लोक लढाया सिद्ध उभे अभिमानानीं ॥
समाधान पावले बघुन गज तुरंग रथ या वहनांनीं ॥
फार० ॥ ३ ॥
संस्थानी ठाइं ठाइं अवांतर धनाढ्य पुष्कळ असतात ॥
परंतु हीं टुम बंदोबस्त हे अगदिंच कोठें नसतात ॥
संपत्तिच्या डौलांत अवांतर कोण कुणाला पुसतात ॥
खरी इथें समदृष्टि दिनावरि धर्महि इथेंच वसतात ॥
धनी बाबा साहेब धुरंधर बहु उदार द्वारीं वसतात ॥
अलंकार भूषणें घवघवित केवळ कन्हय्ये दिसतात ॥
श्रीमंताच्या राज्यांत मिळविला लौकिक पुष्कळ नानांनीं ॥
तीच तऱ्हा अहो याची बरोबरी करूं नये गलतानांनीं ॥
फार० ॥ ४ ॥
धन्य सवाई सारखे तयाचे मंत्री बिवलकर बाबाजी ॥
ऐसे प्रभुशूर हुजुर असते तरी न पळते रावबाजी ॥
खंडेराव तात्यांनीं मांडिली पूर्वि सबळ केवढी बाजी ॥
ते नव्हते समयास झालि राव प्यादेमात बुडली बाजी ॥
आतां विनायक परशराम तुम्हि याचे पदांबुजीं दाबाजी ॥
मेहरबान होतील एखादे दिवशीं निखालस थांबाजी ॥
सभेस वारंवार विनंती करि गंगु हैबती कवनानीं ॥
महादेव गुणी म्हणे प्रभाकर मनोरथ पुरविल मन मानानीं ॥
फार० ॥ ५ ॥ *

---

* हा वरील पोवाडा, मुंबईकर आमच्या एका मित्रानें एक जुनाट पुस्तक दिलें होतें त्यांतून घेतला आहे. त्या पुस्तकांत परशुरामपंत भाऊ पटवर्धन यांचा पोवाडा म्हणून लिहिलें आहे; परंतु ही त्या पुस्तकांतील चूक असलेली आमचे नजरेस मागाहून आली.

## पोंवाडा.

( फत्तेसिंग गायकवाडाचा. )

हा पोंवाडा **आनंदफंदीनें** केला आहे. त्यांत एक विशेष मौज अशी आहे कीं, बडोद्याच्या स्थितीचें आणि पुण्याच्या स्थितीचें साम्य दाखविलें आहे. फंदीबोवा नेहमीं पुण्यास राहत असून पेशवाईची सर्व बारीक सारीक माहिती त्यांस होती; हें उघडच आहे. ती बहुतेक सर्व यांत बहारीनें मध्यें आणून गोंविली आहे. फत्तेसिंग गायकवाड हे सन सत्राशें एकुणनव्वदांत डिसेंबर महिन्याचे एकविसावे तारखेस माडीवरून मृत्यु पावले ग्रा० ड० भाग २७.

पुण्यांत बाजिराय बडोद्यामध्यें फत्तेसिंग महाराज ॥
उदार स्वामी सेवक त्यांना कर्णाची उपमा साज ॥ ध्रु० ॥
इकडे अमृत[1] राय वडिल तिकडे बाके आनंदराय दादा॥
इकडे प्रभु बाजिराय तिकडे फत्तेसिंग साहेब जादा ॥
इकडे अप्पासाहेब[2] तिकडे महाराज सयाजी उमदा ॥
इकडे पांच[3] चार वाडे तिकडेही तसाच महाल जुदा[4] ॥
इकडे स्वामी चाकरीस पलटणें तिकडे सेवक इंग्रेज ॥
उदारस्वामी० ॥ १ ॥
इकडे[5] स्वार शिपायी तिकडेही तसेच थोडे बहुत ॥
इकडे श्रावणमासीं दक्षिणा तिकडेही धर्म होत ॥
इकडे आल्यागेल्याचा आदर करितात यथास्थित श्रीमंत॥
तिकडेही जो आला गुणीजन तो नाहीं गेला रिक्तहस्त ॥

---

१ अमृतराव; हे राघोबा दादानीं दत्त घेतले होते.

२ चिमणाजी अप्पा.

३ बुधवारचा, शनवारचा जुनावाडा; विश्रामबागचा; शुक्रवारांतील; ( तो आतां पाडून टाकला आहे )

४ दुसरा; वेगळा.

५ पुणें येथें असावे तेथें कवीनें इकडे अशी योजना केली आहे.

इकडे पेशवे तिकडे गायकवाड उभयतां शिरताज ॥
उदारस्वामी ॥ २ ॥

इकडे भरगच्ची पांघरुणें तिकडेही याहून चढी ॥
इकडे अन्नशांतीचा तडाखा तिकडेही चालू खिचडी ॥
इकडे आदितवार बुधवार तिकडे मांडवींत घडमोडी ॥
इकडे मुळामुठा तिकडे विश्वामित्रा जोडी जोडी ॥
इकडे तलाव पर्वतीचा तिकडे सुरसागर नांव गाज ॥
उदार० ॥ ३ ॥

इकडे भूमीवर अंथरूण तिकडे रेतीमुळें घरोघर खाटा ॥
इकडे पैका पुष्कळ तिकडेही सुवर्णाच्या लाटा ॥
इकडे जुनावाडा तिकडे लहरीपुऱ्याचा बोभाटा ॥
इकडे पुरण वरण तिकडे चुरमा क्वचित वरंटा पाटा ॥
इकडे पैठणी लफ्फे तिकडे उशाजवळ अमदाबाद ॥
उदार० ॥ ४ ॥

इकडे हत्ती घोडे पालख्या तिकडेही कमती नाहीं ॥
इकडे राव बाजी तिकडे फत्तेसिंगाची द्वाही दुराई ॥
इकडे जोगेश्वरी तिकडेही दैवत बेचराई ॥
इकडे देवस्थानें तिकडेही तशीच सांगूं काई ॥
इकडे लोक दक्षिणी तिकडे गुजराथी न्यारी मिजाज ॥
उदार० ॥ ५ ॥

इकडे उत्साह गणपतीचा तिकडे तशीच चंपाषष्ठी ॥
इकडे हरदासांच्या बिदाग्या तिकडे तशाच भरमुष्टी ॥
इकडे मेघडंबरी तिकडेही तशीच पहा जा दृष्टी ॥
इकडे ओंकारेश्वर तिकडे मुक्तेश्वर नवीच सृष्टी ॥
इकडे दिग्गज पहिलवान तिकडे जेठी कुस्त्यारोज ॥
उदार० ॥ ६ ॥

इकडे नानाफडणीस तिकडे सिताराम दिवाण गाजी ॥
इकडे पंत सदासिव तिकडे शास्त्री गंगाधर दाजी ॥
इकडे बागमळे तिकडेही हरजिन्नस होती भाजी ॥
इकडे माती तिकडे रेती, हारफेर जमिनी माजी ॥
इकडे हौदपाण्याचे तिकडे कुऱ्यावर मोठी मौज ॥
उदार० ॥ ७ ॥

इकडे रावबाजी पंढरीस आषाढी यात्रें जातात ॥
तिकडे विसा कोशांवर ठाकुरजी पंढरीनाथ ॥
इकडे गंगाजवळ तिकडेही तसेंच रेवातिर्थ ॥
इकडे तसाच तिकडे घटाव दोनी कडला यथार्थ ॥
इकडे कडे न तोडेवाले तिकडेही तशीच लहज ॥
इकडे अनंदफंदी तिकडेही जाऊन आला सहज ॥
उदार० ॥ ८ ॥

---

## पोंवाडा.

( यशवंतराव होळकराचा. )

**यशवंत** होळकरासारखा बाका लढणारा आलीकडच्या काळांत सांपडणें तर महान् दुरापास्तच होय. इंग्रेज मागें लागले असतांही स्वारी सारख्या हुलकावण्या देत फिरत होती. सर्व हिंदुस्थानभर हुली मारून अखेरीस स्वारी पंजाबांत शिरली. होळकरदंगा म्हणून वारंवार जुन्या लोकांच्या तोंडांतून आपण जी गोष्ट ऐकतों तिजविषयीं हा पोंवाडा आहे. सन १८०२ या सालीं **यशवंतराव** होळकरानें पुणें शहर लुटलें. **यशवंतरावा**पासून बचाव व्हावा म्हणूनच दुसऱ्या **बाजीराव** साहेबानीं इंग्रेज लोकांचा आश्रय प्रथम केला. ही गोष्ट इतिहास प्रसिद्ध आहे. १८०२ सालींच वसईचा तह झाला.

हा पोंवाडा संगमनेरकर आनंदफंदी यानीं केला आहे.

सुभेदार यशवंत कन्हैया सदा फत्ते करी तलवारी ॥
सवाइ यशवंतराव होळकर प्रसन्न मल्हारी हस्तशिरीं॥ध्रु०॥
वडिल नावकर मल्हार ऐका गर्दी झाली त्यावरती ॥
जे सावध होते परंतु सर्यंत केली सरता सरती ॥
भाउ यशवंतराव बहादूर ऐकुन घ्याया ह्या कीर्ति ॥
दोन लाख फौजचा जमाव दो वर्षा मधिं घ्या गणती ॥
बन्कस कंपू पठाण फ़डिये फौजे मधिं नित्य झडती ॥
मान भिडाउन देति लढाऊन टोपीवाले नाहीं गणती ॥
नागोपंत सरदार शिपाई अनेक उमराव हे बहिरी ॥
सुभे० ॥ १ ॥
शहर पुण्याशीं यावें ऐसा विचार ठरला फौजेचा ॥
दरकूच घेउनि अघाडी मुकाम केला फलटणचा ॥
मागुन दुसरा गोलपठाणशाह आमदखान मरिखानचा ॥
मार्गी येतां लढाई संग्राम झाला टोपीवाल्याचा ॥
उद्यां लढाई दुसरी नेमिली आला हलकारा लष्करचा ॥
खाशा सुद्धा करुनि तयारी मुकाम केला जेजूरिचा ॥
किं मल्हाराचें दर्शन घ्यावें मग निर्दाळावे वैरी ॥
सुभे० ॥ २ ॥
सोमवारच्या दिवशीं प्रातःकाळीं लढाई नेमिली ॥
फत्तेसिंगमानी याणीं तक्षख लिहून पाठविली ॥
अशी लढाई करा म्हणावें माग मोहर नाहीं जाहली ॥
टोपीवाले फार हरामी त्याणीं बहु धुंद केली ॥
सवाइ यशवंतराव जाउन अंगें तरवार चमकाविली ॥
दोन लाख फौजे मधि जाउन कणसापरि कत्तलकेली ॥

तमाम कंपू पळ सुटला चहुकडे गेले हो पेंढारी ॥
सुभे० ॥ ३ ॥
सुभेदार महाराज प्रतापी नामें ऐका एक मोहोरा ॥
कारभारी ऐकुनि घ्यावे हरनाथाचा कुलकल्ला ॥
शहर पुण्याची नाकेबंदी वारुं देईना पसारा ॥
खाटमार मोठा कठिण नाहिं कुठे ऐकिली तऱ्हा ॥
मार देउनि खंडण्या घेतो चौमुलखामधि दरारा ॥
वडिला वडिलीं पुरुषार्थ महिमा सवाई यशवंतराव जुरा ॥
आनंदफंदीचे छंद ऐकता लढाई झाली ही सारी ॥
सुभेदार यशवंत कन्हैया सदाफत्ते करी तलवारी ॥
सवाइ यशवंतराव होळकर प्रसन्न मल्हारि हस्त शिरीं ॥४॥

---

## पोवाडा.

( टिपूसुलतानाचा. )

हा एक प्रबळ शत्रु इंग्रेज लोकांस उत्पन्न झाला होता. **टिपू** हा **हैदरअल्लीचा** मुलगा. **हैदरअल्ली** हा प्रथम अगदीं सामान्य कुलांत निपजला असून तो पुढें आपल्याच अकलेच्या योगानें व पराक्रमाच्या योगानें योग्यतेस आला. हा प्रथम एका सावकाराच्या घरीं कुळांकडील वसूल करण्यासाठीं म्हणून ( उगवणीचा शिपाई ) राहिला होता. पुढें तेथून याचा उत्कर्ष कसा होत गेला हें जर चरित्र येथेंच सांगत बसलों तर विषयांतर होईल. असो; **टिपू** हा तरी बापासारखाच शूर आणि धाडसाचा होता. तो इंग्रेज लोकांचा द्वेष भारी करीत असे आणि त्यांस मारवाडी म्हणून तुच्छ करीत असे. जे जे इंग्रेज लोक त्याच्या तावडींत सांपडले त्यांची त्यांची तो विटंबना केल्यावांचून राहत नसे. कोणास मारी; कोणांस कैदेंत टाकी; कोणास डागी; अशी एकंदर त्याची कृति राक्षसासारखी असे. या त्याच्या क्रूरपणाच्या आचरणावरून इंग्रेज लोक त्याला **टिपू वाघ** म्हणून म्हणत असत. जे

इंग्रेज बंदिवान श्रीरंगपट्टनच्या तुरुंगांत कैदी केलेले असत त्यांस मनस्वीच हाल सोसावे लागले. ड्यूक आफ **वेलिंगटन** म्हणजे **वेलस्ली** साहेब ज्यांनीं पुढें **नेपोलियन बोनापार्ट** याचा पराजय करून संपूर्ण इंग्लंड देशास सौख्य सागरांत बुडविलें हे देखील **टिपू वाघा**च्या तावडींत एकदां सांपडले होते. **टिपू** मारल्यावर हेच **वेलस्ली** साहेब पुढें त्याच्या प्रांताची व्यवस्था करण्यास नेमिले होते. असो; हा सर्व जो अपमान इंग्रेज लोकांचा **टिपूनें** प्रथम केला त्याचा सूड उगविण्याकारितां इंग्रेजांनीं दोन तीन मोठाल्या लढाया त्याच्याशीं मारल्या आणि सरतेशेवटीं सन १७९९ सालच्या मे महिन्याचे चवथे तारखेस टिपूस लढाईंत मारून टाकून श्रीरंगपट्टनचे किल्ल्यावर इंग्रेजांनीं आपलें निशाण फडकायास लाविलें. ह्या **टिपू**चा रोकड खजीना इंग्रेज लोकांस बराच सांपडला. असो; या टिपूसुलतानाचाच हा खालीं पोवाडा दिला आहे, हा **गोविंदराव** जुन्नरकर यांनीं केला आहे.

फत्तेकी समशेर टोपीवालेके ताजे वडे ॥
मारलिया टिपुकी स्रुरंगपट्टनपर बाहुटे चढे ॥ ध्रु० ॥
बहोत दिनोंका बाहेरकु फर हैदरनाइकने किया ॥
कवाडियाल बंदरपर जाकर पहिली लढाई लिया
होते होते झगडा रगडा टोपीवालेने किया ॥
भिडा नगरके किल्लेसे खुब लढाई करकर हिया
व्हता हैदर नाइकका बेटावो अयाजी मिया ॥
सला किया उने टोपीवालेसे मिलकर रह्या ॥
दगाबाज हैदरने करकर दगाजी मिलने अया ॥
मिलनेसे बहाणेसे मोहोबत करके फिरावंन भया ॥
कसी तुम्हा मेरी ज्यान बचावो जबाब आजने कह्या ॥
रखापीठपर हातजलद मुंबइकू पवच्या दिया ॥
उसखातर तलवार झडी अंग्रजसे हैदर लढे ॥
मारलिया टिपुकी सुरंग पट्टनपर बाहुटे चढे ॥ १ ॥

आपमोतसे हाकहुवा हैदरका मुरदा पडा ॥
ऐसी बात दबलकर टिपू रणके लढने खडा ॥
जैसा शरसतासेरासो जंगलमे जाकर अडा ॥
हाक करतर नित्वंग होकर खुबलऱ्हेसे कपडा ॥
बहुतलगी उस दिनसे टोपी वालेकारनखाम गडा ॥
खबरसुनी वाच्छाने काला आदमी जालम बडा ॥
विलायतसे फौजा भेजाकिया दिलोका धडा ॥
आरबी आरपटणके अंबलमे बाहेर बहडते बडा ॥
हुकुम लेकर मेरन साहेब अया उठाकर भिडा ॥
बंगाला मद्रास मुंबईवाला जाकर भिडा ॥
पेशवे न मोगलकु लेकर सात लहडने खडे ॥
मारलिया टिपुके स्फरंग पट्टनपर बाहुटे चढे ॥
फत्तेकी समशेर ॥ २ ॥

मुंबई खातेपरसे मरेन साहेब चलकर गये ॥
लाख फौज पेशवेकी जबाब पचास हजार अये ॥
दीड लाख रुपये रोजका करार करकर दिये ॥
चले कुच दरकुच दाखल करनाटकके हुये ॥
बंगाला मद्रास मुंबईवाला मिलकर रहे ॥
अंग्रेजने अपने दमसे टिपुकू जेर किये ॥
हरिपंत[1] तात्यानें सलाकरकर बच्या करलिये ॥
किया खंड हावर मुलुक टिपुनें किल्ले मामले दिये ॥
तात्या कां सुनखर रखलिया सबीरुकशतभये ॥
पाच बरसकी बात भया बेमान बातना सये ॥
फिर डंखिनें[2] साहेबने लष्कर बहुत रवाना किये ॥

---

१ हरीपंत फडके. २ डंखनिसाहेब हे प्रसिद्ध होऊन गेले.

भरा खुपसामान कालीगोरी पलटना लिये ॥
कालि पलटना पिच्छुरखे गोरानें मनसब किये ॥
जंद्राल इष्टर[1] साहेबके सवाई तंबूर झडे ॥
मारलिया टिपुकी० धृ० ॥ ३ ॥
जंद्राल डंकिन साहेबका हुकूम लेकर चले ॥
काहुरपरसे कुडुके घाटपर सबी अनकर मिले ॥
उस मुकाम लढाई देकर हिमत करकर ढिले ॥
त्रियापटणसे होकर सुरंगपटणपर ज्याकर हुले
बंगाल मद्रास मुंबईवाले जबर भले ॥
नबाबा निजामअल्ली खाकी फौज जोरमे तुले ॥
रामराजा मिला हौरूपानें गीरहार मामले ॥
अंग्रजकू सब राजे मिले एकसेएक आले ॥
लाखोलाख फौजाकू पैसा देते खजीने खुले ॥
पाहोची अजल टिपुकी रबका लिखा कबूना टले ॥
घरके दिवान मिरसाद कभये बेमान ॥
फिरपडे मारलिया टिपुकु सुरंगपट्टन ॥ धृ० ॥ ४ ॥
घेरलिया पट्टनकू चारोतरफ लष्कर भरा ॥
कालीपलटना पिछेकी गोरोंने मनसब करा ॥
जब टिपूने पुछे मिरसाद कये कैसी तऱ्हा ॥
वजिर कहे ज्यापना दिलमे मतलावो खतरा ॥
लोकोकू बाहेर निकालो देताहु रोजमुरा ॥
किला खाली किया दगा करनेका मतलब पुरा ॥
टिपूकू माहालमे लिजाकर बासनि अंगे धरा ॥
खाना खावो बेलाशक मै देऊ उनकू जरा ॥

1 इष्टर फाकडा म्हणतात ते हेच.

साफिल उपर जाकर फिराईचांदर फितुर करा ॥
इशारतकू पोहोंचे हारिस साहेब वोशाने शिरा ॥
हला किया उसघडी किलेमे जाकर भिडे ॥
मारलिया टिपुकू० ॥ ५ ॥
दिनकु दुपार बाराके अमलमे देखी जैसीलिघडी
जंद्राल हारीस[1] घुसा किलेमे फैयर झडी ॥
महालो दाखल खबर भईजद लैन सामने भिडी
शानिशिकंदर बाछा देखो हिंमत उनकी वडी ॥
महमदका कामा पाहडके समजे अजलकी घडी
मरजाना बेहेतर आकले तनपर मुसी बात पडी
स्वार हुये घोडेपर खैचे पटा तीवरी चढी ॥
मारे सवापंचास दल दयवि भरा दुथडी ॥
लग्या एकदम गोल्या चार जो बिजली कडकडी
गिरी जमीन परकेत बिनापानी मछली तरफडी
दौलत मैलत दिइ खुदाने ऐसे ऐसे लुढे ॥
मारलिया टिपुकू० ॥ ६ ॥
दुसरे दरवाजेसे मिरसादक भागणे लया ॥
मारा हात चैलने कहे सब उने किया दगा ॥
भया इधरना उधरनही आगवतमे उसकू जगा
जैसा करना वैसा राना दगा जो किसका सगा ॥
अमल काइम करकर अंग्रेज रणमे करते निगा
टिपुका मुरदा देखकर दस्ताने लगा ॥
बुडी भयी ये बात हमने जाने किधरकू भगा ॥
जाहा मरद आजके घडी लगनथा किसी कुडगा

---

१. हारीस साहेब जनरल होता.

रोते टोपीवाले तारा तुटल जोत झगमगा ॥
दिल दुनया सब रोती जब जंगलमे अगन सीलगा
लालबागमे रखा टिपुकू बंद उशीके चवघडे
मारलिया टिपूकू० ॥ ७ ॥
ग्यारा मुकाम बात शनीचरके दिन फत्ते हुयेई ॥
अखर चइतका महिना तारिख चवथी या पाचवी ॥
नदी कावेरी बडी टिपूके दुखसे सुलाकर गई ॥
झुटी बात या संचीये परभारे करना सई ॥
हामतो नहि देखी अखोसे सुनी वात सोलाई
मारे कुटे लुटे बैठे चौकशी भिई ॥
मद्राजवालेकू[1] सुरंगपट्टनकी साहेबी दिई ॥
वोई भया जंद्राल व्हां दुसरेका हुकूम नहीं ॥
तद्राजवाले हारीस साहेबकी शिफरस भई ॥
बंगालेका लार्ड बिकिट साहेब सब परसर हुई ॥
राहा बताई पहिलीवो हार्टली साहेब फाकडे ॥
मारलिया टिपुकू० ॥ ८ ॥
बडा नसीब टोपीवालेका चढता पहेरा बना ॥
रुजू हुये सब लोक भये कुल दंदी दुसमानपना
रुमके बाछा यासे देखो हुवाजी भाईपना ॥
वजीर अया मुंबईमे क्या खुश वक्ती देखना ॥
अजबराज अगर जकासब रयतकू खुशी रखना ॥
कोट किला अनमोल जोर टापू ममइका बना ॥
मंबईके लोकोका तारिफ कहा लगे कहिना ॥
कुरान किताब पुरान सुनकर करते दानदक्षणा ॥

---

१ वेलस्लीसाहेबास.

गोविंदराव पिरमुरशतके हमचले गरिव अपना ॥
मल्हारी बहिरुकू पछाने दक्खन कोकन पुना
ख्याल बनाकर गुणीबनाकर अरज करने
खातर खडे ॥ मारलिया टिपुकु ॥ धृ० ॥ ९ ॥

---

## पोंवाडा

( मल्हारराव होळकरावरचा. )

कुंजपुरी[1] वर करुन लढाई मोठें यश या तलवारी ॥
गंगथडी[2] हुनं आली पुण्याला कडि फौज बांकी स्वारी ॥
चाल ॥ संगे बाकीन बाकी फौज । नाहीं तूर्त भोगिलें राज्य ॥
दर्यांत[3] बुडालें झाज । पुढें होणार जाणार कळेना लिहिलें
याच्या दैवांत । आयुष्याची दोरी तुटली कसे कोपले भगवंत ।
वाहवाजी मल्हार नांव केलें खुब राहिलें दुनयेंत ॥
लक्ष जिवांचा पालनवाला चंद्र लोपला गगनांत ॥ १ ॥
लाख्या[4] बारगीर हिंडुन आला दरबारीं घेउन सारी सेना ॥
लाख रुपये कुडून द्यावे हिया कोणाचा होईना ॥
लाख्या बारगीर म्हणे मल्हारबा आलों मी तुमच्या दर्शना ॥
मल्हारजी होळकर बोलुं लागला नाहीं लाखाचा परगणा ।
चाल ॥ ज्यानें लाख्या बारगीर ठेविला । एक घोडा

---

१ हस्तनापुर ( दिल्ली ). २ गंगातीरचा प्रदेश. ३ समुद्रांत. ४ लाख्या बारगिराचा लौकीक अझुन म्हातारीं माणसें सांगतात. तसेंच एखाद्यास कोणी म्हणतो कीं, हा काय बोवा एक लाख्या बारगिरच आहे; तें वरील नांवाचेंच दर्शक होय.

बसाया दिला । पन्नास माणूस दिमातिला । दहा माणूस सेवेला । किती जेवी त्याच्या पंक्तीला । पांचशें रुपये निवळ मोजून घातले त्याच्या पदरांत । असे रुपये कितीक झाले[1] करा वर्षाचें गणीत । वाहवाजी मल्हार नांव केलें खुब राहिलें दुनयेंत ॥ लक्ष जि० ॥ २ ॥

मल्हारजी होळकर नेटके करित बसले देवपुजा ।
एकाएकी झाली गर्दी अग्न लागे दारूच्या गंजा ।
लाख्या बारगिर म्हणे मल्हारबा आतां मनामध्यें
तुम्ही समजा । काय बसला निश्चित घडीभर ठेवा
गुंडाळून देवपुजा ॥ चाल ॥ राव मल्हार उठले आंगें ॥
हातिं घेऊन ढाल फीरंग[2] । हिमत कर मामा अंगें ।
तो लाख्या बारगिर संगें । तुम्हीं म्होरे यामी मागें ।
रांख[3] जिवाची वजूं लागली तुम्हि बसा रांहुटिंत[4] ।
काय बसाया आले दिले लोटुनी राव अले मग क्रोधांत । वाहवाजी मल्हा० ॥ ३ ॥

लाख्या बारगिर, मल्हारजी होळकर रणामधि बघा नवरा ।
तिसरा खिजमतदार संगतीं इमानाचा होता पुरा ।
दारूच्या अमलांत झमाझम उडूं लागल्या तलवारा ।
माणूस पडलें फार शाइमध्यें[5] पाहूं लागलें भिराभिरा ।
चाल ॥ शाइमध्यें माइचा पुत । जोडगोळ्या भरून बारचेत पाहुनि मीरी छातींत । राव मल्हार केला चित्तें[6] । मागुन मारिला लाख्या बारगिर प्रेतावर प-

१ रोज पांचशें रुपये मल्हारराव देत असे. २ शस्त्राचें नांव. ३ ठेवलेली. ४ तबूंत. ५ त्या लढाईचे समुदांत. ६ ठार.

डलें प्रेत। तिसरा खिजमतगार, राख मग चौघांची एकच मौत। वाहवाजी मल्हार नाव केलें० ॥ ४ ॥

मोठे मोठे सरदार करिती विचार मनामधिं चकचुर[1] होती। काय बलावणें झालें मल्हारबा सेवती आपली बाजु होती। कांहिंच घेणें कांहींच देणें नाहि आपुलिया हातीं। जें झालें तें बरें झालें द्या रायाला मुठमाती। चाल ॥ तुम्ही होळकर बोलवावो। तुम्ही करा मातेची सेवा। थडग्याला काम तुम्ही लावा। होळकर शाईमधे मल्हारबा होता एकचि पूत। खुप केलीस तलवार सवाई मल्हारी नांव साजत[3]। वाहवा० ॥ ५ ॥

लाख्या बारागिर मल्हारराव रण बहिरी कां मारला। चाल ॥ लाख्या बारागिर ज्यानें ठेविला। खुपछाती हिय्या केला। शहाअल्ली बोवा गुरू बोलला। शुरमर्दाचा पोवाडा। थोड्या दिवसांमधिं पंची वाजवून गेला चौघडा। चाल ॥ पुढें होणार जाणार। तें ब्रम्ह्याचें आक्षर। हें कदा नाहीं चुकणार। बोले राणू सुतार। रहिवाशी पुणें शहर। राजुताजुशा फकीर। ठिकाणा राहतो उंदिर गांवांत। त्याची दस्ती[4] नाहिं कोणाला। कजब्याला जोडून हात। वाहवा० ॥ ६ ॥

---

१ दिलगीर. २ स्वतंत्र. ३ शोभत असे. ४ तोल.

## पोवाडा.

( महादजी शिंद्यावरचा. )

द्वापारीं[1] श्रीमाधव विलासभागवती प्रत्यय पाहावा ॥ तसें कलीमध्यें रंग खेळले श्रीमंत आणि पाटीलबावा[2] ॥ ॥ धृ० ॥ पुण्यासारखें दुजें शहर या दक्षणेंत कोठें नाहीं॥ धर्मराज श्रीमंत धन्यची त्रैलोक्यामध्यें अवाई ॥ धन्य रणवीर पाटीलबावा पराक्रमीं जाणती शांई[3] ॥ नवखंडामध्यें कीर्ति गाजती धनी रावसाहेब सवाई[4] ॥ यशवंत अति श्रेष्ठ तपोबळी साजती ब्रम्ह[5] बादछाई ॥ दिल्ली पतीनें माहिम रात दिली नालकी[6] लवलाही ॥ चाल ॥ स्वामी प्रताप अद्भूत वर्णु कुठवरी ॥ सारें हिंदुस्थान पाटील बावाचें करी ॥ जीजी ॥ घेविलें असून स्वस्थानीं परात्परी ॥ जीजी ॥ मी वर्णू कुठवरी हा प्रातुर्भाव स्नेहाचा ऐकावा ॥ ० तसे ॥ १ ॥ शके सतराशे पंधरा चैत्र नाम प्रमादी संवत्सरीं ॥ अत्यादरें हा रंग खेळलें ॥ उभयपक्षीं हर्ष अंतरीं ॥ बंब भरून रंगाचे ठेविले ठाईं ठाईं शहराभीतरी ॥ गुलालाचे हौद भरूनया खुप कसले हस्तीवरी ॥ तक्तराव्यावर ती पाँत्रा[7] नाचती परोपरीं ॥ रंग भरून पिचकाऱ्या घेतल्या सर्वांनीं आपले करीं ॥ चाल ॥ येक येकावरी चाललें रंग टाकीत ॥ जीजी ॥ नानानीं[8] बंब रंगाचें ठेविले जेथें ॥ जीजी ॥ त्या ठाईं येतां श्रीमंत स्वारी अवचित ॥ जी जी ॥ सर्व भिजविले तेथें हा कुठवर घोष किर्तीचा वर्णावा ॥ २ ॥

---

१ द्वापारयुगांत. २ महादजी शिंदे. ३ राजमंडळ. ४ सवाईमाधवराव. ५ ब्राम्हणांची. ६ नालकीचा समारंभ पुण्यास झाला त्याचें हें दर्शक होय. ७ नायकिणी. ८ नानाफडनवीस.

सर्व मुत्सुदी मानकरी यांच्या हौद्याची जमाव निशीसी॥ हस्ती सेवका सुद्धां सकळही लाल रंग रसी ॥ रविवार पेंठेमध्यें[1] पाहा तात्यांचे दरवाज्याशीं ॥ दोन बंब रंगाचे. भरून ठेविले होते अति सायाशीं ॥ निट बुधवार पेंठेतून श्रीमंत स्वारी गेली त्या ठायाशीं ॥ खुप गर्दी रंगाची केली तात्यांनीं[2] अति उल्हासी ॥ ते दिवशीं सफेत असा कोण राहिला ॥ जी जी ॥ रंगाविरहित नाहीं दृष्टीनें पाहिला ॥ जी जी ॥ लौकिक रंग हा पृथ्वीवर पसरला ॥ जी जी ॥ पुत्रपौत्राशीं सांगायासी जाहला जी जी ॥ हा रंग सुवदावा ॥ ३ ॥ नानापरी गोकुळी ॥ क्रिडलें ॥ श्रीमाधवजी कुंजवनी ॥ तें साक्षांत दृष्टी पाहिलें पुणें नगर पुण्यस्थानीं ॥ नाना परींचे हारिचे विलास शास्त्रीं ऐकिल्या श्रवणीं ॥ पुणें ग्राम गोकुळ क्रिडलें त्यांत कृष्ण श्रीमंत धनी ॥ आधीक देह आमचे आम्हांला भासतसे आपले ध्यानीं ॥ स्वामीपद अवलोकुन दैवी आल्हासी होते नित्यानी ॥ चाल ॥ होनाजी बाळा स्वामी ॥ पदीं रज किंकर ॥ जी जी ॥ विजाप्तीशृत कारितो जोडून कर ॥ जी जी ॥ अक्षई असावी कृपा सेवकावर ॥ जी जी ॥ धनी बक्षीस देणार रामा अंद्धवांच्छी स्वामी सेवा ॥ तसें केली ० ॥ ४ ॥

---

१ फडक्यांचे वाड्याशीं. २ हरीपंततात्या.

## पोंवाडा.

( महादजी शिंद्यावरचा. )

द्वापारीं[1] श्रीमाधव विलासभागवती प्रत्यय पाहावा ॥
तसें कलीमध्यें रंग खेळले श्रीमंत आणि पाटीलबावा[2] ॥
॥ धृ० ॥ पुण्यासारखें दुजें शहर या दक्षणेंत कोठें नाहीं॥
धर्मराज श्रीमंत धन्यची त्रैलोक्यामध्यें अवाई ॥ धन्य
रणवीर पाटीलबावा पराक्रमीं जाणती शौंई[3] ॥ नवखं-
डामध्यें कीर्ति गाजती धनी रावसाहेब सवाई[4] ॥ यशवं-
त अति श्रेष्ठ तपोवळी साजती ब्रम्हे[5] बादछाई ॥ दिल्ली
पतीनें माहिम रात दिली नाल्की[6] लवलाही ॥ चाल ॥
स्वामी प्रताप अद्भूत वर्णुं कुठवरी ॥ सारें हिंदुस्थान
पाटील बावाचें करी ॥ जीजी ॥ घेविलें असून स्वस्था-
नीं परात्परी ॥ जीजी ॥ मी वर्णूं कुठवरी हा प्रातुर्भाव
स्नेहाचा ऐकावा ॥ ० तसे ॥ १ ॥ शके सतराशे पंधरा
चैत्र नाम प्रमादी संवत्सरीं ॥ अत्यादरें हा रंग खेळलें ॥
उभयपक्षीं हर्ष अंतरीं ॥ बंब भरून रंगाचे ठेविले ठाई
ठाई शहराभीतरी ॥ गुलालाचे हौद भरूनया खुप कस-
ले हस्तीवरी ॥ तक्तराव्यावर ती पात्रा[7] नाचती परो-
परीं ॥ रंग भरून पिचकाऱ्या घेतल्या सर्वांनीं आपले
करीं ॥ चाल ॥ येक येकावरी चालले रंग टाकीत ॥ जी-
जी ॥ नानांनीं[8] बंब रंगाचें ठेविले जेथें ॥ जीजी ॥ त्या
ठाईं येतां श्रीमंत स्वारी अवचित ॥ जी जी ॥ सर्व भि-
जविले तेथें हा कुठवर घोष किर्तीचा वर्णावा ॥ २ ॥

---

१ द्वापारयुगांत. २ महादजी शिंदे. ३ राजमंडळ. ४ सवाईमाधवराव. ५ ब्राम्हणांची. ६ नालकीचा समारंभ पुण्यास झाला त्याचें हें दर्शक होय. ७ नायकिणी. ८ नानाफडनवीस.

सर्व मुत्सुदी मानकरी यांच्या हौद्याची जमाव निशीसी॥ हस्ती सेवका सुद्धां सकळही लाल रंग रसी ॥ रविवार पेंठेमध्यें[1] पाहा तात्यांचे दरवाज्याशीं ॥ दोन बंब रंगाचे. भरून ठेविले होते अति सायाशीं ॥ निट बुधवार पेंठेतून श्रीमंत स्वारी गेली त्या ठायाशीं ॥ खुप गर्दी रंगाची केली तात्यांनीं[2] अति उल्हासी ॥ ते दिवशीं सफेत असा कोण राहिला ॥ जी जी ॥ रंगाविरहित नाहीं दृष्टीनें पाहिला ॥ जी जी ॥ लौकिक रंग हा पृथ्वीवर पसरला ॥ जी जी ॥ पुत्रपौत्राशीं सांगायासी जाहला जी जी ॥ हा रंग सुवदावा ॥ ३ ॥ नानापरी गोकुळी ॥ क्रिडलें ॥ श्रीमाधवजी कुंजवनी ॥ तैं साक्षांत दृष्टी पाहिलें पुणें नगर पुण्यस्थानीं ॥ नाना परीचे हारिचे विलास शास्त्रीं ऐकिल्या श्रवणीं ॥ पुणें ग्राम गोकुळ क्रिडलें त्यांत कृष्ण श्रीमंत धनी ॥ आधीक देह आमचे आम्हांला भासतसे आपले ध्यानीं ॥ स्वामीपद अवलोकुन दैवी आल्हासी होते नित्यानी ॥ चाल ॥ होनाजी बाळा स्वामी ॥ पदीं रज किंकर ॥ जी जी ॥ विजाप्रीशृत करितो जोडून कर ॥ जी जी ॥ अक्षई असावी कृपा सेवकावर ॥ जी जी ॥ धनी बक्षीस देणार रामा अंद्धवांच्छी स्वामी सेवा ॥ तसें केली ० ॥ ४ ॥

---

१ फडक्यांचे वाड्याशीं. २ हरीपंततात्या.

## पोंवाडा.

[ गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे मृत्युवरचा. ]

पेशवाई बुडण्यास म्हटलें तर गंगाधर शास्त्री पटवर्धन यांचा मृत्युच कांहीं अंशीं कारण झाला असें म्हणतात. पुढें ही ब्रम्हहत्या जावी म्हणून राव बाजीनीं पुष्कळ पुण्यकर्म आचरलीं ! असो. 'गायकवाडाकडे आमचे तीस लक्ष रुपये यावयाचे आहेत, व त्याजपासून आम्हास अमदाबाद प्रांताचा हिस्सा घ्यावयाचा आहे, असें बोलणें बाजीरावानें काढिलें. त्याची तोड पाडण्याकरितां, स्वप्राण संरक्षणाविषयीं इंग्लिश रेसिडेंताची खातरी घेऊन, गायकवाडाचे वकील पुण्यास आले. त्यांचें नांव गंगाधर शास्त्री. ते मोठे सुज्ञ व चतुर होते. परंतु, पेशव्यांचे दरबारांत त्रिंबकजी डेंगळा ह्मणून कोणी लुच्चा मनुष्य, कपटानें योग्यतेस चढून, बाजीरावाच्या अगदीं नाकचा बाल बनला होता; तो तेथें दुसरी कोणाचीही मात्रा चालूं देईना. जेथें तेथें मी शाहाणा म्हणून तो आपले घोडें पुढें ढकली. त्यामुळें गंगाधर शास्त्र्यांचें बोलणें फिक्के पडे. तरी सात लक्ष रुपये उत्पन्नाचा प्रांत पेशव्यांनीं गायकवाडाकडून घेऊन मागचें कर्ज वगैरे सर्व प्रकरण मिटवावें, असें त्यानें ठरवून घेतलें. ह्यांत फत्तेशिंग गायकवाडांचें हित होतें; परंतु तें त्यास रुचलें नाहीं. त्यानें शास्त्री यानीं मिळविलेला ठराव नापसंत केला. ही त्याची नापसंती कोणास न कळवितां ते वकील तसेच पेशव्यांचे दरबारीं दिवस काढीत राहिले. गंगाधर शास्त्र्यांविषयीं त्रिंबकजी डेंगळ्याचें मन शुद्ध नव्हतें; तथापि त्यानें बाह्यात्कारें त्या शास्त्र्यास इतकें वश करून घेतलें कीं, माझा खरा इमानी मित्र काय तो त्रिंबकजी असें त्यांस वाटूं लागलें. आणि हा विश्वास पूर्ण बसण्याकरितां त्रिंबकजीनें शास्त्र्यास बोलतां बोलतां एके वेळीं असें सांगितलें कीं, पूर्वीं जेव्हां तुमचें व आमचें वैमनस्य होतें तेव्हां तुम्हांस मारेकऱ्यांकडून ठार मारविण्याचा देखील विचार आम्हीं केला होता. ह्या गोष्टीवरून वास्तविक पाहिलें असतां गंगाधर शास्त्र्याचे डोळे उघडावे, व त्यानें जपून वागावयास लागावें. पण तसें न होतां त्याच्या विपरीतच सर्व घडलें. गंगाधर शास्त्री त्रिंबकजी डेंगळ्यास पूर्वींपेक्षांही अधिक प्रिय मित्र मानूं लागला. आणि त्या बिचाऱ्या शास्त्र्यास पक्की भुरळ घालण्याकरितां

पेशव्यानें त्यास असें सांगितलें कीं, मी आपली मेहुणी तुमच्या मुलास देतों. पुढें बाजीरायाची स्वारी नाशकाहून निघून यात्रेकरितां पंढरपुरास गेली. शास्त्री, त्रिंबकजी वगैरे सर्व मंडळी बरोबर होती. एके दिवशीं डेंगळ्यानें शास्त्रीबावास आपले येथें मेजवानीस आणिलें. तेव्हां तरी ते फार भीत भीतच आले. आणि भोजन आटपतांच परत निघून गेले. कांहीं वेळ गेल्यावर देवदर्शनास जाण्याकरितां त्यांस त्रिंबकजीची एका मागें एक अशीं तीन बोलावणीं आलीं. मीं अजारी आहें वगैरे अनेक आढेवेढे त्यांनीं घेतले. परंतु त्रिंबकजीच्या अत्याग्रहामुळें त्यांस तिकडे जावें लागलें. त्यांनीं आपणाबरोबर सात असामी हुजरे नेले होते. ते देव दर्शन करून परतले आणि मार्गानें चालले तों मागून तीन दांडगे 'पैस पैस' करीत त्यांजे जवळ येऊन ठेपले. एकानें त्यांस प्रथम तोबा मारिला त्यांत तरवार होती. तिचा वार शास्त्री यांचे आंगावर लागला. त्याच्या मागून बाकीच्या दोघांनीं आपलीं शस्त्रें त्यांचे शरीरावर चालविलीं. ही गोष्ट इ० स० १८१५ च्या जुलै महिन्याच्या चवदाव्या तारखेस घडली.

वरील शास्त्रीबोवा यांचे पुत्र तिघे यांस गायकवाड सरकारांतून मोठ्या इतमामाचें उत्पन्न चालू झालें. तें अजूनपर्यंत आबासाहेबांचे चिरंजीव जे बाळासाहेब पटवर्धन त्यांजकडे चालत असून तें पुढें वंशपरंपरें चालावयाचें. या बाळासाहेब पटवर्धनांचा चेहरा आणि शरीराची ठेवण हुबेहुब आपल्या अजोबाप्रमाणें म्हणजे वरील गायकवाडाचे वकिलाप्रमाणें आहे असें कित्येक वृद्ध गृहस्थ सांगतात. यांस पाहिलें म्हणजे गंगाधर शास्त्र्यांचा वर्ण कसा होता व शरीर कसें होतें हें चांगलें कळेल.

**दक्षणच्या पेशव्याशीं घाला कधीं नव्हता आला। गंगाधरशास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥ धृ० ॥**
**गंगाधरशास्त्री मारिले पंढरपुरांत। चोरं[1] बातमी गेली इंग्रजाच्या घरांत। तेथुन कज्या झाला ऐका आश्चर्याची मौत[2]। त्रिंबकजी डेंगळे हवालीं करून झाले शांत।**

---

१ गुप्त. २ बातमी.

दोन दिशीं तंटा मिटवुन ठेविला ठाण्यांत । वडिलपंत होयाचे पळून गेले साऱ्या महिन्यांत । इंग्रजाच्या पाहाऱ्यांतुन असा कोण गेला ? । गंगाधरशास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥ १ ॥
कोट किल्ले देऊं केले त्रिंबकजी साठीं । एक महिन्याचा वायदा ! मसलत[2] केली उफराटी । वसई सुभा देऊं केला अडकेल्या ताटीं । कसा तरी जिव वांचो पडल्या दुष्टांच्या गांठी । बाबा साहेबें[3] गेले पंढरीला विठ्ठलाच्या भेटी । उजवें फूल द्यावें आम्हा माहुलीच्या कांठीं । गोविंदराव काळ्यानें[4] मनसुबा पक्का नाहीं केला । गंगाधरशास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥ २ ॥ बापू गोखले मुळींच ऐका बेटावर गेले । बेट जाळुन निघुनशानें खडकीवर आले । दोघांचे मोरचे भिडले आकाश कडकडले । बापू गोखले जाउनशानें तोफेवर पडले । टोपीवाल्याची फरडी झडली लडिवान पडली । लहान थोर जन रणभूमिशीं युद्धांस आला । दोहो सैन्याचा बहुतसा चेंदा तो झाला । गंगाधरशास्त्री वरून राज्याचा नाश झाला ॥ ३ ॥ दोन पलटणी येऊन पुण्यावर गारपिरी भरल्या । युक्ति युक्तीनें उठवून लावितां खडकीवर ठरल्या । अश्विन महिना एकादशी तरवारी झ-

---

१ ठाण्याचे किल्यांत प्रथम त्रिंबकजीस ठेविलें होतें. २ त्रिंबकजी एक महिन्यांत तुमचे हवालीं करून देतों असा वायदा बाजीरावानें केला ही उलटी मसलत केली असें सगनभाऊ म्हणतो. ३ बाजीराव दुसरे यांस बाबासाहेब म्हणत असत. ४ हे गोविंदराव काळे पेशव्यांचे वतीनें हैदराबादेस वकील होते पुढें ते इंग्रजींत बारामतीस वारले. ५ संगमावरील बेट. ६ हल्लीं जेथें ब्यांक व कलेक्टर कचेरी आहे त्या जाग्यावर पूर्वी गारपीर होता.

डल्या। तेराव्या दिसचा समाचार ऐकुन घ्या दाखला। एकुणचाळीस[1] ईश्वरी नाम संवत्सराला। गंगाधर शा० ॥ ४ ॥ लाख फौजेचा जमाव झाला श्रीमंतांपाशीं। रणभूमिवरि येऊन पडल्या तोफांच्या राशी। अलपीष्ठ[2] साहेब स्मित[3] साहेब आले रागाशीं। सिंधुराच्या[4] टेकडीवर दिल्या तोफेच्या राशी। अलपिष्ट साहेबाचा हुकुम तो झाला। गंगाधर शा० ॥ ५ ॥ करनल साहेब होते पलटणींत। आले धाऊन खडकीच्या मैदानांत। लढाइ करुन बहुत केली मात रंजुक झडत। पाचेचा हिरा दडेना वाटोवाटी चंद्र गगनांत। बापू गोखल्या सुरवर[5] स्तविती रणांत। तिनलाख फौज पळून गेली बापू गोखला राहिला रणांत। युद्ध केलें त्यानें युद्ध केलें बहुत। बाबा साहेब विश्वास देऊन माहुलीस गेला। बापू गोखला लढतां सवाप्रहर[6] दिवस आला। गंगा० ॥ ६ ॥ आधि गेले ते पार पडले पुण्याच्या पारीं। दाण्यासंगें किडे रगडिले म्हणती नरनारी। जो येतो तो लढतो हातामध्यें भाला घेउनी। शहरांत लोक आतां रडतात भारी। सगनभाऊ म्हणे ऐशी ईश्वराची करणी। बिबिछन कवि म्हणे चंद्र सूर्याशीं कलंक लागला। गंगाधरशास्त्री वरून राज्याचा नाश झाला। दक्षणच्या पेशव्या० ॥ ७ ॥

---

१ शके १७३९ सांत ही लढाई दिपवाळींतच झाली. २ एलफिन्स्तन. ३ स्मित हा शेवटीं आष्टीचे छाप्यांत होता. ४ ही सिंधुर टेंकडी एरवड्या नजीक आहे. ५ बापू गोखल्याचे शौर्य आणि हस्त लाघव पाहून देव त्याची स्तुति करू लागले. ६ प्रहर दिवसाचे पुढे मोठा दारुण युद्ध प्रसंग झाला.

## पोंवाडा.

( साताराचे अंगली राजे यांजवर. )

दक्षिणेमधीं सातारा हई । कैद झाली इंग्रेजी लई[१] । शाहु छत्रपती महाराज गेले बाई । गादीला[२] धनी असा परतून होणार नाहीं । कसें केलें कृष्णाबाई । माझे दिनाचे आई मोठे मोठे मानकरी झाले गाँई[३] । ते अपा[४] साहेब महाराज कपटी हई । इंग्रजानें फितूर केला । मिळून अपा साहेबाला । त्यांहीं माउलीचे वर बसून मनसुबा केला । त्या दिवशीं जाहिर केलें साताऱ्याला । दुसऱ्या दिवशीं कळलें महाराजाला । एक महिना सहा दिवस झाले त्याला । मग मोठी चिंता पडली त्यांला बाई ॥ शाहू० ॥ १ ॥ बुवासाहेब साताऱ्याचे धनी । कैद केले इंग्रंजांनीं । ते दोघे बंधु नेले जिथें हय राणी । मेण्याच्या झडपा लाविल्या इंग्रजांनीं । इंग्रजें भारिले भोयांला । मेणा मागें म्होरे केला । क्षणभरी विस्मय झाला अपाला । दादांचा मेणा दूर कसा राहिला ! । मेण्यांतून खालीं उतरला । ताकिद केली साऱ्या सैन्याला । त्या दिवशीं सेनापति शिव झाला । तो दिवस गेला अस्तमानाला । बुवासाहेब रडूं लागला । उभ्यानें आंग टाकी धरणीला । चौदा दिवस झाले बंधुच्या मरणाला । शाहू० ॥ २ ॥ दैवाची झाली माव पुत्र जन्मला।

---

१ अतिशय. २ राज्याला. ३ गाईप्रमाणें गरीब. ४ हे बुवासाहेब महाराज ( म्हणजे प्रतापसिंव्ह ) यांचे धाकटे बंधु शाहाजी. ५ हा प्रकार सर्व स० इ० १८३९ सांत झाला. ६ हे बुवा साहेब महाराज म्हणजे प्रतापसिंव्ह आणि शाहाजी या दोघांत भेद करून इंग्रेजांनीं शाहाजीस राज्याचा मालक करुन प्रतापसिंव्हास कैद केलें. ८ दोघा बंधूचे मेणे बरोबर चालविले असतां एक दूरकाढून नेला.

नांव जंगली राजा ठेविला । ठसा सैन्यांत पडला । खुशाली झाली बुवासाहेबांलो[१] । बुवासाहेब पुढें निघोन गेले काशीला । चट्ट निरोप दिला अवघ्या मानकऱ्यांला । तो खंडोबा शिंदा जवळ तिथें राहिला । दोन हत्ती इनाम बक्षीस दिले त्याला । तो निघोन आला दक्षिणेला । त्या दिवशीं गिराण होतें पूर्णिमेला । जाऊन अग्न लाविला होळीला । दोन प्रहराचा अम्मल झाला । रडती सारे । इंद्रचंद्र डळमळला । आज कशी आंधारी चढली साताऱ्याला । शाहु० ॥ ३ ॥ इंग्रज बोले त्या बाळाला । चलारे आपुल्या साताऱ्याला । गादिवर बसवितों तुला । मग जंगली राजांनीं जबाब कैसा दिला । धनी असतां साताऱ्याला । चौदा पेट्यांला इंग्रज आला । गांवगन्ना हुकुम फिरविला । किं पाटिल कुळकरणी असावे चावडीला । बाबाजीनें पोवाडा केला । नागू खूप सांगे विठूला । मारुती प्रसन्न त्याला । गांव नातें पोतें राहतो महादेव धरित्रीला । शाहु० ॥ ४ ॥

---

१ जंगली राजाचे वेळीं चौदा पेठे राज्य खालसा करून इंग्रेजांनीं महाराजास मेमगूक करून दिली होती. तीही नुकती बंद केल्याचें सर्वांस आठवत असेल. २ जंगलीराजा बुवासाहेबाचा पुत्र गादीवर बसविला म्हणून त्याचे बापास आनंद झाला.

## पोवाडा.

( कोलापुरचे आबामहाराजांवर. )

हा पवाडा दुसरा संभाजी ऊर्फ आबा महाराज यांस सयाजी मोहिते याणें सन १८१८ यावर्षी मारलें, त्याविषयीं आहे.

कोल्हापुरामधीं अवस्था कशी झाली मात। केला म्होइत्यानीं घात। महाराज वधिले कवीरांतें॥ धृ०॥ शिवाजीराजे नांव साजे[2] होता एक धर्मभाग्यवंत। करुनि गेला नांवाची कीर्त। त्याच्या पोटीं जन्मजेठि दोघे[3] पुत्र गुणवंत। राम लक्षुमण जोडी[4] कांत। पोशाक करी झोंक मारी जरी बादले[5] आंगावरी। मोत्यांचे तुरे खोचित होत। उंच उंचे[6] मोतें मांदिलांत। काळोखामधीं ढाळ देत। शिवाजी राजाचे पूत। तुळजापुराला डोंगरालीं दरवषांला जाइत। दोघे बंधु उभयतां॥ कोल्हा०॥ १॥

गंगेवर[9] पाण्यावर देऊळ त्यानीं बांधिलें अद्भुत। साउटं[10] दिसती धोंडयांत। कळा कुसरी नानापरी काढिल्या देवळावरी। म्होइते मराठी जात कपटी राजाचें मिठ खाइत होते। मस्ती[11] चढली आंगांत। बापलेंक होऊनि एक मनामधिं केलें खलबत[12]। महाराज मारा इतक्यांत। सोमवारीं दुसरे प्रहरीं महाराज होते एकांतांत। म्होइते आले ( राव ) सोधित। कोल्हा०॥ २॥

धरून धन्याचें मनगट हटून रोजमुरा[13] मागत। पि-

---

१ राजवाड्यांत. २ प्रथमचे शिवाजीचें नांव शोभत आहे. ३ आबा महाराज आणि बाबा महाराज. ४ सुंदर जोडी. ५ भरजरी वस्त्र. ६ बहुमोलाचे. ७ तेजदार. ८ शंभु महादेवाच्या डोंगराला. ९ पाताळ गंगा ह्मणून तीर्थ आहे. १० प्रतिबिंब दिसण्यासारखे दगड घोटले होते. ११ उनमात. १२ बेत. १३ पगार.

स्तुल मारी गुप्रांज । धन्याला काय कळलें नव्हतें । राजाचे लोक शिपाई बाके । एकापुढें एक धांवत । ढाल फिरंग हातांत । घरोघर गळा कापीत । लेकरांबाळांसहित । बावा महाराज खबर कळली धाऊनि आले वाड्यांत । मारिला गुद्याचा हात । मुर्दे[1] पडले धरणी वरते । आणा पैका निशाण ठोका घाला म्होइत्याच्या पदरांत[2] । तिनशें आरब संगातें । म्होइते, शिरें आणून शानें बांधिलीं वेशीच्या म्होरे । जनलोक थुंकती तोंडावर म्होइते मेले झाले म्होइते गेले शेणखाईत । राजाचे लोक यशवंत कोल्हा० ॥ ३ ॥

पन्हाळगड पावनगड आहे राजाचें तखेत । संभाळा आपली दौलत । राजाचे लोक मिळुनि समस्त शिरले वाड्यांत । वस्त्रें सोडून बघतात । राज्याच्या राण्या धनन्यांखाशा[3] आहेवपण[4] गेले म्हणतात । आणिक वाड्यांमध्यें रडतात । बयाबाई पतिव्रता झुरती आपल्या मनांत । पोटीं येऊन झालों व्यर्थ । राजाच्या बहिणी गौळणी कुरळ केंस तोडित बंधुसाठीं करती ओंट[6] । कोल्हा० ॥ ४ ॥

महाराज गेले बाहिर काढले शेटे सावकार बघतात । आणिक बाबा म्हणुनि रडतात । अबीरांचा गुलालाचा भडिमार सुटला पेठेंत । पाउल उठतें गुजरींत ॥ महाराजाला आज्ञा झाली टाळी वाजवा हरीभक्त । गरीब खेमाजी[7] नेणत । गाण्याचा आखाडा तीथ कोल्हा० ॥ ५ ॥

---

१ प्रेतें. २ गादी. ३ धनिणी. ४ सौभाग्यपण. ५ अट्टाहास्य. ६ बुक्याचा. ७ कवीचें नांव.

## पोंवाडा.

( नागपुरकर श्री० आपासाहेब भोंसले. )

शंभर[1] वर्षे राज्य केलें पहा भोंसल्यानें । गुरूकृपेनें ॥ बारा[2] वर्षे राज्य केलें चिमणा बापूनें । एका बुद्धीनें ॥ कर्नाटक बदामि घेतली चिमणा बापूनें । तलवारीनें ॥ गौड[3] देश बंगाला घेतला चिमणा बापूनें । इभ्रतीनें ॥ पुण्यासारखें तख्त हलविलें चिमणा बापूनें । बसविलें ठाणें ॥ राव पेशवे लोक मराठे चालति कडख्यानें । भोंवरथडीनें ॥ सुंदर चिमणा बापुस रस्ता दिधला नदीनें । त्याचे सत्तेनें ॥ टिपू[4] सुलतान मेला, वाट पडली तधिंपासून । फिरंगा नव्हता मालूम ॥ बाजीरावे[5] पेशवे गेले दर्यावसी चालून । फिरंगा आणला त्यानें ॥ बाजीरावांनें घर बुडविलें आपल्या हातानें । करणी

---

१. हा पोंवाडा सन १८३१ सालानंतर लिहिला असावा असें दिसतें, कारण भोंसल्यांस नागपूरचें राज्य सन १७३१ त किंवा नंतर मिळालें. यद्यपि हा पोंवाडा आपासाहेबाविषयीं आहे तथापि यांत इतर गोष्टीही सामील केल्या आहेत. यांतील सर्वच गोष्टी इतिहासांत सांपडतात असें नाहीं. हा पोंवाडा करणारा जातीचा शूद्र व शेतकरी असल्या कारणानें ऐकीव माहितीच्या अनुरोधानें लिहिला आहे.

२. चिमणाबापू हा मुधोजी भोंसल्याचा मुलगा. याचाच भाऊ दुसरा रघोजी ऊर्फ बापूसाहेब नागपुरचा तिसरा राजा होता. हा चिमणाबापू नागपूरचा कधीं राजा नव्हता. ज्याप्रमाणें चिमा आपा यांनीं थोरले बाजीराव यांचें सहाय्य केलें तसें चिमणाबापूनें केलें. हा मोठा शूर होता. हा सन १७८९ त मरण पावला. या पूर्वीचीं बारा वर्षे याचे कारकीर्दीचीं असें समजावें.

३. सन १७७९.

४ टिपू सुलतान हा सन १७९९ चे मे महिन्याचे ४ थे तारखेस मेला.

५. होळकराचे भीतीनें सन १८०२ त वसई मुक्कामीं राव बाजी पळून गेले.

६. सन १८०२ चे अखेरीस रावबाजीनें वसई मुक्कामीं तह केला व त्यामुळें जो अनर्थापात झाला त्यास उद्देशून हें लिहिलें आहे.

केलि नबाबानें[1] ॥ दक्षिण मोडून आला फिरंगी पहा तो डंकेन[2] । पुण्यामधिं बसविलें ठाणें ॥ तवां तो राजा[3] म्हणे उद्यां मी पुसीन अवघ्यांसी । पत्र पाठवा पुण्यासी ॥ १ ॥ उमाबाई करी रोदना राजाचे[4] साठीं । कधीं येतील महालाप्रती ॥ धृ० ॥

तवां तो गोरा म्हणे गाविलगडिं गडा पाहीन । जलदी आला चालून ॥ फिरंग्यानें पैन खाईली आपल्या जातीनें । गाविलगड म्हणे मी घेईन ॥ फितुर केला गोंडानें, रस्ता दाखविला त्यानें । गडावर गेला चालून ॥ नामी होता सरदार बेनिसिंग आपल्या जातीनें । तलवार खुप केली त्यानें ॥ बेनिसिंगाचा सवाइ सपाटा केला छापा त्यानें । फिरंगाचि केली धुळधाण ॥ जेर केला फिरंगी मरून गेला आपल्या हातानें । निमक राखलें त्यानें ॥ तवां तो गोरा म्हणे मुल्क हा मोठा तूफान । खानेकु नहि मिलता आन ॥ तवां तो गोरा[5] म्हणे नागपुर एकडाव पाहीन । जलदी आला चालून ॥ सीताबर्डीवर मुकाम केला, ऐका चित्त देउन । बंगला बांधला त्यानें ॥ दोन आणे[6] लिहून दिल्हे बापू साहेबानें । राज्य करावें भोंसल्यानें ॥ उमाबाई० ॥ २ ॥

---

१. ह्या गोष्टीविषयीं माहिती मिळत नाहीं.

२. डंकन हा कोणी कर्नल आर्थर वेलस्ली (पुढें ड्यूक आफ वेलिंग्टन्) याचे सैन्यांतील सरदार असावा.

३. दुसरा रघोजी ऊर्फ बापूसाहेब.

४. आपासाहेबासाठीं.

५. आनरबल मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन. हा स्थायिक रेसिडंटपैकीं पहिला होय. हा सन १८०४ त नागपुरीं आला.

६ हें देवगांवचे तहास अनुलक्षून लिहिलें आहेसें दिसतें.

चौखुंटांचें राज्य दिधलें आपासाहेबाला। बाळाला तर्क्ती बसविला ॥ मारुन बाळा राजा, राज्य केलें आपासाहेबानें। नव महिन्याचें प्रमाण ॥ काशीबाई[2] सती निघाली पाहिलें अवघ्यानें। शाप दिधला सतीनें ॥ धर्माजीनें[3] मुल्क लूटला केलें वैराण। खर्ची खुप केली त्यानें ॥ धर्माजीचे दिवस पूरले, बुड केली त्यानें। मरणा गेला जातीनें ॥ उमाबाई० ॥ ३ ॥

मग मारुन धर्माजीला बातमी कळली बाईला। क्रोध बाईशीं आला ॥ जवळ होता पंडितजी[4] मनसुबा सांगितला तीला। कैद करावें राजाला ॥ "कैद करा राजाशी, राज्य देतों तुम्हासी"। असें सांगा इंग्रेजासी ॥ तसे चौघे[5] चालून गेले सीताबर्डीला। हकिकत सांगती फिरंग्याला ॥ "करा कैद राजाला, राज्य देतों तुम्हाला" तेव्हां फिरंगी हांसला ॥ दोन हत्ती रुपये कबूल फिरंगी झाला। पहा रामचंद्र वाघाला ॥ उमाबाई० ॥ ४ ॥

तैसे चौघे चालुन आले पहा त्या महालाला। हकिकत

---

१. परसोजी हा चवथा राजा.

२. परसोजीची बायको. ३ हा बाकाबाईचे तर्फेचा होता. परसोजी राज्यकारभार चालविण्यास अयोग्य म्हणून त्याचे मांडोवर कोणास तरी बसवून राज्य चालवावें असा बाकाबाईचा व तिचे अनुयायी यांचा मनोदय होता. तो आपासाहेबास म रुचून त्यानें बाकाबाईस कैद केलें व धर्माजीस ठार मारिलें. आपासाहेबाचे भीतीनें गुजाबादादा प्रयागास पळून गेला. हें सर्व झाल्यावर परसोजीस मारिलें.

४. नारायणराव पंडितजी. हा काशीकडील राहणारा असून नागपुर मुक्कामीं व्यापार करीत असे. व्यापारी असून हा पुढें मुत्सदी बनला.

५. सर रिचर्ड जेंकिन्स् हा या वेळीं रेसिडंट होता.

६. रामचंद्र वाघ. नागो पंडित. नारायणराव पंडित व चवथ्याचें नांव माहित नाहीं.

सांगति राजाला ॥ "कां वसलां निश्चित गोरा येतो लढाईला"। असा पंडितजी बोलला ॥ यादव[1] माधव पोवान बरकत तो चालुन आला। जमाव फौजेचा झाला ॥ भिकन खान पठाण जमादार तो चालुन आला। मोरचे लावी किल्ल्याला ॥ गणपतराव सुभेदार आले चालून। संगातीं लोक घेऊन ॥ साडे तीनशें हत्ती राजाचे जन पाहति दूरुन। जसें कां मुंग्याचें सैन्य ॥ साठ हजार फौज राजाची ऊभी नटून। हुकुम मागती अवघेजण ॥ सुरू झाली लढाई ठाउक नाहीं कवणाला। फितुर घरच्यानें केला ॥ उमाबाई० ॥ ५ ॥

तैसे चौघे चालुन आले पारडी[2] महलाला। हकिकत सांगति राजाला ॥ दोन गोष्टिचें काम आहे यावें जातीनें। राज्य घ्यावें समजून ॥ तेंव्हां आरब बोलले नको जाऊं भेटीकारण। राजे गेले उठून ॥ म्हणे राजा निर्मळ वचन ऐकलें त्यानें। वर दिला उमाबाईनें ॥ मला आण पित्याची गाईचें पुच्छ धरून। क्रिया केली ब्राम्हणानें[3] ॥ जवळ होता हलकाऱ्या घोडा आणविला त्यानें। राजा गेला चालून ॥ सीताबर्डीवर चालुन गेला आपल्या जातीनें। बसविला हात धरून ॥ जवळ होता सोजर तंबुर वाजविला त्यानें। तुरुप पडला जाऊन ॥ तवां

---

१. हीं नांवें अप्रसिद्ध आहेत.

२. हें नागपुरचे पश्चिमेस दोन कोसांवर गांव आहे. येथें राजाची छावणी असे. तेथें एक राजाचा वाडाही असे. प्रस्तुत कांहींएक पूर्वीचें नाहीं.

३. या ब्राम्हणाचें नांव विनायकराव. याचे वंशज सधन असून प्रस्तुत राज्यकर्त्यांची एकनिष्ठतेनें सेवा करीत आहेत. यांजकडे मोठ्या हुद्याचें काम आहे म्हणून ऐकतों.

तो राजा म्हणे हाल होतिल या जिवाशीं । कुणि नाहीं माझ्या पाशीं ॥ उमाबाई० ॥ ६ ॥

बाणापाठीं बाण गणपतरावानें मारला । फिरंगा थर थर कांपला ॥ रामचंद्र वाघानें गोळा सणाटा भरला । अवाज तोफेचा केला ॥ माय टाकी लेंकरूं पळे जीव आपुला घेऊन । मराठ्यानें धरलेंसे रान ॥ अवघे गेले पळुन बाणी राखिलि आरबानें । देहवळा मारी क्रोधानें ॥ फिरविल्यासे तोफा जिन घोड्याचें उतरून । फिरंगा जातो येथून ॥ फिरवला जरिपटका पहा रामचंद्र वाघानें । लढाई बंद केली त्यानें ॥ या आदितवारीं लढाई करावि नेमाची । मदत आहों तुम्हाशी ॥ उमाबाई० ॥ ७ ॥

तेरा रोज आरब भांडले पहा फिरंग्याशीं । कुणितरी मदत नाहिं त्यांशीं ॥ दोन हत्ती रुपये कबूल झाले अरबाशीं । अरब ना मानी फिरंग्याशीं ॥ फोडूं पंडितजीची कोठी जाऊं देशाला । तवां समजलें दुनियेला ॥ तवां तो गोरा चालुन गेला राजाचे पाशीं । कटारी लावी छातीशी ॥ " दे विद्या अरबाशीं, नाहिं तरि मारतों तुशीं " । असें बोलला राजाशीं ॥ म्हणे राजा निर्मळ असवें टाकी धरणीशीं । लीहून दिलें अरबाशीं ॥ उमाबाई० ॥ ८ ॥

राजा धरला म्हणून बातमी उमाबाईला । अंग टाकिलें धरणीला ॥ तूं धर्माचा पिता करुणा येऊं दे तुला । विनवी रामचंद्र वाघाला ॥ दे सोडुन राजाला आम्ही दोघे जातों काशीला । राज्य देऊं फिरंग्याला ॥

सुवर्णाच्या पाच पायऱ्या बांधिन अंबाळ्याला[1]। धर्म वांटिन लोकांला ॥ चालतां न बोलतां दया आली पंडितजीला। राजा त्यानें सोडवीला ॥ फार केले नवस देव पावला बाईशीं। राजे आले महलासी ॥ संग देऊन सोजर राजे आले महालासी। पाणी ठेविले अंघोळिशी ॥ उमाबाई पुसे कशी गत झाली राजाशी। बसले तोंड धुयाशी ॥ तंव तो राजा म्हणे उद्यां मी पुसीन अवघ्यासी। बातमी कळली बाईसी ॥ कोणी धरिला राजा, कोणी सोडविलें राजाला। एसा रामचंद्र वाघाला ॥ हा ना आमचा वैरी उद्यां मारिल आम्हाला। कैद करावें राजाला ॥ तैसे चौघे चालुन आले पहा त्या महालाला। कैद केलें राजाला ॥ उमाबाई म्हणे भोजन वाढुंद्या राजाशी। ढकललें उमाबाईशी ॥ उमाबाई० ॥ ९ ॥

तवां ती बाई म्हणे पाठवा कलकत्त्यावर। राजा जाऊं दे लौकर ॥ गामी होता सरदार गंगासिंग अपुल्या जातीवर। पलटुन उभे राहिले सारे ॥ किल्ल्यांतुन बाहिर काढिले राजे सुंदर। कुणिकडे गेला ईश्वर ॥ राजा प्राण्याविना महाल सुन्ना दिसतो सत्वर। कसा कोपला ईश्वर ॥ राजा प्राण्यासाठीं कैक लोक झाले फिकिर। रडतें नागपूर सारें ॥ राजा प्राण्यासाठीं त्यजिलें अन्नपाणी सारें। बरें ना वाटे घरदार ॥ खळ खळ रडतो राजा आसु टाकी धरणीवर। कुणिकडे

१. अंबाळें या नांवाचें एक मोठें तळें रामटेक गांवीं आहे. हें मोठें तीर्थ मानिलें आहे.

गेलें चंद्रपूर ॥ गंगासिंगाची नजर गेली राजाचे वर। आसवां पुसे लौकर ॥ "कां म्हणून जी दिलगिरि, कुणि नाहीं आपला जवळ"। "आपला आहे ईश्वर" ॥ समजले महाराज गंगासिंग सांग लवकर। जाणें कलकत्त्यावर ॥ आला भोग भोगाया त्यासि व्हावें सादर। जसा एक दैवाचा फेर ॥ हरिश्चंद्राचे मागें लागला विश्वामीतर। तारामती सुंदर ॥ डोंमाघरीं पाणी वाहिलें सत्वर ऐकीलें। इस्त्री विकुनी दान केलें ॥ उमाबाई० ॥ १०॥

हत्ती दिला सोडून तिसऱ्या मुक्कामावर। राजे काढले बाहेर ॥ गंगासिंग तो घेउन चालला राजा सत्वर। महादेवाच्या[1] जवळ ॥ गंगासिंगासी आली निद्रा निजले लौकर। राजे होते हुषार ॥ महादेव पार्वती आली त्या राजाजवळ। खुण सांगे दिल्ली शहर ॥ "येथ नको राहुं चल आसिरच्या[2] किल्ल्यावर। फिरंग आहे येणार" ॥ गंगासिंगाची झाली निद्रा उठले लौकर। राजे होते हुषार ॥ अदृश झाले देव, राजा पाहतो सत्वर। कुणिकडे गेला ईश्वर ॥ गंगासिंग तो घेऊन चालला राजा सत्वर। पहा आसिरच्या किल्ल्यावर ॥ उमाबाई० ॥ ११ ॥

राजा सुटला म्हणून बातमी कळली फिरंग्याला। फिरंगी मनांत घाबरला ॥ कुणिकडे गेला राजा, कुणिकडे जाऊं पाहण्याला। "राजा कुणिकडे गेला" ॥

---

१. मध्य प्रदेशांत एक प्रसिद्ध देवस्थान आहे. हें पंचमडी पर्वतांत आहे.

२. असिरगड हा बऱ्हाणपुराजवळ ७ कोसांवर आहे.

तवां ती बाई म्हणे बातमी समजली मला । महादेवाच्या पहाडाला ॥ बारा हजार आणि लाडसाब[1] चालून गेला । महादेवाच्या पहाडाला ॥ घडिभर झडली चकमक गगनीं सूर्य झाकुळला ॥ बाप ओळखेना लेंकाला ॥ पंचमोडीचा[2] राजा मोहनसिंग तो एक अलबेला । बातमी सांगे फिरंग्याला ॥ येथ नाहीं राजा चल असिरच्या किल्ल्याला । राजा तेथं राहिला ॥ बारा हजार आणि लाडसाब चालुन गेला । पहा असिरच्या किल्ल्याला ॥ चौदा हजार पेंडारि[3] पहा शिद्याचा सूटला । मदत राजाकडे झाला ॥ पदरीं नव्हती खर्ची हुक्का राजानें विकला ॥ किंमत काय साठ हजाराला ॥ फोडिले खजिने लूटन दिले कैकाला । लढाई घ्या म्हणून बोलला ॥ कैक गेले पळून, कैक पडले धरणीला । गिणती नाहीं मुरद्याला ॥ सलाम तलवार सवाई झाली भोंसल्याची । रुपये वाटा फौजेशी ॥ आपासाहेबानें तैलंगा खुप गारद केला । टोपी आली नागपुराला ॥ उमाबाई० ॥ १२ ॥

राजा सुटला म्हणून बातमी उमाबाईला । बहु समजावी मनाला ॥ पदरीं नव्हती खर्ची राजा कुणिकडे गेला । कुणिकडे जाऊं पाहण्याला ॥ नळानिळासारखी कशि गत झाली राजाला । कंठ बाईचा शोषला । रा-

---

१. मध्यप्रांतांत हुद्देदार साहेब लोकांस " लाड " म्हणण्याची चाल आहे.

२. हा पर्वत आहे. ज्याप्रमाणें 'महाबळेश्वर' आपल्या हिकडे आहे त्याप्रमाणें हा पर्वत मध्यप्रांतीं आहे.

३. पेंढाऱ्यांचा नाईक 'चितु' हा आपासाहेबास भेटल्याचें आपासाहेब प्रकरणीं सांगितलें आहे.

जा राजा करतां करतां प्राण बाईचा गेला। शव मग पडलें धरणीला॥ मेली उमाबाई बातमी कळली राजाला। कसा देव मजवर कोपला॥ भगवीं केलीं वस्त्रें, राख लावी आंगाला। जोग राजानें केला॥ सत्रंजी उतरुनि शिकांच्या मुलखांत गेला। ईश्वर मदत होता त्याला॥ देवधर्म अवघी बरकत गेली काशीला। रोजगार अवघ्यांचा बुडाला॥ तिकडे कसें जाहलें इकडे ठाऊक नाहीं आम्हांला। पोवाडा बापूनें केला॥ बापू मराठा म्हणे म्होर युद्ध होईल भारी। लढाई झाली नागपुरीं॥ उमाबाई० ॥ १२ ॥

---

## पोंवाडा.

( उमाजी नाइकावर. )

तुम्ही आयका अर्ज थोडा। गातो पवाडा। जिवाचा धडा। उमाजी नायकाचा॥ दादोबा नाइक रणशूर त्याचा पुत्र[१]। उमाजी नाईक सरदार। काशी परगण्यांत महशुर॥ गड किल्ले पुणें धार। डोंगरावर। आकाड मरदाचा परकार। नाईक मंडळी आहे थोर॥ शिवाजी नाईक धरून। हस्तें करून। घेऊन गेला दिव्याला। गुणगुण कळली नाईकाला॥ नायकानें विचार केला। जाउन वेढा दिला। शिवाजीला। तेव्हां कलीला मूळ झाला। पांडोबा नाईक लिहिणार। भले बोलणार। बोलणें केलें साहेबाम्होरं। त्या कलकत्यावर॥ साहेब बोलता झाला। रामोशाला। टापेरून[२] गेला। बिडी तयार करायाला। सहा महिने स्वारी हिंडली। किल्ल्याभों-

---

१. मुलगा. २ डोष ठेवून.

ताली। कांहीं नाहीं लाभ हाताला साहेब मनामधिं भ्याला ॥ इंग्रज बुद्धीचें घर। करून फितूर। पत्र पाठविलें पंताला[1]। द्या धरून उमाजीला। अवघे पंत मिळून। विचार करून पत्र पाठविलें उमाजीला। यावें नाईक भेटीला ॥ उमाजी नाईक बोलला। आपल्या लोकांला। द्या घोडा बसायाला। जातों पंताच्या भेटीला। घोड्यावर स्वार झाला। हातामधिं *भाला*। चालून भोराला गेला। बैठक मुजरा केला ॥ तेंव्हां पंत धणी बोलला। आपल्या लोकांला। धरा धरा उमाजीला। चावी कुलूप वाड्याला। तेंव्हां भुजाबा[2] नाईक बोलला। आपल्या लोकांला। उशीर कां झाला दादाला। चला जाऊं दादाच्या भेटीला ॥ संगें पाच्छे तरवार। आगीचें घर। वाघनख चढविलें बोटाला। शूर मर्द तयार झाला। घोड्यावर स्वार झाला। हातामधिं भाला चालून भोराला गेला। ते दोनप्रहरीं दंगा केला ॥ तेंव्हां भुजाबा नाईक बोलला। पंत धण्याला। उमाजी दाखवा आम्हांला। कट्यार लाविन पोटाला। उमाजी म्हणे पंताला। भुजाबानें लाल डोळा केला। बामण धोतरांत मुतला ॥ तेंव्हां पंत धनी बोलला। आपल्या लोकांला। बाहेर कांढा उमाजीला। कर पोषाग भुजाबाला। चार वर्णाचे हांडे। ढुरुन भाकरी। द्यावी नायकाच्या मनुष्यांला। करावी मेजवानी त्याला ॥ ह्याची वतनदारी असून। नाहीं म्हणून। पंत बेइमानी झाले सारे। पत्र तांब्याचे करार। पांडोबा फिरंगोबा-

---

१ भोरचे पंत. २ बंधु भुजाबा.

जा राजा करतां करतां प्राण बाईचा गेला । शव मग पडलें धरणीला ॥ मेली उमाबाई बातमी कळली राजाला । कसा देव मजवर कोपला ॥ भगवीं केलीं वस्त्रें, राख लावी आंगाला । जोग राजानें केला ॥ सत्रंजी उतरुनि शिकांच्या मुलखांत गेला । ईश्वर मदत होता त्याला ॥ देवधर्म अवघी बरकत गेली काशीला । रोजगार अवघ्यांचा बुडाला ॥ तिकडे कसें जाहलें इकडे ठाऊक नाहीं आम्हांला । पोवाडा बापूनें केला ॥ बापू मराठा म्हणे म्होर युद्ध होईल भारी । लढाई झाली नागपुरीं ॥ उमाबाई० ॥ १३ ॥

---

## पोवाडा.

( उमाजी नाइकावर. )

तुम्ही आयका अर्ज थोडा । गातो पवाडा । जिवाचा धडा । उमाजी नायकाचा ॥ दादोबा नाइक रणशूर त्याचा पूत्र[१] । उमाजी नाईक सरदार । काशी परगण्यांत महशुर ॥ गड किल्ले पुणें धार । डोंगरावर । आकाड मरदाचा परकार । नाईक मंडळी आहे थोर ॥ शिवाजी नाईक धरून । हस्तें करून । घेऊन गेला दिव्याला । गुणगुण कळली नाईकाला ॥ नायकानें विचार केला । जाउन वेढा दिला । शिवाजीला । तेंव्हां कलीला मूळ झाला । पांडोबा नाईक लिहिणार । भले बोलणार । बोलणें केलें साहेबाम्होरं । त्या कलकत्यावर ॥ साहेब बोलता झाला । रामोशाला । टापेरून[२] गेला । विडी तयार करायाला । सहा महिने स्वारी हिंडली । किल्ल्याभों-

१. मुलगा. २ टोप ठेवून.

ताली। कांहीं नाहीं लाभ हाताला साहेब मनामधिं भ्याला॥ इंग्रज बुद्धीचें घर। करून फितूर। पत्र पाठविलें पंताला[1]। द्या धरून उमाजीला। अवघे पंत मिळून। विचार करून पत्र पाठविलें उमाजीला। यावें नाईक भेटीला॥ उमाजी नाईक बोलला। आपल्या लोकांला। द्या घोडा बसायाला। जातों पंताच्या भेटीला। घोड्यावर स्वार झाला। हातामधिं भाला। चालून भोराला गेला। बैठक मुजरा केला॥ तेव्हां पंत धणी बोलला। आपल्या लोकांला। धरा धरा उमाजीला। चावी कुलूप वाड्याला। तेव्हां भुजाबा[2] नाईक बोलला। आपल्या लोकांला। उशीर कां झाला दादाला। चला जाऊं दादाच्या भेटीला॥ संगें पाच्छे तरवार। आगीचें घर। वाघनख चढविलें बोटाला। शूर मर्द तयार झाला। घोड्यावर स्वार झाला। हातामधिं भाला चालून भोराला गेला। ते दोनप्रहरीं दंगा केला॥ तेव्हां भुजाबा नाईक बोलला। पंत धण्याला। उमाजी दाखवा आम्हांला। कट्यार लाविन पोटाला। उमाजी म्हणे पंताला। भुजाबानें लाल डोळा केला। बामण धोतरांत मुतला॥ तेव्हां पंत धनी बोलला। आपल्या लोकांला। बाहेर कांढा उमाजीला। कर पोषाग भुजाबाला। चार वर्णाचे हांडे। दुरुन भाकरी। द्यावी नायकाच्या मनुष्यांला। करावी मेजवानी त्याला॥ ह्याची वतनदारी असून। नाहीं म्हणून। पंत बेइमानी झाले सारे। पत्र तांब्याचे करार। पांडोबा फिरंगोबा-

---

१ भोरचे पंत. २ बंधु भुजाबा.

नें। लढाई मारुन। निघून गेले तांब्याच्या मळ्याला। विसावा घेयाला॥सद्‌ु गवळी धरून। दुस्त करून। मास पाटींत भरून। पाठविला मुंबईला। तेथें चांग्या म्हार धरून। त्याचें नाक कापुन। ऐसा बोलला। जांउन सांग साहेबाला॥ दिव्याच्या घाटानें। उमाजी एकलाच गेला। माहित नाहीं कोणाला। पुढें आइतवार दिवस आला। उमाजी जेजुरीस गेला। वाहतो भंडार देवाला॥ तिन दिवसांचा उपाशी। भूक पोटासी। आरंभ स्वयंपाका केला। गोड गोड भोजनाला। पहिला घांस उचलिला। वेढा तपाश्याचा पडला। धरा धरा उमाजीला॥ उमाजी नाईक बोलला त्या आरबांला बार तुम्ही नको करूं बंदुकीला। आम्हीं बसलों भोजनाला। आरबाची जात वेडी। कांहीं कळेना। सुमार धरून बार त्यानें नेमाचा केला। तेव्हां पांडोबा ठार जाहला॥ उमाजी नाईक बोलला। आपल्या मनाला। घोस मोत्यांचा हरपला। जोडी नाहीं भुजाबाला॥ इंग्रज बुद्धीचें घर। करुन फितूर। पत्र पाठविलें जिजाईला। धरून दे तुझ्या भावाला॥ तुझे दोघेजण पुत्र। चाकरी लाविन गुजराथेला। कडीं तोडे इनाम त्याला। चार गांव इनाम त्यांला। मग पैजेचा विडा उचलला। हात छातीशीं लावला। धरून मी देतें दादाला॥ सण संक्रांतीचा आला। पत्र पाठविलें उमाजीला। यावें तुम्ही दादा भेटीला। गंगाराम भाचा धाडिला। घेउनिया आपल्या मामाला। गोड गोड जेवायाला। तेव्हां उमाजी नाईक बोलला। भुजाबाला। चोळी पात-

ळ द्या मजला ॥ जातों मी जिजाईच्या भेटीला । भुजाबा नाईक बोलला । आग लागो तुझ्या भेटीला । होईल दगा तुम्हाला । भावाचा शब्द मोडिला । निघून दिव्याला गेला । त्या बहिणीच्या गांवाला ॥ ऊन पाणी अंघोळीला पाट काय ठेविले बसायाला । बेलभंडार बाजूला । केलें पंचामृत भोजन । दादा तुम्ही यावें भोजनाला । मी तर जातें पाण्याला । डांक मारिते पुण्याला ॥ पहिला घांस उचलिला । वेढा तपाश्याचा पडला । धरा धरा उमाजीला । दोन हातांत दोन पट्टे । वाघनख निट । जंबवा होता कंबरेला । शूर मर्द तयार झाला ॥ उमाजी नाईक बोलला । बहिणी तुझें काय केलें । जिता वाघ धरून दिला । नाना डफेदार बोलला । हत्यारें घेउद्या मजला । तेव्हां मग धरीन तुम्हांला ॥ येसु कविधार बोलला । गोड गोड घाला उमाजीला । नेऊं मेल्या मुद्याला । उमाजी नाईक बोलला । मला कांहीं लागत नाहीं हाताला । जाईन पुण्याला ॥ गंगाराम भाचा बोलला । मामा तुम्ही फार दंगा केला । आतां तरी जावें पुण्याला । तुकाराम भाचा बोलला । मामाला आणुन वाईट केलें । पुरतें जेऊं नाहीं दिलें ॥ तुकाराम भाचा बोलला । सोडा सोडा मामाला । जिव मी दान देतों त्याला । उमाजी नाईक बोलला । स्वारीवाला । स्वारी जाऊंदे गांवाला । मूलमाणसें पाह्याला ॥ स्वारीवाल्यानें विचार केला । स्वारी नेली गांवाला । एक रात्रीच्या विसांव्याला । उमाजीची नार बोलली तुम्ही तर जातां गळाला । नवती येईल क-

डेला। आंग टाकिते धरणीला॥ भुजावा नाईक बोलला। आपल्या लोकांला। उशीर कां झाला दादाला। चला जाऊं दादाच्या भेटीला। घोड्यावर स्वार जाहला। चालून दिऽयाला गेला। त्या बहिणीच्या गांवाला। गुणगुण कळली भुजावाला। नेला धरून पुण्याला॥ धांव चाल करून। दिऽयाचा घाट त्यांनीं धरिला। उभें राहवें लढाईला। तिन दिवस लढला तरी। एकला भारी। सैन्याला जरजर केलें॥ चौघांची. मिळाली गडी लागेल पाठीं मोड त्यांनीं सैन्याचा केला। पडतील जखमा कैकांला। भुजावा नाईक बोलला। एकदां भेटेन दादाला। तेंव्हां मग सोडीन तुम्हांला॥ भाऊ भावाजवळ गेला। रामराम केला। दादा तुम्ही जातां पुण्याला। कांहीं तरी सांगा आम्हाला। कमी नाहीं दौलतीला। पगार तुम्ही वाटा अवघ्यांला। द्या वाटा सैन्याला॥ दो बाजुस अरबाच्या जोड्या मागें पुढें साहेबाचे मेणे तेंव्हां नायकाला कैद नाहीं केला। उमाजी नाईक बोलला स्वारीवाल्याला। जरासें सैल कर मजला। विराकतीला उशीर झाला॥ विराकतीच्या निमित्तानें। सजेल जोडा मारिला। दिल्लीचा साहेब ठार केला। रथ गाडी तयार केली उमाजीला गाडींत बसविला गेला खडकिच्या म्होर दाभोळच्या पुढें॥ गेला दाकतरच्या बंगल्याला। दाकतर साहेब बोलला द्यावें फांशी उमाजीला। पहिला फांस तयार केला। उमाजी फांशी चढविला। फांसाचे तीन तुकडे झाले॥ उमाजी नाईक

बोलला साहेबाला। साहेब तुम्ही फार जुलूम केला आउक्ष[1] नाहीं पुरा जाहला। तिसरा फांस तयार केला। उमाजी येलकोट[2] बोलला। मर्दांचा[3] प्राण निघून गेला। येसु कविधार बोलला। रांडेनें खून दावा केला। भाऊ बहिणीनें घालविला। दुनया[4] हळहळते त्याला ॥

---

पोंवाडा.

( पेंढाऱ्याचा दंगा. दामाजीपंताच्या रसदीचे चालीवर )

रामजोशीकृत

यंदा घरधन्यानें धंदा केला कटकाला[5] गेला। ध्रु० ॥
शिंदे होळकर आले कळवंडी[6], मरणाची हुंडी। विरळी[7] त्या रणांत जगली मुंडी[8], हंडीवर हंडी। फुटली, भलत्यासचि भलता दंडी, पैक्याला धुंडी। फिरती किति पठाणाच्या झुंडी, देउनि तरमुंडी। झाले सबळांचे शिपाई लंडी, तृण[9] धरिती तुंडी[10]। धरिती ब्राम्हणादिकांची शेंडी, गवसल्या न संडी। घेती मोहरानीं भरली-गुंडी,[11] जडिताचि करंडी[12]। हंडे मग पळी पिताळि कासंडी, कोणि पुसतो गिंडी। कैची तागडी कशाची दांडी, लोळति जिन्नस लोखंडी। अशि दुनिया लुंडी। केली, भंगिल्या शिवाच्या पिंडी, किति गणपति चंडी। कैच्या मग तेथें धड उतरंडी, कण नाहीं वरंडी।

---

१ आयुष्य. २ खंडेरावाचें नांवानें गजर. ३ शुराचा. ४ सर्वलोक. ५ सैन्यास. ६ भांडाभांडीस. ७ क्वचित. ८ मस्तक. ९ गवत. १० तोंडांत. ११ वाटोळें भांडें. १२ आतांपेक्षां पूर्वी संपत्ति विशेष होती.

गर्दी गुरु कोण कुणाचा चेला, कटकाला गेला । यंदा घरधन्यानें० ॥ ध्रु० ॥ १ ॥

झाली भूतळांत अंदाधुंदी, मग उठले फंदी । नानापरि बंडें गैरसंदी, घातुक मुतफंदी । त्याणीं गंगातट लांबी रुंदी, आसमुद्र[1] कुंदी । केली, धन हरुनी चोळीचिंधी, द्विजें[2] घालुनि वंदी । भवताली सोबंदी । सारी मग त्याचिच नाकेबंदी, जावया न संधी । म्हणती बेदर लाव सुना बंदी, कुच नगदी चंदी । लोले कुच खिलाव दळिया बुंदी, क्यौं इतनी रिंदी । नाहीं म्हणतां मग मार बिलंदी, या खटल्या संबंधी । देती, वांचला न कोणी तिंदी । प्राणाची मंदी । पायीं यवनां[3]च्या ब्राम्हण वंदी, नच सोडिती दंदी । सांगुं किति दुनयेवर बेबंदी, ही मसलत खंदी । ऐसा भूलोक यमानें नेला, कटकाला गेला । यंदा घरधन्यानें० ॥ २ ॥ ध्रु० ॥

वाटे प्रळयच हा श्रीरंगा, आजच्या प्रसंगा । अटकेपासुनी धराही गंगा, यवनाच्या चुंगा । हिंदु लागलेच त्या अनुषंगा, हातीं नग्न फिरंगा । भाले तिरकमठे बरच्या सांगा, उडविती तुरंगां[4] । कांहीं कर्नाटक् देश तेलंगा जगला परिबिंगा । केला त्या फिरंग्यानीं मुंगा घेउनिया नंगा । कोठें राहिला न पालालुंगा, वाळला गळंगा । आधी जन भ्याले काळ भुजंगा त्यावर हा धिंगा । मांस मद्याच्या भरल्या तुंगा त्या द्विजोत्तमांगा । वर त्याहि बिगार केवढा दंगा, क्षिति नेली भंगा । याणें जगउनि आणिला शिंगा, कुतराहि कुलं-

---

१ समुद्रपर्यंत. २ ब्राह्मण. ३ मुसलमान (परदेशीय.) ४ घोड्यांस.

गा ॥ यावें बाई झडकरि मत्संगा पाहुनि प्रसंगा। माझा कविराय फुलांचा झेला, कटकाला गेला यंदा घर० ॥ ३ ॥

## पोवाडा.

( पुणें शहर वर्णन. रामजोशीकृत )

श्रीमंत पेशवे प्रधान बहु प्रीतीचे ॥ अष्ट प्रधानांमध्यें उतरले मर्जित [1] महाराजांचे ॥ वसविलें त्यांनीं पुणें शहर टुमदारीचें ॥ जागोजाग बांधुले दाट नळ पाण्याचे ॥ ठायिं ठायिं शोभती हौद एक फर्म्यांचे ॥ धनी कृपावंत प्रभु कल्याण करी रयतेचें ॥ लंकाच पुण्यामध्यें लेश न दारिद्र्याचें [2] ॥ शहरांत घरोघर सावकार गबर घरचे ॥ सरदार एकाहून एक श्रीमंताचे ॥ लढणार शिपाई किती सांगू मी वाचे ॥ हत्ती घोडे रथ आंबारी थवे पालख्यांचे [3] ॥ सरकार वाड्या भौतालीं झुलती बाहारीचे ॥ जागोजाग वस्ती भरदार गर्दी बाजार कमती नसे कांहीं ॥ पुणें शहर अमोलिक [4] रचना दुसरी नाहीं ॥ ब्राम्हणी राज्य जोरदार घोड्यावरी स्वार होते शिपाई ॥ जबर सद्दी [5] कैकांनीं पाहिली शत्रु ठेविले नाहीं ॥ उत्तम पुण्याच्या भोंवतीं शोभती बागा ॥ शहरांत हजारों स्वार घोड्यांच्या पागा ॥ भले

१ छत्रपतीचे मर्जीत पेशवेच उतरले. २ पूर्वी पुण्यांत संपती आतांहून पुष्कळ अधिक होती हें अनेक कारणावरून व्यक्त होतें. ३ पालख्या, रथ, आंबाऱ्या जाऊन त्यांच्या ऐवजों हल्लीं शिग्राम, बग्या, ब्रूम, फेटनी झाल्या आहेत. ४ या शहरासारखी ठेवण व रीत रिवाज हीं दुसऱ्या शहराची अजूनही कोठें आढळत नाहीं. ५ हल्लीं इंग्रेजांची जशी सद्दी दिसते तशीच पूर्वी पेशव्यांची होती काळचक्राखालीं कोणतीच टिकणार नाहीं हें उघड आहे.

भले धनंतर वाडे हवेल्या जागा ॥ आळोआळीं झळकती एकसारख्या रांगा ॥ वर्णितां गोड वाटतें किती तरि सांगा ॥ शहरांत सुखी अवघे क्वचितची भीक मागा ॥ तेही गेले कोठें धर्मास करिनारे जागा ॥ शिद्याचा ज्यान बत्तीस फ्रेंचना लुंगा ॥ गाईकवाड सरदार येती प्रसंगा ॥ धावती रणांगणीं मानकऱ्यांच्या चुंगा ॥ सिरकेल कोणता काळ कोरण्यास भुंगा ॥ सहजांत जिरविती सर्व तयाचा मुंगा[1] ॥ गोखले बापू तलवार बाहादर लढाईंत जाई ॥ शत्रूची फौज जरजर करितसे लवलाही ॥ ब्राम्हणी राज्य जोरदार घोड्या० ॥ २ ॥ साक्षांत विष्णु अवतार पेशवे कूळ ॥ संपूर्ण महिचे भूपे[2] कांपती धाक दरारा प्रबळ ॥ सगोपंत[3] देवराव[4] विठ्ठल[5] नानां[6] काळ ॥ शहाण्यांत साडेतीन शहाणें बुद्धिचे सबळ ॥ सेवेंत सर्वदां श्रीमंताच्या जवळ ॥ होळकर भोसले शिंदे मानकरी सकळ ॥ तलवार बहादर करीत शत्रूची राळ[7] ॥ स्वारीच्या भोंवतीं पटवर्धन मंडळ ॥ युद्धांत रणांगणीं जसा आगीचा लोळ ॥ बहुनामी पल्लेदार तोफांचा कल्लोळ ॥ जेर्जाल जंबुरे बाण करी वळवळ ॥ सरदार सभोंवतीं दाट पसरती तळ ॥ घोरपडे रास्ते सरदार पुरंधरे स्वार पानशे[9] पाहीं ॥ फडणीस नानाची जरब भूमंडळीं राही ॥ ब्राम्हणी राज्य० ॥३॥ पर्वतावरती पर्वतीस्थान वरती चौघडा ॥ पाहेऱ्या तळापर्यंत

१ चावटपणा. २ राजे. ३ सखाराम बापू. ४ देवराव हे भोंसल्याचे दिवाण होते. ५ विठल सुंदर हे संगमनेरचे राहणारे असून निजामचे दिवाण होते. ६ नानाफडनवीस. ७ धुळधाण. ८ बंदुकीची एक जात आहे. ९ पानसे हे तोफखान्यावर मुख्य होते.

जावें धडधडा ॥ अनुष्ठान पंचपक्वान्न पडेना खाडा ॥ पुजारी पुजीती उमामहेश्वर जोडा ॥ पीतवर्ण सोन्याच्या मुर्ति नव्हे या बाडा[1] ॥ पाहाऱ्यास शिपाई उभे पेटवूनि तोडा[2] ॥ रमणाही[3] ब्राम्हणासाठीं बांधिला केवढा ॥ श्रावणमासीं खर्च तो कोटयावधीं तोडा[4] ॥ पुढें तळें त्यामध्यें लहान बेटाचा तुकडा ॥ गणपती त्यांत पलिकडेस आंबीलें[5] ओढा ॥ ग्रामांत तुळशीबागेंत बेतही जाडा ॥ बुधवार पेठ बेलबाग नजीकची वाडा ॥ जागोजाग मौज अनिवार नसे अंतपार वर्णूं तरी काई ॥ कविराव म्हणे धन्यधन्य पेशवाई ॥ ब्राम्हणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते० ॥ ४ ॥

---

### पोंवाडा.

( पंढरपूर क्षेत्र वर्णन. रामजोशीकृत )

क्ष्मातळीं इजसमान नाहीं उमामहेश्वरपुरी । पुरी पडेना काशी मग इतरा दासी हिच्या असी पंढरी ॥ ध्रु० ॥ पांडुरंग जगदंतरंग जो माजि रंगला धणी । पार्श्व रमा रखुमाई पृष्ठीं ती राही जशी सुखाची खाणी । शेष शयनपट्ट वेष निकट व्यंकटेश गणपति गुणी । उभा दक्षिण द्वारीं अति भारी विठ्ठल विभुचे गुणगण गणी । बाळकृष्ण गोपाळ रांगतो व्याळ मुकुटमणि फणी । अहा तशिच ती भामा[7] अतिवामा विभुच्या ना-

---

१ गप्पा. २ बंदुक भरून हातीं तोडा पेटवून कडेकोट पाहरा असे. ३ पर्वतीवरून पाहिलें तर रमण्याची हल्लीं कोणती स्थीति झाली आहे ती दिसते. ४ थैल्या हजार हजार रुपयांच्या. ५ पर्वती जवळचा देखावा मनास विलक्षण आनंद देणारा आहे हें सर्वांस विदीत आहेच. ६ पृथ्वींत. ७ सत्यभामा.

यिकांत हिरकणी। दार धरूनि सहदार उभा मैदा१लिंग अंगणी। रंगशिळेवरि गाती किति नाचति गरुडस्तंभा कवटाळुनि ॥ सभामंडपीं उभारुनि भुज उभा मरुत्सुतऋणी। अहा गरुडपाराची किति शोभा त्याची वर्णावी तरि कुणी। ॥ चाल ॥ हा मंडप नोहे विमान वर दाटला। भू वैकुंठीचा गगनानें चाटिला। ज्यामध्यें सदोदित भगवज्जन दाटला। कामादिक जळचर जमाव-चट फाटला। क्षण यांत शिरतां वाटे भव आटला। मग सहजचि उतरुनि पांडुरंग भेटला। बऱ्या दिसति ओव१ऱ्या ऋषीच्या दऱ्या दुबाजूवरी। सदा घोष नामाचा गुणधामाचा गुण घेति कितिक अंतरी। क्षमातळीं० ॥ १ ॥

महाद्वार तुम्हि पहा तरिच जन्म हा सफळ मानवी। वरी चौघडा वाजे अतिसाजे काहि२लें मढविली नवी। बळी तसा पदतळीं घातला मुळीं हरिस लोभवी। नको कथा वाम्याची त्या नाम्याची यापरि विश्व शोभवी। पुढें समाधिंत दडे पदांबुजीं पडे न चोखा भवी। असो महार जातीचा यातिच्या हरिच्या भागवतोत्तम कवी। रुका वेंचितां दुकान जवळिच बुका माळ लाघवी। देति माळिणी माळी चित्तीं सुक्या न रिझ आघवी। अशा दुरस्ता विशाळ माडच्या तशांत यदुकुळ रवी। उभा नदीच्या कांठीं जन येती भेटी वकिलसा पालवी। ॥ चाल ॥ जे महार्णवाची जगदद्भुत कामिनी। ती भीमरथी यास्थळीं दक्षिणगामिनी। श्रीशंकरजीची शिरोवंद्य स्वामिनी।

---

१ देवुळवाडयांतील मठया. २ कढई.

पृथ्वीच्या जणों मध्य देशिं हामिनी । जइं कार्तिकमासीं शुक्लपक्षि यामिनी । पुलिनांत पताका जैशा सौदामिनी[1] । आनंद सावतामाळी कबीर मोमिणी । लोहदंड त्या क्षेत्र पंढरी पुंडरीक चौधरी । हा मुख्य येथिंचा राणा जाणा ज्यास्तव ठ्या ... भुनि विठेवरी । क्षमातळीं० ॥ २ ॥ ध्रु० ॥

शिळामूर्ति रघुकुळाधीश पद्मनळा जवळ ती सती । उभी अहल्याबाई कां घाई जाणों पुनरपि रज याचिती । पुढें दक्षिणेकडे प्रदक्षण घडे क्षेत्र सव्यती । दिव्य चमकती फरशी सज्जनचरणरजें उजळिती । लोट घेति किति पोट खरडिती ओंठ भजनिं हलविती । गळां तुळशीच्या माळा सवें पाळा गोपाळाचा किती नाचती , नवे भागवत थवे प्रदक्षिण सवें कितिक धांवती । पंगू लागति रांगूं किति सांगूं अंधळे भुजाभुज कवटाळिती[2] । रथा निरखिती कथा करिति कुणि पथांत मठतरि किती । सव्य रोकडा घेती मग पुढती उद्धव चिद्धन आलिंगिती । ॥ चाल ॥ पुढें घाट नदीचा भीमरथी वाहती । किति तीर्थवंदनें करिती किति नाहती । किति पुंडरिकाचा समारंभ पाहती । किति साधु पदांबुजिं निजमस्तक वाहती । किति शांत दांत वेदांत पढुनि राहती । किति तापस ऋतु संताप समुळ साहती । मग मुक्ति तयाला गळां पडुनि पाहती । संत कथूं किति महंत नगरी अनंत सुखदा खरी । काय कथेचा धारा तो सारा श्रीमंताच्या मंदिरीं । क्षमातळीं इज समान० ॥ ३ ॥

---

१ विजा. २ आंधळ्याच्या माळा सर्वांनीं पाहिल्याच आहेत.

यिकांत हिरकणी । दार धरूनि सहदार उभा मैदा२ लिंग अंगणी । रंगशिळेवरि गाती किति नाचति गरुडस्तंभा कवटाळुनि ॥ सभामंडपीं उभारुनि भुज उभा मरुत्सुतऋणी । अहा गरुडपाराची किति शोभा त्याची वर्णावी तरि कुणी । ॥ चाल ॥ हा मंडप नोहे विमान वर दाटला । भू वैकुंठीचा गगनानें चाटिला । ज्यामध्यें सदोदित भगवज्जन दाटला । कामादिक जळचर जमाव-चट फाटला । क्षण यांत शिरतां वाटे भव आटला । मग सहजचि उतरुनि पांडुरंग भेटला । बऱ्या दिसति ओवऱ्या[1] ऋषींच्या दऱ्या दुबाजूवरी । सदा घोष नामाचा गुणधामाचा गुण घेति कितिक अंतरी । क्षमातळीं० ॥ १ ॥

महाद्वार तुम्हि पहा तरिच जन्म हा सफळ मानवी । वरी चौघडा वाजे अतिसाजे काहिलें मढविली नवी । बळी तसा पदतळीं घातला मुळीं हरिस लोभवी । नको कथा वाम्याची त्या नाम्याची यापरि विश्व शोभवी । पुढें समाधित दडे पदांबुजीं पडे न चोखा भवीं । असो महार जातीचा यातिच्या हरिच्या भागवतोत्तम कवी । रुका वेंचितां दुकान जवळिच बुका माळ लाघवी । देति माळिणी माळी चित्तीं सुक्या न रिझ आघवी । अशा दुरस्ता विशाळ माडऱ्या तशांत यदुकुळ रवी । उभा नदीच्या कांठीं जन येती भेटी वकिलसा पालवी । ॥ चाल ॥ जे महार्णवाची जगदद्भुत कामिनी । ती भीमरथी यास्थळीं दक्षिणगामिनी । श्रीशंकरजीची शिरोवंद्य स्वामिनी ।

---

१ देवुळवाड्यांतील मठ्या. २ कढई.

पृथ्वीच्या जणों मध्य देशि हामिनी । जइं कार्तिकमासीं शुक्लपक्षि यामिनी । पुलिनांत पताका जैशा सौदामिनी[1] । आनंद सावतामाळी कबीर मोमिणी । लोहदंड त्या क्षेत्र पंढरी पुंडरीक चौधरी । हा मुख्य येथिंचा राणा जाणा ज्यास्तव उभा [illegible]ानि विठेवरी । क्षमातळीं० ॥ २ ॥ ध्रृ० ॥

शिळामूर्ति रघुकुल[illegible]धी [illegible]दतळा जवळ ती सती । उभी अहल्याबाई कारि[illegible] [illegible]णो पुनरपि रज याचिती । पुढें दक्षिणेकडे प्रदक्षण [illegible] [illegible] सव्यती । दिव्य चमकती फरशी सज्जनचरणरजें उजळिती । लोट घेति किति पोट खरडिती ओंठ भजनिं हलविती । गळां तुळशीच्या माळा सवें पाळा गोपाळाचा किती नाचती । नवे भागवत थवे प्रदक्षिण सवें कितिक धांवती । पंगू लागति रांगू किति सांगू अंधळे भुजाभुज कवटाळिती[2] । रथा निरखिती कथा करिति कुणि पथांत मठतरि किती । सव्य रोकडा घेती मग पुढती उद्धव चिद्धन आलिंगिती ।॥ चाल ॥ पुढें घाट नदीचा भीमरथी वाहती । किति तीर्थवंदनें करिती किति नाहती । किति पुंडरिकाचा समारंभ पाहती । किति साधु पदांबुजिं निजमस्तक वाहती । किति शांत दांत वेदांत पढुनि राहती । किति तापस ऋतु संताप समुळ साहती । मग मुक्ति तयाला गळां पडुनि पाहती । संत कथूं किति महंत नगरी अनंत सुखदा खरी । काय कथेचा धारा तो सारा श्रीमंताच्या मंदिरी । क्षमातळीं इज समान० ॥ ३ ॥

---

१ विजा. २ आंधळ्याच्या माळा सर्वांनीं पाहिल्याच आहेत.

घरोघरीं रस परोपरीं किति बरोबरीचे गडी। साधु साधिती विद्या किति अध्यापक किति शिष्यांच्या सांगडी। दाट साधुचा हाट फुटेना वाट वांटता गडी। ताल सुराची करिती किति भरती विठ्ठल देति बुक्याची पुडी। फळांत अथवा जळांत तुळशी दळांत वशता खडी। अशी माउली कैची भक्ताशीं वैची ताजिम देते खडी। तुक्या[1] वाणगट तक्या मारि परि मुक्यापरी दे दडी। मिराबाइचा प्याला नाम्याला प्याला प्याला त्याची कढी[2]। भाव निरखितो रावसुरांचा हाव घालितो उडी। पुढें ठेवा कणवाळूचा कणवाळू विठ्ठल म्हणतो साकरखडी। चाल। हा भक्तांसाठीं अवतरला या कलीं ती वैकुंठीची पेठ वोस हाकिली। ही अपरा द्वारावती उभी ठाकली। मंडळी व्रजांतिल कोठें नच फांकली। वसुदेव देवकी नंदादिक झांकली। आहेस कोणत्या रूपें कोण आकळी। पंढरी सुखाच्या नरदेहें वांकली। मला वाटतें बलानुज द्विजकुलाधीश हा हरी। येति राउळीं अवघे ते बडवे यांचें गोप गोपिका घरीं। क्षमातळीं इजसमान० ॥ ४ ॥

संत खेळती वसंत ऋतूंत भगवंत घेतसे हवा। शेज करिती कुसुमांची[3] तळिमाचा वरता चंदनी मंडप नवा। वृष्टि सुखाला सृष्टि देखती दृष्टि भरुनि जेधवा। तदा आषाढी यात्रा जनमात्रा सुख तें पार नसे उत्सवा। तटा धरुनि घनघटा उदकमय पटा पसरिती शिवा। पुंडरिकावर नावा वर्णावा महिमा मति तरि किति मा-

---

१ तुकाराम वाणी होता. २ नामदेवाची कढी देव प्याले असें आहे. ३ फुलांची.

नवा। तशी पुढति कुणि दिशीं कार्तिकी निशी मग जन बोलवा। फार वदावे काई ही बाई वैकुंठीचा मालवी दिवा। नदी खडक त्यामधीं करितसे गदीश मुरली रवा। वेणुनाद तो समजा मनिं उमजा गोष्पद विष्णुपदाला स्तवा। चाल। किति नारदमुनिला कवटाळिति वाहुनी। गोपाळपुरी मग दधिकाला लाहुनि। किति हर्षति पद्मालय तीर्थी नाहुनी। तो व्यासाश्रम दर्शनानंद त्याहुनि। किति संध्यावळिमध्यें तप करिति राहुनि। अशि किति तीर्थें कथूं तुम्हा शपथ वाहुनी। पृथ्वींत पंढरी एकचि घ्या पाहुनि। पाय धरिल कविराय दुजा अशि काय लावणी करी। माय कुणाची व्याली? या गगनाखालीं कविता सोलापुरी। क्षमातळीं० ॥ ५ ॥

---

## पोंवाडा.

( व्यंकटगिरि वर्णन रामजोशीकृत. )

शेषाचल कृत निवास हा नत भवास गोष्पद करी। संकट व्यंकटरमणावरी। तीन गांव हा पर्वत उंच लांब तीस योजनें। त्यावरि नांदावें भगवज्जनें। शारदीय नवरात्र रथोत्सव नानाविध अर्चनें। लोभती विविध जनांचीं मनें। श्रीनिवासपदभजक तयाला वासवपदही उणें। पहाहो भक्तिरसाच्या गुणें। हत्तीराम बैरागी याचें तप वर्णावें कुणें। पहा तो भक्तिरसाच्या गुणें। चाल। हा व्यंकटपति त्या गिरिवरि अति शोभला। या पदपंकजीं अनंतजन लाभला। श्रीरामानुज हा दैवबळें लाधला। याहुनि जागृत दुसरें दैवत नाहीं

पृथ्वीवरी । ऐक हा निजजन दुरिता हरी । शेषाचल-कृत ॥ धृ० ॥ १ ॥

श्रीमत्कृत पुण्याभिषेक तो निर्मल जल संगती । जवादी मृगमद केशर किती । गिरिवरि हरिकृत मज्जन सुगंध योजनमित धांवती । खरा हा त्रिभुवन लक्ष्मीपती । चिंच तिखट नैवेद्य तेलकट परि सुर झड घालिती । सुधेचे रस यापुढें लाजती । तीर्थ श्रीपदरेणु मनोहर तिलक जयाची रती । नित्य ते नर सुकृती लाभती । चाल । लखलखाट मंडप सुवर्ण दीपावळी । कर्पूर उजळतो असा न जगती तळीं । तो ध्वजारोहणानंदन कनकाचळीं । पुष्करणीचें स्नान करुनियां सेव्य मंडपोदरीं । पहावा फिरोनि अद्भुत गिरी । शेषाचल कृत० ॥ २ ॥

तेज पहा हो दुरुनि हिमालय दुर्गम देशांतुनी । येतसे अनंत जन धांउनी । सुभक्त वत्सल देउळगांवीं राजाच्या राहुनी । घेतसे पुजा बहुत मानुनी । कांहीं कानको करावयाला कानागिला घेउनी । पावती देतो प्रभु लेहुनी । पृथ्वीपातिचा वल्लभ ऐसा पुत्र देतसे गुणी । इथें हा नवसाला पाउनी । चाल । या अनंत शयनीं भक्ति धरिली जन जसा । हा सुफळ मनोरथ त्यास पावतो तसा । भक्तासि उद्धरी हा नर याचा ठसा । भुक्तिमुक्ति सुख शक्ति संपदा याच्या पायीं खरी । धरुनये कविरायाला दुरी । शेषाचल कृतनिवास० ॥ ३ ॥

## पोंवाडा.

( तुळजापूर वर्णन रामजोशीकृत )

भूतळांत जशि या स्थळांत यमुनाचळांत ही नग-वाळा। अशि भुवनत्रयिं कोणती दुजी वेल्हाळा ॥ ध्रु० ॥ मन सुमन करूनि विष वमन गणुनि रतिरमण शिवाची राणी। ही भजतां देते नित्य सुखाची खाणी। हिचे चरण धरूनि दृढस्मरण तया भवतरण अशी शर्वाणी। पावते जना दीनास पहा निर्वाणीं ॥ अति दुष्ट रोग परि पुष्ट रोग करि कुष्ट वयस्ची न हाणी। हा महिमा कविजन ऐकतील वाखाणी ॥ किति दुळे कितिक आंधळे कितीजन खुळे पायना पाणी। चालवी तया ही रोग्याची शीराणी ॥ कांचना जपुनि किंचना म्हणति वंचना करावी ज्याणीं। ही त्याला वंचिती मायमुलुखची शहाणी ॥ क्षण वदो मदोद्धत सदोषही शुचि उदो उदो ही वाणी। तनु विक्षत करि कल्लोळ तीर्थिचें पाणी ॥ चाल ॥ जान्हवी गायमुख धारा, पडे अखंड। मातला दैत्यगण सारा, करि दुखंड। पाववी वंश विस्तारा, शिरि शिखंड। निज भक्तजनाची दारा, करि मुखंड। अर्चना जिच्या उपचारा, कधिं न खंड। चाल ॥ किति भुतें सरळबाहुतें फिरविती सुतेज कुंकुम भाळा। कवड्याचे साज खेळती पोत झळ्ळाळा ॥ १ ॥ भूतळांत जसि० ॥ ध्रु० ॥

अति लगट तयाला प्रगट तशी मग सगट जनाला तारी। ही विश्वकुटुंबिनि माय भक्तिची प्यारी ॥ इथें बसून जनांवर रुसून पाहते कसुन सधन लाचारी।

दुबळ्याची भाकर म्हणे मला ही न्याहारी ॥ नित्य उठु-
नि छळिति परि तुटुनि पडेना कुठुनि पुरविते ज्वारी ।
हा महिमा न कळे पार हिचा संसारीं ॥ बेजरब जवळ
काय अरब? तथापि हि जरब जगामधिं भारी । छपन्न
देशिचे लोक लोळती द्वारीं ॥ ही चुका अगर चिचुका
सोडिना चुकाविल्या बन जारी । वाटेंतुनि यात्रा आण-
विते माघारी ॥ ही तुका करित कौतुका नये समतुका
हिच्या सुरनारी । येतिल हो कैशा पहा कालच्या पोरी
॥ चाल ॥ मिरविती छबीना नंदी, कधिं तुरंग । धांवती
पुढें जन बंदी, बहु सुरंग ॥ कधिं मतंगजी आनंदी, हा-
तिं फिरंग । कधिं पंकज गरुडस्कंधीं, वहन रंग ॥ कधिं
हंस मयूर छंदी, धरि कुरंग ॥ चाल ॥ ही सदा सकळ
संपदासहित श्रीपदास ही जपमाळा । भक्तांचि माय क-
नवाळू दिसे चिल्लाळा ॥ भूतळांत जशिया० ॥ २ ॥ धृ० ॥

कुचतटा कसुनि शुचिपटा घाटशिल घटाव करीते
माता । भक्तांची वाट पाहते येतां जातां ॥ कुणि कसा
असो जव पिसा विमानीं बसा म्हणति सुर आतां ।
या पाप नाशि तीर्थांत जाउनी नाहातां ॥ कुणि जपा
न धरु कुणि तपा न करु परि उपाय षण्मुख ताता ।
या मुधोबासि वंदिता मुक्तिये हातां ॥ ही धरा हि कागद
करा दौत सागरास लेखक धाता । परि विष्णुतीर्थिचा
महिमा न पुरे गातां ॥ ही माय वदोंतरि काय सुराचा
राय तयावर सत्ता । स्नानार्थ धाडिलें अमृतकुंड भूप्रां-
तां ॥ भुयिष्ट सुकृत करि पुष्ट असो हे अष्ट तीर्थ रसव-
त्ता । नाशिते स्पर्शमात्रेंचि भवाधःपाता ॥ चाल ॥ घ्या

मनिं हे दक्षिणकाशी, खरिकरून । दर्शनांत पातक नाशी, करिं धरून । सांडावी अमरीदासी, हिजवरून । राहतात सुर हिजपाशीं, पद चुरून । कितिएक तपांच्या रांशी, मन भरून । चाल ॥ ही वया नवल काय दया करिल जलदया हरिल भवजाळा ॥ या कृपानदीचा नकळे पार खल्लाळा ॥ भूतळांत जशि० ॥ ३ ॥ ध्रु० ॥

ही अवा हिचा नित्यनवा साज किति हवा कविनें बोलावी । कोणत्या नराची दौलत हिशि तोलावी ॥ कधिं निजून उठते कधिं सजून बसते परि अजून तेज मोलावी । अशि कोण देवता स्थानाहुन डोलावी ॥ नवरात्र करुनि दक्पात्र रसाची मात्र ग्रंथि खोलावी । मग मुक्ति तयाला गळां पडुनि बोलावी । रणशौड भारतिसी होड सारिपट झोड नित्य होवावी । ती भक्तवत्सला जाय भक्त बोलावी ॥ ही अशी तरी हिचि खुषी अभक्त हि ऋषी त्यास टोलावी । सप्रेम दीनदासार्थ नेत्र ओलावी ॥ ही खरीच तुळजापुरी अती सुंदरी विश्व गोलावी । मग युक्त हिचे बाळा हि माय सोलावी ॥ चाल ॥ ही मनिं हो चिन्मयबाला, जरि शिरल । काय जुरत यमाच्या बाला, पुढें सरल । निज गुण जो गाइल त्याला, अनुसरल । तुळजेचें यशोमृत प्याला, नर तरल । दैन्य विपत्ति पापाला, स्थळ नुरल । चाल ॥ कविराय म्हणुन हिचे पाय धरुनि गुण गाय छंद सुरताल । या कृपानदीचा नकळे दुर्लभ खळ घोटिताति चिल्लाळा ॥ भूतळांत जशिया० ॥ ध्रु० ॥ ४ ॥

## पोंवाडा.

( बेलबागेचें वर्णन मनोहरकृत. )

सिंहासनावर उभी राहिली चतुर्भुज नारायण मूर्ती ॥ वामांगीं लक्षुमी उभयतां दृष्टि समोर गरुडावर्ती ॥ दोहिं मूर्तिचें ध्यान दर्शनिं जन्मार्जित पापें हरती ॥ निष्कामत्वें चरण सेवितां अभ्यंतर हेतु पुरती ॥ ईशानेशीं गौरीशंकर अग्नयेस मंगळमुर्ति ॥ रवी आंबेची रिकामि जागा राहिली षेदिवर्ती ॥ कथा कीर्तनें पुराण श्रवणें होतसे नित्य वेदांत ॥ नानानें बेलबाग बांधुनी स्थापिले लक्षुमिकांत ॥ शहर पुण्यामध्यें भरबुधवारांत पाहिलें स्थान एकांत ॥ नानानें बे० ॥ १ ॥ वामभुजेमध्यें शंख सुदर्शन गदा दक्षिण पद्मकमळ ॥ मस्तकीं चकचकाट किरिटी कपाळीं केशर कस्तुरी टीळा ॥ आंगावरची उटी केशरी दोन्ही मूर्तिची शुभ्रशीळा ॥ तऱ्हेतऱ्हेचीं फुलें गुंफुनी गळा तुळशी हारकाळा ॥ प्रतिवारांचा प्रतिरंगाचा करती पोशाग घननिळा ॥ कानामध्यें कर्ण भुषणें कंठीं रत्नांकित माळा ॥ नाभिकमळचें पदक चमकतें जैसें रवि रश्मी कांत ॥ ना० बे० ॥ २ ॥ कज्जल नयनीं रजनीं वदनीं कपाळीं कुंकुम लाल चिरी ॥ भ्रुकुटी मध्यें कस्तुरी चंद्रमा भांग चर्चिला शेंदुरीं ॥ नथ, काप, बुगड्या, भोकरबाळ्या, मुदराखडी, वोर कुयरी ॥ शिस फूल गोंडे, नाग आवळा केतक केवडा चंद्रकोरी ॥ सूत्र मंगळी मणी चंद्र हा लप्फा तन्मणी पोत सरी ॥ वाकी, वेळा, गोठ पाटल्या, छंद, बंगले तोडेकरी ॥ साखळ्या

तोडर्या, जोडवीं, विखल्या, लक्ष्मी देवीच्या चरणांत ॥ नाना० बे० ॥ ३ ॥ घंटानादें भ्रमराकारें कर्पूर धूप दीप सुवासी ॥ पंचामृताचीं पात्रें भरुनियां ताटें नैव्यद्य शडरशी ॥ चंदन श्रीफळ तांबूल गजरे आत्तर पाणी स्वादासी ॥ प्रदक्षिणा दक्षिणा नमुनीं पुष्पांजळीला फुलें तुळशी ॥ कुंचे, चामर व्यंजनें, दर्पण, नंदादीप सुखशय्येशी ॥ वर्षांमध्यें तिथी पर्वणी कीर्तन, जागरण, एकादशी ॥ लक्ष्मीकांता निद्राकरावी स्रखशयनावर निवांत ॥ नानानें बेल० ॥ ४ ॥ कार्तीकमाशीं प्रतिवार्षीकीं प्रतिदिवसाचा परिपाठ ॥ पाटांगणामध्यें चवकटी भौंते दीप लखलखाट ॥ छत्रें कोंदणीं सभामंडपावर कंदील समायादाट ॥ इकडे गाणें घडचाळ वाद्यें तिकडे नंदी आड रहाट ॥ बंदोबस्त कडीकोट हिकडे ॥ तिकडे चौकी द्वारांत ॥ नानानें बे० ॥ ५ ना थोडी ना आफाट जागा टामटुमेची हवाशीर ॥ वकुळी आंबे अशोक उंबर इमारती शेजार ॥ कौलारांच्या छप्रीमध्यें लांडोरी आणि मयूर ॥ पूर्वद्वाराकडे रस्त्यांत दुथडी बहवाजार ॥ प्रदक्षिणेच्या वाटें भौंवती द्राक्षी मंडमाचे बहार ॥ नारळी आंवळी फुलझाडे तुळशी बेल तरुवर ॥ अशा प्रकारची मानस मूर्ति मनोहर कल्पी हृदयांत ॥ नानानें बेलबाग बांधुन स्थापियला लक्ष्मी कांत ॥ ६ ॥

---

## पोंवाडा.

( तुळशीबागेचें वर्णन मनोहरकृत. )

भवसागर हाची व्यर्थ कां उगा तूं लुब्धलाशी ॥ पुत्र मित्र भृत्य दारा प्रपंची पाडिती पाशीं ॥ धीवर तो

## पोंवाडा.

( बेलबागेचें वर्णन मनोहरकृत. )

सिंहासनावर उभी राहिली चतुर्भुज नारायण मूर्ती ॥ वामांगीं लक्षुमी उभयतां दृष्टि समोर गरुडावर्ती ॥ दोहिं मूर्तिचें ध्यान दर्शनिं जन्मार्जित पापें हरती ॥ निष्कामत्वें चरण सेवितां अभ्यंतर हेतु पुरती ॥ ईशानेशीं गौरीशंकर अग्नयेस मंगळमुर्ति ॥ रवी आंबेची रिकामि जागा राहिली षेदिवर्ती ॥ कथा कीर्तनें पुराण श्रवणें होतसे नित्य वेदांत ॥ नानानें बेलबाग बांधुनी स्थापिले लक्षुमिकांत ॥ शहर पुण्यामध्यें भरबुधवारांत पाहिलें स्थान एकांत ॥ नानानें बे० ॥ १ ॥ वामभुजेमध्यें शंख सुदर्शन गदा दक्षिण पद्मकमळ ॥ मस्तकीं चकचकाट किरिटी कपाळीं केशर कस्तुरी टीळा ॥ आंगावरची उटी केशरी दोन्ही मूर्तिची शुभ्रशीळा ॥ तऱ्हेतऱ्हेचीं फुलें गुंफुनी गळा तुळशी हारकाळा ॥ प्रतिवारांचा प्रतिरंगाचा करती पोशाग घननिळा ॥ कानामध्यें कर्ण भुषणें कंठीं रत्नांकित माळा ॥ नाभिकमळचें पदक चमकतें जैसें रवि रश्मी कांत ॥ ना० बे० ॥ २ ॥ कज्जल नयनीं रजनीं वदनीं कपाळीं कुंकुम लाल चिरी ॥ भ्रुकुटी मध्यें कस्तुरी चंद्रमा भांग चर्चिला शेंदुरीं ॥ नथ, काप, बुगड्या, भोकरबाळ्या, मुदराखडी, वोर कुयरी ॥ शिस फूल गोंडे, नाग आवळा केतक केवडा चंद्रकोरी ॥ सूत्र मंगळी मणी चंद्र हा लप्फा तन्मणी पोत सरी ॥ वाकी, वेळा, गोठ पाटल्या, छंद, बंगले तोडेकरी ॥ साखळ्या

तोडर्या, जोडवीं, विखल्या, लक्षुमी देवीच्या चरणांत ॥ नाना० बे० ॥ ३ ॥ घंटानादें भ्रमराकारें कर्पूर धूप दीप सुवासी ॥ पंचामृताचीं पात्रें भरुनियां ताटें नैव्यद्य शडरशी ॥ चंदन श्रीफळ तांबूल गजरे आत्तर पाणी स्वादासी ॥ प्रदक्षिणा दक्षिणा नमुनीं पुष्पांजळीला फुलें तुळशी ॥ कुंचे, चामर व्यंजनें, दर्पण, नंदादीप सुखशय्येशी ॥ वर्षांमध्यें तिथी पर्वणी कीर्तन, जागरण, एकादशी ॥ लक्ष्मीकांता निद्राकरावी सुखशयनावर निवांत ॥ नानानें बेल० ॥ ४ ॥ कार्तीकमाशीं प्रतिवार्षीकीं प्रतिदिवसाचा परिपाठ ॥ पाटांगणामध्यें चवकटी भौंते दीप लखलखाट ॥ छत्रें कोंदणीं सभामंडपावर कंदील समायादाट ॥ इकडे गाणें घडचाळ वाद्यें तिकडे नंदी आड रहाट ॥ बंदोबस्त कडीकोट हिकडे ॥ तिकडे चौकी द्वारांत ॥ नानानें बे० ॥ ५ ना थोडी ना आफाट जागा टामटुमेची हवाशीर ॥ बकुळी आंबे अशोक उंबर इमारतीं शेजार ॥ कौलारांच्या छप्रींमध्यें लांडोरी आणि मयूर ॥ पूर्वद्वाराकडे रस्त्यांत हुथडी बहर्वाजार ॥ प्रदक्षिणेच्या वाटें भौंवती द्राक्षी मंडमाचे बहार ॥ नारळी आंवळी फुलझाडे तुळशी बेल तरुवर ॥ अशा प्रकारची मानस मूर्ति मनोहर कल्पी हृदयांत ॥ नानानें बेलबाग बांधुन स्थापियला लक्षुमी कांत ॥ ६ ॥

---

## पोंवाडा.

( तुळशीबागेचें वर्णन मनोहरकृत. )

भवसागर हाची व्यर्थ कां उगा तूं लुब्धलाशी ॥ पुत्र मित्र भृत्य दारा प्रपंचीं पाडिती पाशीं ॥ धीवर तो

आमिष देउन ओढितो जळीं मत्स्यासी ॥ तैसाची तुज-ला मोहो गुंतवी माया जाळाशी ॥ दुःसार सोडी संसा-रा षडरिपुस करीं देहीं दंडन ॥ तूं तुळशीबागेंमध्यें भ-जरे हृदयीं दशरथ नंदन ॥ १ ॥ पृथ्वीवर्त्या देशोदेशीं जागा आहेत हवाशीर ॥ असा नक्षा तुळशीबागेचा नसे कोठें आकार ॥ बांधिला तो पुणें शहरीं आराम मध्यावर ॥ त्यांत उभा सिंहासनीं वधणार दशमुख-शीर ॥ लक्षुमण दक्षिण बाजूं वामांगींसीरंजन ॥ तूं तु० ॥ २ ॥ गौरवर्ण त्रिनी मूर्ति सुश्वेत शिलेवर ॥ बाण धनुष्य हातीं भाता ठेऊनी स्कंदावर ॥ कर जोडूनी पुढें उभा मारुती काळा थोर ॥ पूर्णब्रम्ह केवळ भासे आनंद स्थळावर ॥ पापाचें नाशन मूळ रामनाम त्याचें भजन ॥ तूं तु० ॥ ३ ॥ दक्षणेस शुक्र धुंडी मन मोहन मुर्लीधर ॥ रुक्मिणी विठ्ठल देवी नैऋतेस लंबोदर ॥ पश्चिमेस दै-वतें दुसरीं हरी शयन शेषावर ॥ नागरंभाचरणीं पांच काळीं वृंदा शिखरावर ॥ उत्तरेसी व्यंकटेश शिव चौ-घडा झांगड झंन्झंन् ॥ तूं तु० ॥ ४ ॥ रात्रीची शेज आर्ती पहांटेस काकड आर्ती ॥ जपुनी प्रातःस्मरणें नि-रजरास ज्यागृत करिती ॥ शुद्ध जल पूर्ण कलश घांट कंबू आडणीवर्ती ॥ पंचामृतरत्नानें घालून अभिषेकधारा धरती ॥ पुसुनी शुभ्र वस्त्रानें निर्मळ अदिती नदंन ॥ तूं तु० ॥ ५ ॥ उष्णीष कंचूकी शेला किरिटी जवाहीर ॥ चवकडा धोतर जोडा दुशाल पितांबर ॥ भाळीं गंध टिळा उटी केशरी आंगावर ॥ तुरे गजरे पुष्पें तुळशी माळा कंठीं मुक्ताहार ॥ धूप दीप परिमळ सुगंध मैला-

गिरी गाभा चंदन ॥ तूं तु० ॥ ६ ॥ वैदेहीस पातळ शा- ल्पोत जरी जरतार ॥ भरजरी पिवळी चोळीवर जा- ळी नक्शाकार ॥ हलकडचा चवकडी तुरा नथ ना- कीं सर्जेदार ॥ नवरत्नीं अळंकार झळकती चमकदार ॥ हळद कुंकुम क्षोद नयनीं कज्जली अंजन ॥ तूं तु० ॥ ७ ॥ कुडूं काप बाळ्या बुगडया शिरी बिंदी बि- जवरा ॥ वेणी नग केतक केवडा वर गुंफी शशि भा- स्वरा ॥ मणि मंगळ सूत्र पोत पेट्या मुक्ताहार हिरा ॥ बाकी दोरे तोडे गोठ पाटल्या बंगले गजरे करा ॥ गेंद जोडवीं वाजतीं पाइं नुपूर झणाण झंन् झंन् तूं तु० ॥ ८ ॥ भूमंडळ चतुष्कोण प्रशस्त सभोवर ॥ पटां- गण दगडी कामें नक्षिदार गच्चीवर ॥ टोलेजंग मंडप सभा कारंजी उडते धार ॥ टोलजंग पखवाज विणे जा- गोजागीं हरिगजर ॥ कोणी उपास कोणी योगी कोणी मौनी करिती लंघन ॥ तूं तु० ॥ ९ ॥ सप्ताहा भागवत वाचती पुराणीक ॥ पद क्रम जटा घन पारायण करी वैदिक ॥ सप्तशती व्यंकटेश स्तोत्र गीतागाठ पुस्तक ॥ तपस्वी स्वामी भजनीं लिंगार्चन कोटी नैष्ठिक ॥ शैव भस्म वैष्णव मुद्रा अंगारा भाळीं गोपीचंदन ॥ तूं तु० ॥ १० ॥ रामराज्य दरबारांत तप अनुष्ठान नित्य ॥ दांभिक साधू भोंदू नित्य नवें करती कृत्य ॥ स- माप्ति यांची विद्वान श्रुति स्मार्त वक्ते सत्य ॥ आचार्य ब्रंम्हा लादस्योपद्रष्टा गाणपत्या ॥ यज्ञपात्र इध्माबर्ही सदर्भांचें बांधी त्रिसंधन् ॥ तूं तु० ॥ ११ ॥ अभि-

नव कोणेवेळीं कोणी फकीर फुकरे येती ॥ जोगी जंगल जटाधारी वृक्षाशीं टांगुन घेती ॥ महंत मोठे नग्न सर्वांगीं राख लाविती ॥ गांजेकशीनेत्रधुंदी अफिमची घोटेपिती ॥ सदोदित अग्निपुढें भुमीसजळतें इंधन ॥ तूं तु० ॥ १२ ॥ तिथी पर्वणी एकादशी हजिमा बाजार कहर ॥ बाहुली मृत्तिकेची हत्ती घोडे नाना प्रकार ॥ दर्शनास अलिंमदुनिया कसबिणी बिसनीजार ॥ प्रतिष्ठित दिसती थोर नगनार्णी जोडे चोर ॥ सांपडती त्यासीं लत्ता प्रहर करी दोरी बंधन ॥ तूं तु० ॥ १३ ॥ सोदे भामटे लुच्चे सोरट उचले हेर हेरिती ॥ बायका पुरुष येती त्यांची नजर चुकाविती ॥ पागोटीं आंगरख्याचे पदर खिसे कापिती ॥ चोळ्या लुगडीं वस्ता चोरुन किती पळती कीती सांपडती ॥ धरून त्यांची कुंदी कूटकुटून करी कंदन ॥ तूं तु० ॥ १४ ॥ दोहीं द्वारीं हनुमंत तबकीरी मेवे दुकान ॥ आंत भिकार लंगडे पंगू तिरळे बहिरे कान हात झोळ्या पसरून भिक्षा मागती म्लानवदन ॥ विठोबाअंधळ्याला एकपैसा देईबादान ॥ टाळविणे ढोलकी अभंग ओव्या पदें गाणीं तंनतनन् ॥ तूं तु० ॥ १५ ॥ रामजन्मनवमीचा महोत्सव प्रति संवत्सर ॥ नवीं तोरणें गुढ्या उभ्या नगरीं दारोदार ॥ गलासें कंदील दीप लखलख जाळ्या भजन गजर ॥ मौजमेळा पहातां स्त्री पुरुषें बरोबर ॥ चित्रांचीं युद्धें जैशी करीरणांत रणिं रणकंदन ॥ तूं तु० ॥ १६ ॥ राममय चित्तधन झालें अयोध्या केवळपूर ॥ दिवसास दोन प्रहरीं करती राम अवतार ॥ घटपूर्ण नानावाद्यें

गीतमंडळ पाक्षिसूर ॥ फुलें वृष्टि गुलाल बुका सुंठवडे ओंवा सारवन ॥ प्रसाद घेऊन कालीं बाळमुर्तीच्चरणीं वंदू-न ॥ तूं तु० ॥ १७ ॥ त्रितिनारण शुद्ध चैत्र सोमवार मेषितरणी ॥ कर्क लग्न पुनर्वसु यांची ग्रह उच्चस्थानीं ॥ शुक्लयोगी रामजन्म कौसल्या हर्षी मनीं ॥ न्हाऊन पाळ-ण्यांत निजवून झोके देऊन गाती गाणीं ॥ बायका ओ-ट्या हळद कुंकाचें मांडिती मंडन ॥१८॥ दर्वाज्यांत येतां जातां पोरें माणसें एकच गर्दी ॥ एकाहून एकचढी बद-मस्ती पुरे दर्दी धक्क्या बुक्या लाता बसतां अंगांतून निचरे सर्दी ॥ कोणी पडतो कोणी रडतो कोण सांगतो त्यांची वर्दी ॥ तीन सांजा छबीन्या भोंवते तमासगीर ब्रिन्कर्ति वितंडन ॥ तूं तु० ॥ १९ ॥ द्विजराज्य हरुनि तांब्र माजला पृथ्वीवर्ती ॥ त्याजमुळें अबला प्रबळ मागें वैश्यापुढें गर्ती ॥ जाति धर्म सुराणीचीं ग्रामण्यें तट पड-ती ॥ त्याच्या सभा मंडपांत वादविवाद पंडित कर्ती ॥ स्वार्थपक्षीं अभिमानी कोणी स्थापि कोणी करी खंडन ॥ तूं तुळशीबागेमध्यें भजरे हृदयीं दशरथनंदन ॥

---

## पोवाडा.

( पर्वतीचें वर्णन मनोहरकृत. )

शिवे वदन तुझें पाहूं दे उभा राहूं दे मनीं येऊं दे कांहीं दया विरक्तांची ॥ पर्वतावरी देवी सर्व ती माय भक्तांची ॥ ध्रुपद ॥ वर्दामुर्ति सांवळी केश कुरवळी नय-न काजळी उभि चतुर्भुज परिवारी ॥ महिषासूर मर्दिनी कमळवदनी आंबा शेजारी ॥ आलयें पांचि समुदाय

मध्यें शिवालयश्वेत शिलामध भोंवतीं दैवतें सारीं ॥ हर भूतात्मासविता धुंडी गिरी सुता वायवे वरी ॥ चाल ॥ हरशक्ति उभयतांमध्यें गणपती ॥ जयविजयी हरिपदिं दोघे द्वारपती ॥ कटाव ॥ पाणि सोनेरी कळस झळकदार काळानंदी पुढें लहान शिव हौद पाण्याचा भर कारंजी सभोंवताला अष्टवसुच्या चिरेबंदिचा जिने गच्चिचा कोट वाटोळा छतें कोंदणीं दिवानखाने बंगले बैठका आजुबाजुचे लहान मोठे बागबगीचे शीतळ छाया झाड झाडोरे निवात मंदिर सारसबागीं गणपति दर्शनिं मार्ग चालले पूल पाषाणी बांधचिऱ्याच्या नावा चालपुरी झरझरा ॥ चाल ॥ शहाण्णव पायऱ्यांची दाट चिऱ्यांची कोठी मागें मोरावर्ती मुर्ति षडाननाची ॥ यमादिशीं देवालयीं काळी शिळा कृष्णाची ॥ चाल ॥ मुख्य सोन्याच्या मूर्तिपासून अमरांच्या पुज्या कर्त्ती ॥ ज्या देवतेस जे अति प्रियकर तेच तिशि अर्पिती ॥ किरीट उष्णीव कंचूक शेले पितांबर शाला पांघरती ॥ कंठी तोडे कडीं अंगठ्या कानामध्यें चवकडे हलती ॥ मंगळ द्रव्यें वस्त्रें अलंकार ते शक्तिशीं अर्पिती ॥ बिल्वदळें कोंवळ्या तुळशी फुलें धूप कर्पूरज्योती ॥ भाज्या कोशींब्री पक्वान्नांचीं रजताचीं ताटें भरतीं ॥ श्रीफळ तांबूल विलासि उपचार मोरकुंचेच वर्ती ॥ कर जोडून प्रदक्षिणा करून हृदयीं ध्यान अणून मुखीं मनु म्हणून वाहि पुष्पांजळी प्राजक्ताची ॥ पर्वतावर्ती० ॥ शिवेवदन ॥ १ ॥ चाल ॥ पात्रि सुपारी कात लवंगा चुना वेलची पानें विड्यांचीं पक्कि कळीचीं नऊ पानांचे दोन दोन तांबूल तऱ्हेतऱ्हेचे

गजरे ताजे हार गुलाबी कंठी ताजे बत्तीस लढीचा तु-
रा विराजे चंदानिं अत्तर हल्लावर्ती॥गुलाब पाणी अंगिं
सेविति ॥ गीतनर्त्तनीं रंभा येती झुमझुम घागऱ्यापाईं वा-
जती सारंगीचे सूर ऊठती टाळ विणा मोरचंगहातीं
सार मंडळच्या तारा सुति पखवाजावर थापा देती जन
लोक अवघेच पहाती सदोदित आनंद मय होती.

---

## पोंवाडा.

( रमण्याचें वर्णन मनोहरकृत. )

श्रावणमासीं मोठा धडाका अन्नशांतीचा चालु तडा-
खा रमण्यामध्यें छपऱ्या रावट्या सरोवर सुंदर निर्मळ
पाणी आंबे मोहोराचे तांदूळ तिसडी डाळ तुरीची पिं-
वळी बेगडी लवण तांबूल गंडारोकडी प्रतिपदेपासून
चालू खिचडी षष्टी दिवशीं मुहूर्त्तवेळीं गज उंटावर
वाहे खजिना द्वारीं रोकडा जामदारखाना द्विजवृंदाचा
हम कारखाना कर्ण ऊपमा नाहीं कोणा उदार प्रभु बाजि-
राव दाणा भरून अंजळी विद्वज्जना दक्षणा देई अड-
भडा ॥ चा० ॥ पेश्वे किर्तीचा झेंडा फडफडा ॥ रासा द-
र्वाजा वाहे घडघडा ॥ चा० ॥ पांचि दर्वाज्याशिं फरे
उभे तोवे मारिती ॥ हत्ती घोडे काठ्या सोटे द्विजथवे
कांपती ॥ खडा पहारा चौक्या राहती ॥ मशाल गस्ती
फिरती ॥ चाल ॥ भर ओंग्राळें फुटाणे ॥ चार पैसे वि-
डा देणें ॥ शिका कुंकुम छापणें ॥ चाल ॥ धर्मधक्का देऊ-
न त्याशीं गच्यांडच्या लोटून देती ॥ सोरट मंडळ नाना
विधजन आशिर्वादें निंदास्तुती ॥ बाजार जिन्नस का-

पड मेवा मिठाई बर्फि स्फ़ींत ॥ साठी सुकेळी फणसपोळी दहींतान्न पोहे मिळती ॥ सप्तम दिवशीं जनसमाजही निराहारी प्रदक्षिणा कर्त्ती ॥ परमानंदें कोंडिती ब्राम्हण नाहीं गणना लक्षावर्ती ॥ सुटते काळीं द्विजसंज्ञेशि धडधडांत तोफा सुटती ॥ तरुवर जैसा प्रफुल्ल गिरीवर नळेदीप चंद्रजोती ॥ चौघडा झांज घणघोर म्हणे मनोहर शहरीं घरोघर करि पारणीं द्विज नक्काचीं ॥ खरेदी बाळ्या बुगडच्या टीक लालडच्या मोती विल्काचीं ॥ शिवेवदन तुझें पाहूं दे ॥ २ ॥

४ २६ मातीने ४७ मा कडक पुढे गोवेगांव (दामाडे) चक्र गोफळकर मूळचे

बुबाजीने नरनाल पुलकी मंदिरकिल्ला
जैसा करनाटकालवेसी गनिमकी होती फौज

+ पायाबिगर कोई नहीं लडना करो उसकू बातुका सवारी
सबसरदार रवाने फौज सब मिलकर करना फौज
नबाब बैठे अंबारीमे जो ~~फौज~~ मे अव मिला
उस दोनोकी हुई लढामी आघाडीपर बडा फौज
गर्दुल गर्दुल भले टोणपे दोन आले हात पाईल
मारती कटीयार बीचमें मरती एकमेकाला
हाहाकार इसके तलवारा फेक पाडले धरणीला
मुसलमान पडे धरणीला औ कहते आहु आहु
बामन मराठे पडे धरणीला राम राम म्हणती ओला
झाला कमजोर मोगलाच्या फौजा सारी आघाडीला
बंदुकी चक्र जोडलेल्या एकाचक्र छातीत असती
दुसरी ओ केली गोळी लागत पडे उरबडून धरणीवरती ॥
+ आघाडीवर तोफखाना लगाव गोलंदाज गोला
भरवल्या भई भारी निकले स्वारी बुधवारच्या दिनचिन्ह

पड मेवा मिठाई बर्फि स्फांति ॥ साठी सुकेळी फणसपोळी दहींताक पोहे मिळती ॥ सप्तम दिवशीं जनसमाहरी निराहारी प्रदक्षिणा करती ॥ परमानंदें कोंडिती ब्राम्हण नाहीं गणना लक्षावर्ती ॥ सुटते काळीं द्विजसंज्ञेशिं धडधडांत तोफा सुटती ॥ तरुवर जैसा प्रफुल्ल गिरीवर नळेदीप चंद्रजोती ॥ चौघडा झांज घणघोर म्हणे मनोहर शहरीं घरोघर करि पारणीं द्विज नक्काचीं ॥ खरेदी बाळ्या बुगडच्या टीक लालडच्या मोती विल्काचीं ॥ शिवेवदन तुझें पाहूं दे ॥ २ ॥

ॐ २६ [illegible] कडव्या पुढे [illegible]

[illegible] मसलत [illegible]

कैसा करना [illegible] गनिम की होती [illegible]

+ [illegible] लढना करो [illegible]

सब सरदार [illegible] फौज सब मिलकर लरना [illegible]

+ नबाब बैठे अंबारीमे [illegible] फौजमे [illegible]

[illegible] दो तोफकी हुई लढाई [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible] राम राम म्हणती [illegible]

[illegible] फौज [illegible]

[illegible]

[illegible]

+ [illegible]

[illegible] बुधवारका दिन [illegible]